महाराष्ट्र

कालचा आणि आजचा

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ..... निबंध .....
सं. क्र. 3867



REFBK-0026624

परचुरे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ा :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, ा केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे वर्गणी भरावी लागेल.

AUG 1992

SEP 1992

(क्र. मा. पहा)
२०००-१२-८८

संदर्भ निबंध
३४९६
२६६२४
८।७।६२

महाराष्ट्र – कालचा आणि आजचा

आचार्य अत्रे

REFBK-0026624

संकलन

अप्पा परचुरे



परचुरे प्रकाशन मंदिर,
गिरगांव, मुंबई-४

प्रकाशक :
सौ. शुभदा विष्णु परचुरे
परचुरे प्रकाशन मंदिर
२०३/४, मेहता भवन
३११, राजा राममोहन रॉय मार्ग
गिरगांव, मुंबई-४०० ००४

© शिरीष पै
सौ. मीना देशपांडे

आवृत्ती पहिली
२ मे १९९२

मुखपृष्ठ : श्याम जोशी

अक्षरजुळणी :
अक्षय फोटोटाइपसेटर्स
'कुलदीपक', सुभाष पथ,
जुन्या महानगरपालिकेजवळ
ठाणे-४०० ६०१

मुद्रक :
श्री. अरुण नाईक
अक्षर प्रतिरूप प्रा. लि.
२०१, इंडिया हाऊस,
४२, आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई-४०० ०३१.

मूल्य : २५ रुपये

पार्श्वभूमि

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे ह्यांनी आपल्या आत्मचरित्रातून, स्फुट लिखाणामधून आणि भाषणांमधून महाराष्ट्राविषयी, मराठी भाषा आणि साहित्य, मराठी माणूस आणि संस्कृती ह्याविषयी वेळोवेळी विविध भाष्ये केली. महाराष्ट्राविषयी त्यांच्या अंत:करणात वसत असलेला जाज्वल्य अभिमान ह्या भाष्यांमधून त्यांनी प्रगट केला. त्याचप्रमाणे मराठी माणसांमधल्या उणीवांचे दर्शनही घडविले, ह्या हेतूने की आपला हा महान महाराष्ट्र अधिक महान, अधिक व्यापक दृष्टिकोण असलेला, विशाल हृदयाचा व्हावयास हवा. म्हणूनच महाराष्ट्राच्या गौरवाची गाथा गातानाही मराठी माणसाच्या मर्मावर नेमके वोट ठेवायलाही ते विसरले नाहीत. निरनिराळ्या प्रसंगांच्या अनुषंगाने त्यांनी मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि इतिहास ह्यांच्या संदर्भात जी जी भाष्ये केली, त्यातली काही निवडून आणि संपादित करून त्यांचा एक लहानसा संग्रह प्रसिद्ध करावा असे मनात होते. 'महाराष्ट्र – कालचा आणि आजचा' हा भाष्यसंग्रह प्रसिद्ध करून मनातले ते उद्दिष्ट आज मी साध्य करीत आहे.

हे महाराष्ट्रविषयक विचार आचार्य अत्रे ह्यांच्या लिखाणातून आणि भाषणातून मधूनच काढून घेतलेले असल्याने आधीच्या आणि पुढच्या संदर्भातून त्यांना अलग करणे भाग पडले. ह्या संग्रहातले काही लेख मात्र, स्वतंत्र निबंधच आहेत. त्यामुळे हा संग्रह म्हणजे सलगपणे लिहिलेला एक परिपूर्ण ग्रंथ नाही, ह्याची मला जाणीव आहे. तरीही ह्या वेगवेगळ्या तुकड्यांतूनही आचार्य अत्रे ह्यांचे महाराष्ट्रावरलचे निस्सीम प्रेम हे एक सूत्र मात्र सलगपणे पुढे सरकत गेलेले वाचकांना आढळेल. ह्या प्रेमसूत्रामुळेच हे सर्व लेख एकत्रपणे जणू बांधले गेले आहेत. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची जी तीव्र ओढ आणि तळमळ आचार्य अत्रे ह्यांच्या अंत:करणाला कायम लागून राहिलेली होती, ती तळमळ, तो निदिध्यास ह्या सर्वच्या सर्व लेखांमधून सारखाच प्रवाहित होत राहिला आहे आणि त्यामुळे कालच्या महाराष्ट्राचा आणि मराठी परंपरेचा रास्त अभिमान आणि ही पूर्वपरंपरा सांभाळूनच आजच्या जगात जी प्रगती, जे स्थित्यंतर घडून येत आहे, त्याच्याशी आपला हा महाराष्ट्र समरस कसा राहील ही त्यांना लागून राहिलेली चिंता, हे दोन्ही भाव सर्वच लेखांतून सारख्याच उत्कटतेने व्यक्त झाले आहेत. म्हणूनच 'महाराष्ट्र – कालचा आणि आजचा' हेच नाव ह्या संग्रहाला योजिले आहे.

या विचारसंग्रहाची सुरुवात होते ती भारताला स्वातंत्र्य मिळाले त्या वेळी आचार्य अत्रे ह्यांनी त्या स्वातंत्र्याचे स्वागत उत्फुल्ल अंत:करणाने अतिशय काव्यात्म भाषेत कसे केले त्याचे दर्शन घडवण्याऱ्या 'ये स्वातंत्र्या ये!' ह्या लेखाने. शतकानुशतके, वर्षानुवर्षे ज्या स्वातंत्र्याची वाट हा देश पहात होता ते स्वातंत्र्य ह्या देशाला अखेर मिळाले! पण

त्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपले रक्त सांडले ते क्रांतिवीर मात्र आलेले स्वातंत्र्य पहावयास आज जिवंत नाहीत म्हणून आचार्य अत्रे ह्यांचे अंत:करण द्रवते. इतक्या कष्टांनी मिळवलेले हे स्वातंत्र्य आम्ही परत जाऊ देणार नाही अशी तेजस्वी प्रतिज्ञा ते ह्या लेखातून करतात आणि त्या स्वातंत्र्याला उद्देशून ते म्हणतात, "हे स्वातंत्र्या, तू गरिबांचा सवंगडी आहेस, तू शेतकऱ्यांचा सोबती आहेस, तू मजुरांचा मित्र आहेस. त्यांच्याच संगतीत तुला रहावे लागेल." ह्या देशातील पददलित आणि श्रमिक मुक्त झाले पाहिजेत, स्वातंत्र्य त्यांच्यापर्यंत पोहोचले पाहिजे ही समाजवादी भूमिका ह्या लेखातून आणि पुढेही अनेक लेखांतून आचार्य अत्रे ह्यांनी वेळोवेळी प्रगट केली आहे. ज्या स्वातंत्र्यात उद्याच्या महाराष्ट्राचे साहित्यिक साहित्यनिर्मिती करणार आहेत त्यांच्या लेखनामागची प्रेरणा ही दलितांचा उद्धार हीच असावी ही दूरदृष्टी आचार्य अत्रे ह्यांनी ज्या काळात 'सामाजिक जाणीव' किंवा 'सामाजिक बांधिलकी' हे शब्दही साहित्यात आले नव्हते त्या काळात प्रगट केली आहे. 'भारतीय स्वातंत्र्य आणि मराठी साहित्य' ह्या लेखात आचार्य अत्रे म्हणतात, 'प्रतिगामी आणि पुरोगामी विचारांचा झगडा आज सर्वत्र चालू आहे. ह्या झगड्यात प्रतिगामी शक्तीचा पाडाव करून नवा वर्गविहीन समाज निर्माण करणे ह्याला क्रांति म्हणतात. हे क्रांतिकार्य राजकारणाला करावयाचे आहे पण साहित्याच्या आणि कलेच्या साहाय्यावाचून ही क्रांती यशस्वी कशी होऊ शकेल? समाजात वैचारिक परिवर्तन आणि लोकजागृती घडवून आणण्याचे सामर्थ्य फक्त साहित्याच्या अंगी आहे.' 'मराठी वाङ्मयाचा उगम' ह्या लेखातून थोर साहित्याची व्याख्या करताना त्यांनी म्हटले आहे, 'वाङ्मयात जे जे काही स्थिर आणि चिरंतन आहे त्याचा उगम असामान्यातून झालेला आढळेल. महान पराक्रमातून, महान चरित्रातून किंवा अत्युच्च जीवनमूल्यांकडून अमर वाङ्मय निर्माण होते.' वाङ्मयाला आणि कलेला जसे जनउद्धाराचे उच्च उद्दिष्ट हवे तसेच वाङ्मय जर उच्च दर्जाचे व्हायचे असेल तर त्याचा उगमही उच्च, उदात्त विचारांतून, असामान्यांच्या पूजेतूनच व्हायला हवा', अशी वैचारिक धारणा त्यांनी व्यक्त केली आहे. 'वाङ्मय हे लोकोद्धाराच्या तळमळीतून निर्माण होते. नुसती वाङ्मयसेवा करणे हा काही संतांचा उद्देश नव्हता. ज्ञानेश्वर आणि तुकाराम ह्यांच्या काव्याला परतत्त्वाचा स्पर्श झाला होता, प्रत्येक भूतात भगवंत त्यांना दिसला म्हणून त्यांचे काव्य इतक्या श्रेष्ठ दर्जाचे झाले, अमर झाले. त्याचप्रमाणे आधुनिक मराठी वाङ्मयाची सुरुवात झाली तीही, देशाच्या स्वातंत्र्याच्या तळमळीने जे प्रेरित झाले होते त्या लोकहितवादी, महात्मा फुले, न्यायमूर्ति रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक आणि गोपाळराव आगरकर ह्यांच्या ओजस्वी लिखाणामुळे. गेल्या शंभर वर्षांचा भारताचा इतिहास जर पाहिला तर सर्व भारताला पुरोगामी विचार महाराष्ट्राने दिला, ह्याचा आचार्य अत्रे ह्यांना विलक्षण अभिमान वाटतो स्वातंत्र्याचा, धार्मिक आणि सामाजिक समतेचा आद्य विचार महाराष्ट्रातच प्रथम

जन्माला आला', असे त्यांनी ह्या लेखात म्हटले आहे. 'मराठी साहित्याला सतत प्रेरित करीत असलेल्या ह्या उदात्त तत्त्वांचा विसर आजच्या मराठी साहित्यिकांनी कधीही पडू देऊ नये', असे आचार्य अत्रे ह्यांनी कळवळून सांगितले आहे. 'मराठीचा पक्ष हा बायाबापड्यांचा आणि स्त्रीशूद्रांचा पक्ष आहे हे लेखकांनी कदापि विसरू नये. 'समाजातले खड्डे अन् खाचखळगे आधी भरा. मनोरे कसले बांधताहात?' असे आचार्य अत्रे ह्यांनी आजच्या लेखकांना निक्षून विचारले आहे.

'शुद्ध मराठी कसे बोलावे आणि लिहावे' ह्याविषयी लिहितानाही ते म्हणतात, 'बहुजनसमाजाला जी समजते तीच खरी शुद्ध मराठी भाषा. संत, कवि त्यांना ह्यासाठीच अधिक जवळचे वाटतात. शिवाय ते समाजाला प्रेम शिकवतात. मनुष्य कायद्याने बदलत नाही तर प्रेमाने. हृदय शुद्ध करण्याची दृष्टि केवळ साहित्याला असू शकते'. साहित्यिकांना ते म्हणतात 'नुसतेच साहित्यिक म्हणवू नका. साहित्यिक हे जनतेचे सेवक आहेत... सेवेपासून साहित्याची फाळणी झाल्यामुळे साहित्याचा अध:पात झाला आहे.'

महाभारताला भारताच्या राष्ट्रीय काव्याची जी प्रतिष्ठा लाभली ती एकाच कारणामुळे की मानवतेच्या कल्याणाच्या आणि उद्धाराच्या कथांनी आणि संदेशाने ते आमूलाग्र खचून भरलेले आहे. समाजजीवन दूषित करण्याचे काम साहित्यकाराच्या हातून घडता कामा नये. म्हणून आचार्य अत्रे ह्यांना साहित्यातील विकृती मान्य नव्हती. मराठी साहित्यिकांनी विकृत आत्मनिष्ठाही सोडून द्यावी ह्या मताचे ते होते ते केवळ ह्या एकाच विचाराने की अशा लेखनाचे दूरगामी परिणाम उद्या समाजावर कसे होतील?

साहित्याने समाजाचा उद्धार करावा ही त्यांची तळमळ 'ललितवाङ्मय हेच खरे लोकवाङ्मय' ह्या लेखात प्रकर्षाने व्यक्त झाली आहे. ते म्हणतात, 'मराठी साहित्याची प्रगती अधिक झपाट्याने कशी होईल इकडेच माझे विचार धावतात.' मराठी साहित्याच्या दोषांकडे दुर्लक्ष करून गुणांना उत्तेजन द्यावे अशाच मताचे ते अधिक होते. मराठी साहित्याचे सामर्थ्य सारखे वाढते आहे ह्या जाणीवेने त्यांच्या अंत:करणातून सतत आनंदच उचंबळत राही. अनेक हाल-अपेष्टा सोसून आणि प्रखर दारिद्र्यात दिवस काढूनही ज्या मराठी साहित्यिकांनी मराठी साहित्याचे सामर्थ्य आणि लेखन वाढवले त्यांच्याविषयी त्यांच्या मनात अपार कृतज्ञता होती. 'मराठी साहित्याचा सारा विस्तार नि:स्वार्थी लेखकांच्या दारिद्र्यावर, निष्ठेवर आणि त्यागावर उभारलेला आहे', असे ते गहिवरून म्हणतात. मराठी साहित्यिकांनी नुसते स्वभाषेतून लिहावे इतकेच नव्हे तर परभाषेतील उत्तम साहित्य आणि उत्तम विचार मराठी साहित्यात आणून सोडावेत अशाही मताचे ते होते.

महाराष्ट्राविषयीच्या प्रेमाने बोलताना आचार्य अत्रे ह्यांच्या लेखणीला विशेष पाझर फुटतो तो मराठी संतांविषयी लिहिताना. त्यांचे आवडते दैवत म्हणजे तुकाराम. 'मराठी

जनतेची विठाई माउली' हा त्यांचा लेख पहा. त्यात महाराष्ट्राच्या धार्मिक जीवनातले दोन मोठे सण म्हणजे आषाढी एकादशी आणि कार्तिकी एकादशी, ह्यांचे मोठेपण सांगितले आहे. मराठी माणसाचे लाडके दैवत म्हणजे पंढरीचा विठोबा. याला तुकोबांनी आई असे संबोधून परोपरीने आणि वात्सल्याने आळवले. तुकोबारायांनी केलेली विठाई माउलीची आळवणी हा ह्या लेखाचा विषय असला तरी आचार्य अत्रे ह्यांनी वाचकाला तुकोबाची अखंड भक्ताची भूमिकाच जणू घ्यायला लावली आहे. भारतीय संस्कृतीत आईला अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि भक्त जेव्हा देवाला आई अशी हाक मारून शरण जातो तेव्हाच त्याला भक्तीचे खरे मर्म कळते. कारण आईची सत्ता म्हणजे प्रेमाची सत्ता आणि प्रेमापुढे दुसरा कुठलाच उपाय चालत नाही. तुकोबारायांच्या विठ्ठलभक्तीचे रहस्य समजावणे इतकाच ह्या लेखाचा हेतू नाही तर ती भक्ती जीवनात उतरावयाची असेल तर मराठी माणसाला विठ्ठलाच्या लेकरासारखे अगतिक, दीन, असाहाय्य व्हायला हवे असे आचार्य अत्रे ह्या लेखात म्हणतात. मराठी संस्कृतीचे हे एक आगळेच वैशिष्ट्य त्यांनी ह्या लेखातून स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्राच्या अभिमानाने ओथंबून जाणारे आचार्य अत्रे कधी कधी मात्र मराठी माणसामधले खुजेपण दिसल्यावर अस्वस्थ होतात. तरीपण विनोदबुद्धीनेच ते त्या दोषावर बोट ठेवतात. मराठी माणसाला दुसऱ्याला बरे म्हणणे जड जाते हे सांगताना त्यांनी तेवढ्यात चार मौजेच्या गोष्टी सांगत ते पटवून दिले आहे. महाराष्ट्रातल्या सार्वजनिक जीवनाच्या अतिरेकाला ते हसतात. आणि ह्या अतिरेकाचे आपणही कसे बळी झालो आहोत हे सांगून खांदे उडवतात आणि डोळे मिचकावतात.

तरीपण त्यांना मराठी माणूस इतका प्रिय का, कारण तो बुद्धीचा उपासक आहे. तो उर्मट असेल, निर्भीड असेल पण त्याच्या अंगी परम धैर्य आणि बाणेदारपणा आहे. 'हेच ते मराठीपण' ह्या लेखातून त्यांनी न्यायमूर्ती रानडे ह्यांच्या लेखनाचा आधार घेऊन महाराष्ट्राच्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे मराठी माणूस इतका निर्भय का झाला आहे ह्याचे उत्कृष्ट विवेचन केले आहे. अशा ह्या महाराष्ट्राला जेव्हा १ मे १९६० रोजी स्वतंत्र भाषिक राज्याचा दर्जा मिळाला तेव्हा आचार्य अत्रे ह्यांनी लिहिलेला 'महाराष्ट्राची गौरवगाथा' हा लेख म्हणजे त्यांच्या नितांत महाराष्ट्रप्रेमाला दुथडी भरून आलेला महापूरच जणू. महाराष्ट्रराज्यनिर्मितीच्या पवित्र दिनी महाराष्ट्राची गौरवगाथा गाताना मराठी भूमीविषयीच्या आत्मीयतेने त्यांचे हृदय आकंठ दाटून आले आहे. मराठी संस्कृतीचा, इतिहासाचा, भाषेचा आणि साहित्याचा गौरव करताना त्यांनी, साहित्यिकांनी घ्यावयाच्या लोकसेवेच्या व्रताचा विसर पडू दिलेला नाही. 'रंजल्या गांजल्यांना नि अनाथ अपंगांना हृदयाशी जो धरतो, अन् आपल्या पुत्रांवर जे प्रेम करतो तेच जो दासांवर करतो तो साधु आणि तोच देव, ही तुकोबांची शिकवण तर ह्या महाराष्ट्रधर्माच्या मानवतावादाचा आणि

समतावादाचा कळस होय', असे ते म्हणतात. उच्च आणि उदात्त महाराष्ट्रधर्माचे पालन मराठी साहित्यिकांनी करावे असे पुन्हा पुन्हा आपल्या लेखणीने आणि वाणीने गर्जून सांगणारा आचार्य अत्रे ह्यांच्यासारखा प्रखर महाराष्ट्राभिमानी लेखक फिरून ह्या महाराष्ट्रात होणे कठीण. आपल्या लेखणीचे आणि वाणीचे सर्वस्व पणाला लावून त्यांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात महाराष्ट्राची जी सेवा केली ती केवळ अजोड होती. महाराष्ट्रराज्यनिर्मितीत त्यांच्या लेखणीचा सिंहाचा वाटा होता हे मराठी माणूस विसरूच शकणार नाही. ह्या लहानशा ग्रंथातून आचार्य अत्रे यांच्या अभूतपूर्व महाराष्ट्रप्रेमाचे दर्शन वाचकाला झाले तरी ह्या संग्रहाच्या प्रकाशनाचे सार्थक झाले असे मी समजेन.

महाराष्ट्र दिन
१ मे १९९२

अप्पा परचुरे

अनुक्रमणिका

१. ये स्वातंत्र्या ये! ९

२. भारतीय स्वातंत्र्य आणि मराठी साहित्य १४

३. मराठी वाङ्मयाचा उगम १८

४. शुद्ध मराठी लिहावे आणि बोलावे २२

५. चिरंतन साहित्याचे लक्षण २४

६. संत केवळ साहित्यिक होते काय? २६

७. मराठी साहित्यात उत्कटता कशामुळे येईल? २८

८. ललित वाङ्मय हेच खरे लोकवाङ्मय ३१

९. मराठी जनतेची विठाई माउली! ३६

१०. महाराष्ट्राची विनोदबुद्धी ४२

११. हेच ते मराठीपण ४५

१२. ही आमची मराठी मने ५२

१३. महाराष्ट्रातील सार्वजनिक जीवनाचा अतिरेक ५५

१४. महाराष्ट्र : कालचा आणि आजचा ५९

१५. महाराष्ट्राची गौरवगाथा ६२



ये, स्वातंत्र्या ये!

ये, स्वातंत्र्या ये! इतके दिवस तुझीच आम्ही वाट पाहात होतो. शतकेच्या शतके आणि वर्षेच्या वर्षे तुझ्याच मंगल चरणाकडे डोळे लावून आम्ही बसलो होतो. इतके दिवस तुझ्याच नावाचा आम्ही जप करीत होतो. इतक्या रात्री तुझ्याच नावाने घरात बसून आम्ही आक्रोश करीत होतो. आम्हाला सोडून तू इतकी वर्षे कोठे दडी मारून बसला होतास बरे? जगामधल्या अनेक देशांना आणि आणि लोकांना शतकानुशतके तुझे दर्शन मनसोक्तपणे घडत असताना, आम्हालाच तेवढा तुझा सुंदर चेहरा पाहायला मिळू नये याचे आम्हाला आश्चर्य वाटत होते. गेल्या दीडशे दोनशे वर्षांत एकदा देखील तुला आमची आठवण येऊ नये; असा कोणता अपराध आम्ही तुझा केला होता बरे? जगातल्या अत्यंत दरिद्री आणि नापीक देशावर तुझी कृपा असावी आणि 'सुवर्णभूमी' म्हणून ज्या आमच्या देशाची हजारो वर्षे त्रिखंडांत कीर्ती दुमदुमत आहे त्या भारतवर्षावर मात्र तुझी अवकृपा असावी, हे चमत्कारिक नाही काय? दुसऱ्यांच्या देशाचा आणि वित्ताचा अपहार करणाऱ्या क्रूर आणि जुलमी लोकांना तुझा आश्रय असावा आणि सारे विश्व आपले कुटुंब आहे असे समजून साऱ्या मानवतेला आपल्या घराचे दरवाजे उघडे ठेवणाऱ्या आमच्यासारख्या सज्जन आणि पापभीरू लोकांवर मात्र इतकी वर्षे तुझे कृपाछत्र असू नये हे अद्‌भुत नव्हे काय? आम्हाला वाटते, जबरदस्ताचे तुला भय वाटते म्हणूनच तू त्यांची मनधरणी करीत असावास आणि आमच्यासारख्या गरीब लोकांची तुला पर्वा वाटत नाही म्हणूनच इतकी वर्षे तू आमच्याकडे ढुंकून पाहात नसावास. हजारो वर्षांपासून साऱ्या जगाचे लक्ष एकट्या या आमच्याच देशावर खिळून बसले असताना तुझेच तेवढे लक्ष आमच्याकडे असू नये याबद्दल राहून राहून आम्हाला दुःख होत होते. जगामध्ये कोणत्याही देशात आजपर्यंत कधी होऊन गेले नाहीत असे मोठमोठे ऋषी, साधू आणि वीर आमच्यामध्ये होऊन गेले असताना तुला आमच्या देशाचे आकर्षण का वाटू नये बरे? हिमालयाची बर्फाच्छादित शिखरे पाहण्यासाठी, गंगा नदीच्या पवित्र जळांत अवगाहन करण्याकरिता, किंवा काश्मीरमधल्या गुलाबांच्या वाटिकेत विहार करण्याच्या हेतूने तरी तू एखादे वेळी या देशाकडे चक्कर मारशील अशी आमची अपेक्षा होती. तुझ्या वाटेकडे डोळे लावून लावून आणि तुझ्या नावाच्या धावण्या धावून धावून आम्ही अगदी कंटाळून गेलो होतो रे! आम्हाला वाटले की आता काही तू येत नाहीस. लोकमान्य टिळक तर कंटाळून कंटाळून निघून गेले. ते म्हणाले, "आमच्या आयुष्यात काही

आम्हाला हे स्वातंत्र्य पाहावयाला मिळत नाही." आम्हाला देखील असेच वाटले होते, की तुझी आणि आमची गाठभेट आता काही आमच्या या जन्मामध्ये होत नाही. पण अखेर शेवटी तुला आमची दया आली आणि तू आज आलास. ये, स्वातंत्र्या ये. आम्ही तुझे स्वागत करतो.

ये स्वातंत्र्या ये. जवळ ये. अगदी जवळ ये. असा तिऱ्हाइतासारखा दूर उभा राहू नकोस. इथले सगळे अनोळखी चेहरे बघून तू जरा गोंधळून गेला असशील. बिचकून गेला असशील. गांगरून गेला असशील. आमच्या देशामधले कोणीच तुझ्या ओळखीचे नाही. म्हणून कदाचित् तुला चुकल्यासारखे वाटेल. पण थोड्याच दिवसांत तुझी आणि आमची चांगली गट्टी होईल आणि मग तुला आमच्याबरोबर करमायला लागेल. तसे आम्ही तुझे निस्सीम भक्त आहोत रे. आमच्या हृदयाला कान लावून आतले ठोके ऐक. बघ, प्रत्येक ठोका तुझ्या नावाची घोकणी घोकतो आहे की नाही. ही, आमच्या हाताची नाडी बघ. तुझ्या दर्शनासाठी उतावीळ होऊन पहा कशी उड्या मारते आहे ती. ह्या आमच्या अंगाला हात लाव. कढत लागते आहे ना तुला ते! पहा, तुझ्या स्वागतासाठी आमचे रक्त आत कसे उसळ्या मारते आहे ते. म्हणून म्हणतो जवळ ये. असा लांब उभा राहू नकोस. आम्हाला तुला कडकडून भेटू दे. आम्हाला तुला डोळे भरून नीट बघू दे! डोळ्यांत अश्रू भरून आल्यामुळे तुझे तेजस्वी मुखकमल आम्हाला नीट दिसत नाही. आजपर्यंत तुझी आम्ही पुस्तकामध्ये नुसती वर्णनेच वाचीत होतो. तुझ्या जादूची काव्ये, तुझ्या सामर्थ्याची स्तोत्रे आणि तुझ्या पराक्रमाचे पोवाडे आम्ही नुसते तोंडानेच म्हणत होतो. दूरदूरच्या देशाचे लोक तुझ्या गोड गोड गोष्टी आम्हाला सांगत होते. पण तुझा चेहरा प्रत्यक्ष असा कधीच आम्हाला पाहावयाला मिळाला नव्हता. त्यामुळे आम्हाला अशी काळजी वाटत होती की, तू आल्यावरोबर आम्ही तुला नीट ओळखू का नाही? नाही तर तू अचानक यायचास आणि आम्ही तुला न ओळखता तसेच दारात मख्खासारखे उभे राहावयाचे. आणि मग तू आमच्यावर रागावून तसाच माघारी निघून जायचास. पूर्वीची ओळख नसली म्हणजे होते माणसाच्या हातून अशी चूक. दुसरेही एक भय आम्हाला असे वाटत होते की, तुझी आमची पहिली ओळख नसल्याने भलतेच कोणी तरी तुझे नाव घेऊन आमच्या घरात शिरावयाचे आणि आम्हाला फसवून निघून जायचे. आम्ही आपली सरळ साधी भोळी माणसे. कोणीही आमच्या देशात यावे आणि आम्हाला फसवून जावे, असा आजपर्यंतचा इतिहास आहे. पण तू आलास. अगदी नक्की आलास. आम्ही तुला ओळखले, म्हणून म्हणतो जवळ ये. तुझा सुंदर चेहरा अगदी जवळून आम्हाला नीट न्याहाळून बघू दे.

ये स्वातंत्र्या ये. तुझे कोणत्या शब्दांनी आणि कसे स्वागत करावे हेच मुळी आम्हाला कळत नाही. बोलून चालून आमचा देश खेड्यांचा. आम्ही आपले अडाणी गांवढळ लोक.

तुझ्यासारख्या थोर पाहुण्यांचा सत्कार करा कराचा हे आम्हाला कसे माहीत असणार? म्हणून आम्ही करीत असलेल्या तुझ्या स्वागतात जर कुठे उणेपणा राहिला तर त्याबद्दल तू आम्हाला क्षमा कर. आणि आम्हाला सांभाळून घे. तुझ्या स्वागतासाठी बघ हे राष्ट्रीय झेंडे कसे घराघरावर लोकांनी उभारलेले आहेत. तुझ्या सन्मानासाठी तिरंगी निशाणाच्या ह्या माळा बघ कशा साऱ्या रस्त्यावर फडकत आहेत त्या. तुझ्या स्वागतासाठी चौकाचौकातून आणि मोहल्ल्याधून लतावृक्षांच्या आणि पानांच्या हिरव्यागार सुंदर कमानी पहा कशा बांधून ठेवलेल्या आहेत त्या! तुझ्या स्वागतासाठी देशामधले कोट्यवधी लोक आज तयार होऊन बसलेले आहेत. तुला रथावर बसवून तुझी वाजत गाजत मिरवणूक काढावी का तुला अंगाखांद्यावर आणि डोक्यावर गणपतिबाप्पाप्रमाणे घेऊन मिरवीत मिरवीत आम्ही न्यावे, हेच आम्हाला कळत नाही. तू आल्यामुळे आम्हाला किती हर्ष झाला आहे म्हणून सांगू. शेकडो पाडवे किंवा दसरे आणि हजारो दिवाळ्या एकत्र होऊन आज आलेल्या आहेत असे आम्हाला वाटते. असा सोन्याचा दिवस आमच्या आयुष्यात उगवेल आणि तो आम्हाला आमच्या डोळ्यांनी पाहावयाला मिळेल असे काही आम्हाला कधी वाटले नाही. आमच्या डोळ्यावर आमचा अजून विश्वासच बसत नाही. आम्ही जागे नसून स्वप्नात आहोत असेच आम्हाला वाटते. स्वप्नच असेल तर केवढे हिमालयासारखे सुंदर गगनचुंबी आणि विशाल स्वप्न! पण नाही, हे स्वप्न नाही. उलट आमच्या आतांपर्यंतच्या हजारो स्वप्नांचे हे साफल्य आहे. अनेक वर्षांच्या आमच्या मानसपूजेची ही पूर्तता आहे. खरेच तू आज आला आहेस. म्हणून म्हणतो, ये स्वातंत्र्या ये!

आता मी म्हणालो की तुझ्या ओळखीचे चेहरे इथे तुला दिसणार नाहीत. पण अगदीच तसे मात्र नव्हे बरे का. तुझ्या परिचयाची अनेक थोर थोर माणसे इथे आहेत. गांधीजींचा चेहरा तर तुझ्या चांगलाच ओळखीचा आहे ना? तुझी न् त्यांची चांगली दोन तपांची मैत्री आहे. जवाहरलाल नेहरूंना तू उत्तम ओळखतोस हे आम्हाला ठाऊक आहे. अंदमानच्या तुरुंगात वीर सावरकरांची आणि तुझी चांगली गट्टी जमलेली होती ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. आजपर्यंत अनेक वेळा तुला भेटून आलेले आणि प्रत्यही तुला भेटणारे शेकडो शूर लोक ह्या आमच्या देशामध्ये आहेत. त्यांची आता तुला एकसारखी सोबत मिळेल. म्हणून तुला बुजल्यासारखे वाटण्याचे मुळीच कारण नाही. ये, स्वातंत्र्या ये. अगदी निर्धास्तपणे ये. भिऊ नकोस. आमच्याजवळ शस्त्रास्त्रे नाहीत किंवा आमच्याजवळ सामर्थ्य नाही म्हणून तुला आपल्या सुरक्षिततेबद्दल काळजी वाटत असली पाहिजे. तुझे रक्षण किंवा तुझा सांभाळ आम्ही दुबळे लोक कसा करू ह्याबद्दल तुला चिंता वाटत असली पाहिजे. आम्ही ते जाणून आहोत. पण स्वातंत्र्या, त्याबद्दल तुला संशय बाळगण्याचे कारण नाही. अरे, तू आल्यामुळे आता हजारो हत्तींचे बळ आमच्या अंगात आले आहे. तुझ्या स्पर्शात एवढी संजीवनी आहे की, त्यामुळे मुडदेसुद्धा जिवंत होऊन

मोठ्या मोठ्या मर्दाप्रमाणे पराक्रम करतात. मग काय तर? आजपर्यंत आम्ही प्रेतासारखे जे पडून राहिलो होतो ह्याचे कारण तूच आम्हाला सोडून गेला होतास! तुझ्यावाचून इतकी वर्षे आम्ही जिवंत राहू शकलो हाच मुळी चमत्कार आहे. स्वातंत्र्या, अरे तूच तर मुळी राष्ट्राचा आणि देशाचा प्राण आहेस. आता तू आल्याने वर्ष-सहा महिन्यांत बघ कसा आमच्या चेहऱ्यात, शरीरात आणि वागण्यात एकदम फरक पडतो ते! वसंतऋतूत झाडाला जशी नवीन पालवी फुटते आणि मोहर येतो, तसे तुझ्यामुळे देशात कोट्यवधी जनतेला आता नवीन जीवन मिळेल आणि त्यांच्या पराक्रमांना मोहर येईल! बालामृत पिऊन मुले जशी गुटगुटीत आणि बाळसेदार होतात तशी देशातील कोट्यवधी जनता तुझ्या प्रेमाचे अमृत पिऊन धष्टपुष्ट होईल. एका वर्षाच्या आत या देशाचा चेहरा जगाला ओळखता यावयाचा नाही. एवढे या देशाचे स्वरूप तुझ्यामुळे बदलून जाईल हे लक्षात ठेव. आम्ही भांडखोर आहोत. आम्ही दुधखुळे आहोत. आम्ही मूर्ख आहोत अशी आजपर्यंत जगात आमची बदनामी होत होती. ती तुझ्या कानावर आलीच असेल. त्यामुळे तुझे आमच्याबद्दलचे मत कलुषित झाले असेल. पण खरे सांगू स्वातंत्र्या, तू नसल्याचा हा केवळ परिणाम होय! आता तू आला आहेस ना! पहा देशातील सारी भांडणे आणि अज्ञान धूम ठोकून कशी पळून जातील ते. एका वर्षाच्या आत सारा देश बृहस्पतीच्या बुद्धीने विचार करू लागेल आणि वाचस्पतीच्या जिभेने बोलू लागेल. तुला हे आम्ही सांगायला पाहिजे असे नाही. हे सारे चमत्कार इतर देशांत तू करून दाखविलेले आहेस. यात तुला नवीन असे काहीच नाही!

ये, स्वातंत्र्या ये. रात्रीचे बारा आताच वाजत आहेत. ते ऐकलेस ना टोले? मग आता तू बाहेर का उभा? ये. अगदी आत ये. आमच्या घरात ये. आमच्या हृदयात ये. आमच्या अंत:करणात ये. लोकमान्य टिळक सहा वर्षांची शिक्षा भोगून जसे रात्री बारा वाजता आपल्या वाड्यात परत आले, तसा दीडशे वर्षांच्या हद्दपारीनंतर तू रात्रीच्या बारा वाजता आमच्या घरी येतो आहेस. तथापि, या मध्यरात्रीच्या वेळी सारा देश तुझ्यासाठी जागत बसलेला आहे. पाळण्यातील अर्भकेदेखील यावेळी झोपलेली नाहीत. ती डोळे उघडून टकाटका बघत बसली आहेत. एवढी काळीकुट्ट अंधारी ही रात्र. पण ती देखील दिवसाप्रमाणे नटूनथटून तुझ्या स्वागतासाठी अजून जागते आहे. अनेक जन्मांची आमची पुण्याई आज फळाला आली आहे असे वाटते. हा महान् भाग्याचा दिवस देशात उगवावा म्हणून ज्या वीरांनी आपल्या प्राणांच्या आहुती दिल्या ते वीर हा दिवस पाहण्यास आमच्यामध्ये आज हयात नाहीत म्हणून आम्हाला अतिशय दु:ख होते आहे. तुरुंगाच्या फरसबंदीवर ज्यांनी आपली कपाळे आपटून आपटून रक्तबंबाळ केली, फासाच्या दोरीमध्ये ज्यांनी आपली मुंडकी बेधडकपणे अडकवली आणि बंदुकीच्या गोळ्या छातीवर झेलून ज्यांनी आपल्या देहाच्या चिंधड्या उडवून घेतल्या, ते हजारो क्रांतिवीर हे स्वातंत्र्या, तुझे

स्वागत करावयाला आज आमच्यावरोबर नाहीत ह्याचे आम्हाला वाईट वाटते. म्हणून तुझे स्वागत करता करता त्यांची आठवण होऊन आमच्या डोळ्यामधून एकसारखे हे पाणी वाहते आहे. तू आलास हा त्यांचा विजय आहे. त्यांच्या बलिदानाचे आणि तपश्चर्येचे हे फळ आहे हे न ओळखण्याइतके का आम्ही मूर्ख आहोत?

ये, स्वातंत्र्या ये. तुझ्या चरणावर मस्तक ठेवून आम्ही तुला प्रेमाने वंदन करतो. आनंदाने नि हर्षाने आमचा ऊर आज भरून आला आहे. आम्हाला आता जास्त बोलवत नाही. आणि बोलणार तरी काय आम्ही? इतक्या वर्षांनी तू आलेला आहेस. नव्वद वर्षांपूर्वी तू येशील असे आम्हाला वाटले होते. नानासाहेब पेशवे, झाशीची लक्ष्मीबाई आणि सेनापती तात्या टोपे ह्यांनी तुझा हात धरून तुला घेऊन येण्याची त्यावेळी प्रतिज्ञा केली होती. पण एकवीस दिवसांची चूक झाली. आणि तू त्यांना गुंगारा देऊन पसार झालास. त्यानंतर सत्तावीस वर्षांपूर्वी एका वर्षाच्या आत तुला घेऊन येतो अशी गांधीजींनी प्रतिज्ञा केली होती. पण त्याही वेळी तू आमच्या हातावर तुरी दिलीस. गेल्या वर्षापासून तू येणार असल्याच्या गोड गोड बातम्या आमच्या कानांवर एकसारख्या येत होत्या. त्या बातम्यांवर आमचा विश्वास बसत नव्हता. तू येशील अशी आमची आम्हाला खात्री वाटत नव्हती. पण तू अखेर शेवटी आज आलास. कोणी म्हणतात की, तू ज्या पूर्ण स्वरूपात यावयास पाहिजे होतास त्या स्वरूपात आलेला नाहीस! ते कसे का असेना, पण तू आलास हे काय कमी झाले? आता मात्र आम्ही तुला या देशातून बाहेर जाऊ देणार नाही. आता जगाच्या अंतापर्यंत तुला याच देशात मुक्काम करून रहावे लागेल. देशातील कोट्यवधी गरीब जनता आज आपले बळ एकवटून तुला पकडून ठेवल्यावाचून राहणार नाही. देशातले श्रीमंत आणि भांडवलवाले लोक तुला पैशाची लालूच दाखवून बिघडवून टाकण्याचा पुष्कळ संभव आहे. म्हणून स्वातंत्र्या, तुला त्या बाबत फार सावधपणाने राहावे लागेल. तू गरिबांचा सवंगडी आहेस. तू शेतकऱ्यांचा सोबती आहेस. तू मजुरांचा मित्र आहेस. त्यांच्याच संगतीत ह्या देशामध्ये एकसारखे तुला राहावे लागेल. तुझ्या रक्षणासाठी ते आपल्या छातीचे कोट करून तुझ्या भोवती उभे राहतील हे ध्यानात धर. म्हणून म्हणतो, ये स्वातंत्र्या ये. तुझ्या पवित्र नावाचा मुक्तकंठाने जयजयकार करून आम्ही हर्षभराने आज तुझे स्वागत करतो!

भारतीय स्वातंत्र्य आणि मराठी साहित्य

महाराष्ट्र जितका पराक्रमी तितकाच त्यागी आहे. स्वार्थाला त्याच्या जीवनात स्थान नाही. प्रत्येक गोष्टीचा राष्ट्रीय दृष्टीने विचार करण्याची महाराष्ट्राला अनेक शतकांपासूनची सवय आहे. असे असता राष्ट्रकल्याणाचा विचार महाराष्ट्राला नाही असा आज त्याच्यावर एक भलताच आरोप करण्यात आलेला आहे.

'मराठा तितुका मेळवावा' हा आजचा विचार नाही. तीन शतकांपूर्वीचा आहे. त्याचा अर्थ हिंदी किंवा गुजराती अथवा कानडी तितुका लोळवावा असा नाही. प्रत्येक भाषेचे सामर्थ्य वेगवेगळे आहे. त्या सर्व भाषिकांनी आपापल्या भाषेचे नि संस्कृतीचे बळ एकवटवावे आणि आपापल्या गुणधर्माचा विकास करून भारताला सामर्थ्यवान करावे असा आहे. भारताचे सौंदर्य त्याच्या विविधतेमध्ये आहे. पारतंत्र्याच्या काळात ह्या विविधतेचा नाश करण्याचा फार मोठा प्रयत्न झाला. भारताचे ऐक्य साधण्याची सवय पुढे चालू करून परकीय राज्यकर्त्यांनी आपली भाषा आणि संस्कृती त्यांजवर जबरदस्तीने लादली. म्हणून स्वतंत्र भारतात लोकशाहीच्या संवर्धनासाठी सर्व भाषिकांना आता आपापल्या भाषेचा नि साहित्याचा विकास करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य मिळावयास हवे. त्यानेच साऱ्या भारताचे ऐक्य साधेल आणि त्याचे जीवन समृद्ध व परिपूर्ण होईल. भाषावार राज्यरचना हा लोकशाही सिद्धांत आहे. राष्ट्रीय ऐक्याचा आणि स्वातंत्र्याचा तो पाया आहे.

भाषाकारण म्हणजे राजकारण नव्हे. महाराष्ट्राला स्वत:चे राजकारण नाही. भारताचे राजकारण हेच महाराष्ट्राचे राजकारण. श्री छत्रपती शिवाजीमहाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. महाराष्ट्राच्या स्वराज्याची नाही. मराठे वीरांनी तळहातावर शिरे घेऊन दिल्लीपर्यंत आणि अटकेपर्यंत ज्या पूर्वी घोडदौडी केल्या त्या काय महाराष्ट्राच्या रक्षणासाठी? सत्तावन्न साली इंग्रजांची सत्ता उलथून टाकण्याचा मराठ्यांनी जो अचाट प्रयत्न केला, तो काय केवळ महाराष्ट्र स्वतंत्र व्हावा म्हणून?

जसा राजकारणात, तसाच तत्त्वज्ञानात आणि साहित्यात महाराष्ट्राने स्वत:चा विचार कधीच केला नाही. जसा तो धारकरी आहे तसा तो वारकरीही आहे. भारताच्या स्वातंत्र्यासाठी वेळ पडली तर तो हातात तरवार धरील. नाही तर खांद्यावर पताका घेऊन तो मोक्षाची वाट चालू लागेल. ऐहिक वैभवाची त्याला आसक्ती नाही. वैराग्याचे बाळकडू त्याच्या हाडीमासी मुरलेले आहे. म्हणूनच कुरुक्षेत्रावर भगवान कृष्णांनी पेरलेल्या गीतेच्या बीजांना महाराष्ट्राच्या खडकाळ पठारावर अमाप पीक आले. महाराष्ट्रात दुसरे काही पिकत

नाही. फक्त गीता पिकते. ज्ञानोबा, तुकोबापासून ते विनोबापर्यंत सर्व संतांनी येथे गीतेचीच पेरणी केली. म्हणून फळाचा लोभ न धरता कर्तव्य करणे हा महाराष्ट्राचा मुळी देहस्वभावच घेऊन बसला आहे. सर्व भूतमात्रांत भगवंत भरलेला आहे. सर्व जग विष्णुमय आहे. सर्व भेदाभेद येथे अमंगळ आहेत अशा समतेच्या आणि बंधुत्वाच्या तत्त्वावर आधारलेल्या वैष्णव धर्माचा उपदेश सर्व महाराष्ट्रीय संतांनी आपल्या वाङ्मयामधून केलेला आहे.

मानवी जीवनातील उदात्त मूल्यांचा महाराष्ट्राने सदैव पुरस्कारच केलेला आहे. विचाराने, उच्चाराने आणि आचाराने आजच्या विकट परिस्थितीतही त्याच परंपरा आपणास पुढे चालवावयाच्या आहेत. वाङ्मयाचा विचारही आपणाला ह्याच भूमिकेवरून करावा लागेल. मानवी जीवनात राजकारणाला सर्वांत जास्त महत्त्व आहे यात शंका नाही. पण राजकारणाखालोखाल साहित्याला आणि कलेलाच महत्त्व आहे.

प्रतिगामी आणि पुरोगामी विचारांचा झगडा आज सर्वत्र चालू आहे. ह्या झगड्यात प्रतिगामी शक्तीचा पाडाव करून नवा वर्गविहीन समाज निर्माण करणे ह्याला क्रांती म्हणतात. हे क्रांतिकार्य राजकारणाला करावयाचे आहे. पण साहित्याच्या आणि कलेच्या साहाय्यावाचून ही क्रांती यशस्वी कशी होऊ शकेल? समाजात वैचारिक परिवर्तन आणि लोकजागृती घडवून आणण्याचे सामर्थ्य फक्त साहित्याच्या अंगी आहे.

भारत स्वतंत्र झाल्यावर असे वाटले की पारतंत्र्याने गुदमरून आणि दडपून गेलेली भारताची प्रज्ञा आणि प्रतिभा आता उचंबळून वर येईल! विचारांना, तत्त्वज्ञानाला, वाङ्मयाला आणि कलेला असा बहर येईल की, त्यांचा घमघमाट साऱ्या देशामध्ये दरवळेल! पस्तीस कोटी जनतेमध्ये नवचैतन्याचा संचार होईल! नव्या आशा त्यांच्या मनामध्ये उपजतील. नव्या आकांक्षा त्यांच्या हृदयामध्ये उसळतील. अन् नवी क्षितिजे त्यांच्या डोळ्यांपुढे पसरतील! पण छे, ह्या सर्व अपेक्षा फोल ठरल्या. ह्यांपैकी एकही कल्पना फलद्रूप झाली नाही. साऱ्या वाऱ्यावरून विरून गेल्या. आभाळात वीज कडकडावी, तिच्या लखलखाटाने क्षणमात्र डोळे दिपावेत अन् लगलेच ती अंतर्धान पावून पुन्हा सर्वत्र अंधार पसरावा, तसे आमच्या स्वातंत्र्याचे झाले. ते चकाकले केव्हा आणि विझले केव्हा त्याचा बोध आमच्या विचारवंतांना, साहित्यिकांना आणि कलावंतांना मुळी झालाच नाही. क्रांतीची प्रचंड लाट देशावर आली आणि वाहून गेली! जनता होती तशीच कोरडी राहिली.

कारण, आमच्या स्वातंत्र्याला तत्त्वज्ञानाची बैठक नव्हती. परकीय सत्ता नष्ट करणे एवढी एकच प्रेरणा त्याच्यामागे होती. म्हणून राजकीय क्रांती होऊनही जनता आपली होती तिथेच राहिली. पूर्वीच्या सणांत एका नवीन सणाची भर पडली एवढाच तिला बोध झाला. पण देशाच्या इतिहासात नवीन पर्वाचा प्रारंभ झाल्याचा प्रत्यय तिला झालाच

नाही. उलट देशात झालेल्या प्रचंड राजकीय उलथापालथीमधून नव्या जबाबदाऱ्यांचे, नवीन समस्यांचे आणि नव्या अडचणींचे डोंगर निर्माण झाले. आणि त्यांच्या ओझ्याखाली कोट्यवधी जनता चिरडून हीनदीन नि हैराण झाली. अशा संकटकाली तिला धीर देण्याचे, तिचे मार्गदर्शन करण्याचे आणि तिचा कैवार घेण्याचे कार्य देशामधील साहित्यिकांचे आणि कलावंतांचे होते. पण त्यांना तरी आपल्या सामर्थ्याचा साक्षात्कार कुठे झाला होता?

राजकीय क्रांतीचे परिवर्तन सामाजिक क्रांतीमध्ये करण्याचे सामर्थ्य साहित्यात नि कलेमध्ये आहे. ही गोष्ट मुळी त्यांच्या गावीही नाही. साहित्याचा आणि समाजाचा काय संबंध? कलेचा आणि क्रांतीचा काय कार्यकारणभाव? ह्याच संशयाच्या भोवऱ्यात ते गिरक्या खात आहेत. पूर्वी महाराष्ट्रात जनतेची जेव्हा जेव्हा उत्थापने झाली, तेव्हा तेव्हा त्यांचा उगम वैचारिक आंदोलनामधून झालेला आहे.

संतांनी ब्राह्मण धर्माविरुद्ध बंड पुकारून जेव्हा वैष्णव धर्माची पताका फडकाविली तेव्हा हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्याची प्रेरणा छत्रपतींना मिळाली. लोकहितवादी, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, चिपळूणकर आणि लोकमान्य टिळक ह्या महाराष्ट्राच्या पंचायतनाने आपल्या ज्वलंत लेखांमधून जेव्हां राजकीय आणि सामाजिक क्रांतीचा प्रखर पुरस्कार केला तेव्हा त्यामधून स्वातंत्र्याची देशव्यापी संघटना उभी राहिली. ह्या न्यायाने भारतीय स्वातंत्र्याच्या 'पंच-पंच उष:काली' समतेची आणि जनता क्रांतीची सूक्ते गाणारे कवी, लेखक आणि कलावंत जर साऱ्या देशातून भराऱ्या मारू लागले असते तर जनतेच्या उत्साहाला आणि हर्षाला आज केवढा महापूर आला असता. पण आमच्या साहित्यिकांना आणि कलावंतांना कोणत्याही तत्त्वज्ञानाचे किंवा वादाचे आकर्षणच उरलेले नाही. त्यांच्या डोळ्यांवर आणि डोक्यामध्ये कलेची धुंदी चढलेली आहे. त्यामुळे बाहेर जगात काय चाललेले आहे हे त्यांना दिसत नाही आणि समजतही नाही.

आमचे लेखक कोणासाठी लिहितात? आमचे कवी कोणासाठी गातात? आमचे चित्रकार कोणासाठी रंगवितात? ह्या गोष्टींची सार्वजनिक शहानिशा करण्याची आता वेळ आली आहे. जनतेला काय हवे आणि काय नको ह्याचा विचारही आमचे साहित्यिक आणि कलावंत करीत नाहीत. समाजात काय चालते किंवा काय घडते, हे डोळे उघडून पाहण्याची यांना मुळी जरुरीचे वाटत नाही. ह्यांच्या घरात काय घडते, ह्यांच्या डोक्यात काय चालते आणि ह्यांच्या हृदयात कुठे दुखते हे सांगणे, हे गाणे किंवा हे रंगविणे एवढेच आपले कर्तव्य आहे, अशी त्यांनी आपली समजूत करून घेतली आहे. साहित्य आणि कला ह्या केवळ आपल्या खाजगी बाबी आहेत. समाजाशी त्याचा काही एक संबंध नाही. स्वत:च्या आशानिराशा, स्वत:ची सुखदु:खे, स्वत:चे भोग आणि रोग, स्वत:चे ग्रह आणि आग्रह एवढ्याच गोष्टीचे चित्रण आपल्या साहित्यात नि कलेमध्ये आढळेल अशी ह्यांची

भूमिका आहे. ह्या आत्मनिष्ठ तत्त्वज्ञानाचा आजकालच्या साहित्यात एवढा अतिरेक झाला आहे की सामान्य माणसांना त्याचा साधा अर्थ देखील कळेनासा झालेला आहे. कवींची आणि लेखकांची आजकाल मुळी डोकीच फिरून गेली आहेत. सामान्य माणसांपेक्षा आपण कोणीतरी वेगळे आहोत असा भ्रम त्यांच्या डोक्यात भरलेला आहे.

समाज तर त्यांना कःपदार्थ वाटतो. त्याच्या रागालोभाची किंवा स्तुतिनिंदेची त्यांना मुळी पर्वाच वाटेनाशी झालेली आहे. चोवीस तास जणू काही त्यांना गांजाची धुंदी चढली आहे. त्या तारेमध्ये त्यांच्या तोंडातून जे फुटते आणि लेखणीमधून जे निघते ते समाजाने डोक्यावर घेऊन नाचले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा आहे. तुम्ही त्यांना म्हणालात की, 'अहो, हे तुम्ही काय बोलताहात? ह्याचा अर्थ आम्हाला कळत नाही. तो आम्हाला समजावून सांगा.' तर ते तुम्हाला सांगतील की, 'ह्याचा अर्थ तुम्हाला कळणार नाही. ह्या जन्मांत कळणार नाही. तो कळत नाही हीच तर मुळी ह्याची मौज आहे. तो आम्हाला सुद्धा कळत नाही तर आम्ही तुम्हाला काय समजावून सांगणार?'

मराठी वाङ्मयाचा उगम

महाराष्ट्राला साहित्याचे, संगीताचे आणि कलेचे अतीव वेड आहे. जीवनातल्या सर्व आनंदाचे वाङ्मय हे सार आहे. किंबहुना जीवनातला आनंद शब्दामधून व्यक्त करण्याचा माणसांनी जो प्रयत्न केला त्याचेच नाव वाङ्मय. जीवनात अनेक रस आहेत. नवरस आहेत. प्रतिभेच्या रवीने हे नवरस घुसळून त्यातून वाङ्मयाचे नवनीत बाहेर काढलेले आहे. वाङ्मयातला आनंद हा सूर्याप्रमाणे स्वयंप्रकाशी असतो. त्याचा आस्वाद आपोआप माणसाच्या हृदयाला जाणवतो. सूर्याच्या उजेडाकडे लक्ष वेधावयाला जसा दुसरा माणूस लागत नाही. चंदनाचा सुगंध आपल्या नाकापर्यंत पोहोचविण्यास जशी मधल्या माणसाची जरुरी लागत नाही, त्याप्रमाणे वाङ्मयामधल्या आनंदाचा प्रत्यय येण्यास मध्यस्थाची किंवा वादचर्चेची आवश्यकता नसते. हे चांगले वाङ्मय आहे असे सांगण्याची ज्यावद्दल मुळी जरूरच वाटत नाही, ते चांगले वाङ्मय. आभाळात प्रकाशणारा सूर्य हा सूर्य नसून चंद्र आहे, असा वाद दोघे खेडवळ एकदा घालीत बसले होते. एक म्हणे तो सूर्य आहे. दुसरा म्हणे तो चंद्र आहे. त्यांचा वाद काही थांबेना. इतक्यात तिसरा खेडवळ तेथे आला. तेव्हा त्याचे मत त्या दोघांनी विचारले. तेव्हा तो तिसरा माणूस म्हणाला, "मी काय सांगणार? मी आताच तुमच्या गावात येतो आहे." उत्तम वाङ्मयावद्दल वाद घालणे हे इतकेच अडाणीपणाचे आणि हास्यास्पद आहे.

भारतीय जीवनात प्राचीन काळापासून वाङ्मय भरलेले आहे. ह्याचे कारण भारताची संस्कृती जशी जुनी आहे तशी फार थोर आहे. ह्या संस्कृतीमधून आमच्या वाङ्मयाचा जन्म झालेला आहे. वेद आणि उपनिषदे ह्यामधले तत्त्वज्ञान आणि रामायण महाभारताने आपल्या पुढे ठेवलेले आदर्श हा आमचा प्राचीन संस्कृतीचा आत्मा आहे. या आमच्या प्राचीन संस्कृतीचा आमच्या जीवनावर फार मोठा प्रभाव पडलेला आहे आणि त्यातूनच भारतामधील भिन्न भिन्न भाषेमधले लोकवाङ्मय निर्माण झालेले आहे. भारतातले बहुसंख्य लोक अशिक्षित असतील. पण ते असंस्कृत नाहीत. यामुळे पौराणिक कथेच्या, लोककथेच्या, कहाण्यांच्या, लोकगीतांच्या, म्हणींच्या रूपाने विविध तऱ्हेचे वाङ्मय त्यांच्या जीवनात मुरलेले आहे. या वाङ्मयाचे संशोधन जेवढे व्हावे तेवढे अद्याप झालेले नाही. ते जर झाले तर या देशातील जनतेला भारतीय संस्कृतीने केवढा श्रीमंत वाङ्मयीन वारसा देऊन ठेवला आहे ह्याची कल्पना आल्यावाचून राहणार नाही.

वाङ्मयामध्ये जे जे काही स्थिर आणि चिरंतन आहे त्याचा उगम असामान्यातून झालेला आढळून येईल. महान पराक्रमातून, महान चरित्रांतून किंवा अत्युच्च जीवनमूल्यांमधून अमर वाङ्मय निर्माण होते. महापुरुषांचे नि:श्वसन म्हणजेच वाङ्मय. नद्या ह्या डोंगरामधूनच उगम पावतात. मातीच्या ढिगामधून नव्हे. अचाट पराक्रम वाङ्मयनिर्मितीला प्रेरणा देतात आणि वाङ्मयाने पराक्रमाला स्फूर्ती मिळते. अशी ही सदैव प्रक्रिया चालू असते. महापुरुषांनी उच्चारलेले कोणतेही एखादे वाक्य घ्या. जणू काही एखाद्या महान् साहित्यिकाने उच्चारल्यासारखे वाटते. लोकमान्य टिळक नि महात्मा गांधी हे काही वाङ्मयकार नव्हेत. पण त्यांच्या लेखनाने आणि भाषणांनी आमचे वाङ्मय कितीतरी समृद्ध झालेले आहे. लोककल्याणाचे कार्य ज्या महात्म्यांनी केले त्यांच्या जीवनामधून वाङ्मयाचा उगम झाला अशी निदान महाराष्ट्रामधली तरी परंपरा आहे. श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, समर्थ रामदास ह्या महान् संतांनी लोकजागृतीचे आणि लोकोद्धाराचे थोर कार्य केले आणि त्यांनीच मराठी साहित्याचा पाया घातला.

वाङ्मय हे लोकोद्धाराच्या तळमळीमधून निर्माण होते. नुसती वाङ्मयसेवा करणे हा काही संतांचा उद्देश नव्हता. मानवतेच्या कल्याणाचे कार्य त्यांना करावयाचे होते. ह्या उज्वल आणि उदात्त ध्येयवादातून ओजस्वी मराठी वाङ्मय निर्माण झाले. स्वत: ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरी'मध्ये साहित्याची व्याख्या केलेली आहे. ज्या साहित्यातल्या रसाला 'परतत्त्वा'चा स्पर्श झाला आहे ते साहित्य श्रेष्ठ. सर्व प्राणिमात्रात भरलेल्या ईशशक्तीचा साक्षात्कार साहित्यकाराला झाला पाहिजे. प्रत्येक भूतांत दडलेला भगवंत त्यास दिसला पाहिजे. तुकोबांचे सर्व वाङ्मय ह्या परतत्त्वाच्या स्पर्शाने पवित्र झालेले आहे.

आधुनिक मराठी वाङ्मयाचा उगमही अशाच ओजस्वी ध्येयवादामधून झालेला आहे. इंग्रजांचे राज्य जेव्हा ह्या देशावर प्रस्थापित झाले तेव्हा जनजागृतीची एक मोठी लाट ह्या देशावर आली. पाश्चात्य संस्कृतीचा आणि जीवनाचा फार मोठा परिणाम आमच्यावर झाला. आमचे दोष, आमच्या उणिवा, आमच्या चुका विलक्षण ढोबळ स्वरूपात आम्हाला दिसू लागल्या. आमच्यामधले मोठे मोठे विचारवंत विचार करू लागले. आमचे स्वातंत्र्य का गेले? ते परत यावयाचे असेल तर त्यासाठी आम्हाला आमच्या सामाजिक जीवनात कोणती क्रांती घडवून आणावी लागेल? स्वातंत्र्य आणि समता ह्यांची तळमळ त्या वेळच्या मोठमोठ्या लोकाग्रणींना लागून राहिली. त्यांच्या विचारामधून आणि उच्चारामधून आधुनिक मराठी वाङ्मयाचा उगम झाला.

लोकहितवादी, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक आणि गोपाळराव आगरकर ह्या प्रचंड पुरुषांच्या अंत:करणात ज्या मोठमोठ्या खळबळी त्या काळात झाल्या, त्यांच्या धारा साहित्यात उचंबळून उठल्या. आपल्या ईश्वरविषयक कल्पनात, धार्मिक तत्त्वज्ञानात, सामाजिक आचारविचारात आमूलाग्र क्रांती

व्हावयाला हवी असे काही विचारवंत म्हणू लागले. तर परकीय सत्तेचे वर्चस्व ह्या देशातून झुगारून दिल्यावाचून ह्या देशातील जनतेचा उद्धार होणे अशक्य आहे, असा दुसऱ्यांनी आग्रह धरला. देशकल्याणाच्या नि लोककल्याणाच्या अशा विविध नि प्रबळ भावना त्या वेळच्या वातावरणात वावरत होत्या. म्हणून त्यावेळी निर्माण झालेल्या साहित्यात जनमनावर प्रभाव पाडण्याचे विलक्षण सामर्थ्य आढळून येते. काही काळाने धार्मिक आणि सामाजिक क्रांतीचा विचार मागे पडला आणि राजकीय क्रांतीची रणशिंगे नि नगारे वाजू लागले.

देशातील झुंझार पत्रकार स्वातंत्र्याचे राजकारण आपपल्या लेखणींनी लढू लागले. राष्ट्रवादाला अमाप उधाण आले. त्यातून महाराष्ट्रात वाङ्मयाचे देदीप्यमान मौक्तिकधन पुन्हा उधळले गेले. शिवरामपंत परांजपे, नरसिंह चिंतामण केळकर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, वीर सावरकर, अच्युतराव कोल्हटकर ह्यांच्या ज्वलंत स्वातंत्र्यप्रेमातून तेजस्वी वाङ्मय जन्माला आले. उज्ज्वल ध्येयाच्या नि उदात्त मूल्याच्या पूजेमधूनच उत्तम वाङ्मय जन्माला येते. ज्ञानाची उपासना करून बुद्धी जागृत ठेवल्याखेरीज ध्येयाचा साक्षात्कार होऊ शकत नाही.

गेल्या शंभर वर्षांचा भारताचा इतिहास जर आपण पाहिला तर भारताला सर्व पुरोगामी विचार आपल्या महाराष्ट्रात निर्माण झालेला आहे. ही एक ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. स्वातंत्र्याचा नि धार्मिक अन् सामाजिक समतेचा आद्य विचार महाराष्ट्रातच प्रथम जन्माला आला. त्याचे कारण गीतेचे तत्त्वज्ञान भारतामध्ये इतरांपेक्षा मराठी माणसांच्या जीवनात मुरलेले आहे. गीता जन्माला आली उत्तरेला. पण तिचे तत्त्वज्ञान पिकले महाराष्ट्रात. गीतेच्या निकषावर विद्वत्ता घासून पाहिल्याखेरीज तिची कसोटी ह्या महाराष्ट्रात लागत नाही. विनोबांची 'गीताई' हे काही गीतेचे रूपांतर नाही. ती विनोबांच्या महाराष्ट्रीय रसवंतीमधून नव्याने उचंबळलेली गीता आहे. विनोबांच्या 'गीताप्रवचने' ह्या ग्रंथात तर मराठी भाषेचा आणि साहित्याचा दिमाख लखलखतो आहे. ते एक मूर्तिमंत काव्यच आहे. ज्ञानेश्वरी मराठी साहित्याचा पाया म्हटले, तर 'गीताप्रवचने' हा कळसच म्हटला पाहिजे.

विनोबांचे शिष्य सानेगुरुजी ह्यांची 'श्यामची आई' हे एक महन्मंगल वाङ्मय आहे. जे ओजस्वी असेल, जे मंगल असेल, जे पवित्र असेल, तेवढ्याचाच फक्त वाङ्मयात प्रवेश व्हावा. अमंगल आणि अनिष्ट गोष्टीच्या प्रदर्शनाने समाजाचे मन नि जीवन गढूळ करण्याचा लेखकांनी प्रयत्न करू नये.

संत विनोबा म्हणतात, 'जे मन शुद्ध करते तेच साहित्य'. केवड्याचे कणीस कपड्यात ठेवले की त्याला कसर लागत नाही. त्याप्रमाणे समाजाच्या हृदयाला कोणत्याही अमंगळाची कसर लागू नये, एवढेच नव्हे, तर ते जास्त सुगंधित व्हावे, म्हणून त्यात

वाङ्मयाचा केवडा घालून ठेवायला हवा. वाङ्मयाचा समाजमनावर फार परिणाम होतो. समाजाचे मन वाङ्मयाने द्रवते आणि बदलते.

महात्मा फुले ह्यांनी मुलींची पहिली शाळा १८४८ मध्ये काढली. त्यावेळी शाळेत जाणाऱ्या मुलींवर लोक दगड फेकीत. इतका स्त्री-शिक्षणाला लोकांचा विराध होता. पण पुढे स्त्रीशिक्षणाला लोकमत अनुकूल करण्याचे कार्य अनेक प्रभावी लेखकांच्या लेखनामुळेच झाले. उच्चवर्णीय विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्नही असाच एकवेळ विकट होता. गडकऱ्यांना 'प्रेमसंन्यास' ह्या नाटकातसुद्धा विधवेचे लग्न लावण्याचे धैर्य झाले नाही. पण ही परिस्थिती निबंधकारांनी, कादंबरीकारांनी, कवींनी नि नाटककारांनी बदलून टाकली. समाजाची मने बदलण्याची अशी विलक्षण शक्ती वाङ्मयात आहे. पण तशा दृष्टीने वाङ्मयकारांनी प्रयत्न केला पाहिजे.

आज देशापुढे काही मूल्ये आहेत. स्वातंत्र्य आले आहे. पण अद्याप समता आलेली नाही. जातिभेद आणि अस्पृश्यता हे समतेच्या मार्गातील दोन प्रचंड अडथळे आहेत. हे अडथळे कसे नाहीसे करावयाचे? देशात नव्वद टक्के लोक निरक्षर आहेत. त्यामुळे आमच्या वाङ्मयाची हाक लांबवर ऐकूच मुळी जात नाही. भारताच्या जीवनातील हे सर्व दोष आपणाला नष्ट करून टाकावयाचे आहेत. भारताचे तत्त्वज्ञान विश्वशांतीचे आणि विश्वप्रीतीचे आहे. या सर्व मूल्यांचा वाङ्मयकाराने आपल्या लेखनात पुरस्कार केला पाहिजे. महात्मा फुले ह्यांचा उज्ज्वल ध्येयवाद साहित्यिकांनी आपल्या समोर ठेवावा.

सर्वांचा निर्मिक आहे एक धनी,
त्याचें भय मनीं धरा सर्व.
न्यायाने वस्तूचा उपभोग घ्यावा,
आनंद करावा भांडूं नये.
धर्म-राज्य-भेद मानवा नसावें,
सत्याने वर्तावें ईशासाठीं.
'ज्योति' म्हणे जगीं सर्व सुखी व्हावें!
सर्व सुखी व्हावें, सर्व सुखी व्हावें!"

शुद्ध मराठी लिहावे आणि बोलावे

मराठी स्वातंत्र्याचे संस्थापक जसे शिवाजी महाराज तसे मराठी भाषेचे संस्थापक श्री ज्ञानेश्वर महाराज! सातशे वर्षांपूर्वी त्यांनी आपल्या मराठी भाषेची स्थापना केली. मोगलांविरुद्ध शिवाजी महाराजांनी जसे बंड उभारले तसे संस्कृत पंडितांविरुद्ध ज्ञानेश्वर महाराजांनी बंड उभारले. ज्ञानेश्वरासारखा बंडखोर लेखक मराठी भाषेत दुसरा झाला नाही. मुक्तीचे आणि भक्तीचे तत्त्वज्ञान संस्कृत भाषेच्या बंदिवासात पडलेले होते. लांब लांब समासांच्या कड्या-कुलपांतून सोडवून ज्ञानेश्वरांनी ते बाहेर आणले आणि शेतकऱ्यांच्या झोपड्यापर्यंत नेऊन पोचवले. मराठी भाषा ज्ञानेश्वरांनीच स्वतंत्र केली आणि त्यानंतर या मराठी भाषेच्या वृक्षाला असा काही सुंदर मोहोर आला म्हणता! तुकाराम, नामदेव, एकनाथ, जनाबाई या संत कवींनी मराठी भाषा अधिक शुद्ध, सुंदर आणि सामर्थ्यवान करण्याचा प्रयत्न केला.

खरोखर ज्ञानेश्वर महाराज म्हणतात त्याप्रमाणे, अमृताशी पैजा जिंकण्याचे सामर्थ्य आपल्या मराठी भाषेत आहे. म्हणून या शुद्ध मराठी भाषेचा अभ्यास आपण केला पाहिजे, आणि ती शुद्ध बोलायला आपण शिकले पाहिजे. संस्कृत भाषा ही सुंदर आहे. एक वेळ ती विद्वानांची भाषा होती. म्हणून मराठी बोलताना मधूनमधून संस्कृत शब्द घुसडणे हे विद्वत्तेचे लक्षण आहे, अशी पुष्कळांची समजूत आहे. पण ती खोटी आहे. माझ्या माहितीचा एक माणूस होता. त्याला वेळी-अवेळी संस्कृत शब्द वापरायची अशीच वाईट खोड होती. त्याने आपल्या बायकोस पत्र लिहिले, "वज्रचुडेमंडित सौभाग्यवती कौटुंबिनी हीस, परवा माझ्या प्रयाणकाळी संभ्रमाने माझे पायमोजे शयनगृहात पलंगाखाली पतन पावले आहेत, ते उत्तरपत्री कथन करण्याची मेहरबानी व्हावी." पुष्कळसे मराठी लेखक शुद्ध मराठी नामाच्या मागे सु आणि सत् या संस्कृत उपाधी लावून आपले लेखन हास्यास्पद करतात. मराठी 'वरा'ला संस्कृत 'सु-वर' करण्याचा हा नाद काही चांगला नाही. बहुजनसमाजातील काही अडाणी अशिक्षित माणसेही आपल्याला कळत नाहीत असे संस्कृत शब्द वापरून स्वत:चे हसे करून घेतात.

बहुजनसमाजाला जी भाषा समजते, तीच खरी शुद्ध मराठी भाषा. राजर्षी शाहूमहाराज पुष्कळदा मुद्दाम शेतकऱ्यांची भाषा वापरीत असत. आणि शेतकऱ्यांसारखे उच्चार करीत. ते त्यांचे बोलणे कानाला फारच गोड लागे. शेतकऱ्यांच्या भाषेला कुणबी भाषा असे म्हणून हिणविणे बरे नाही. 'लई' म्हणण्यात काही एक 'वंगाळ' नाही. नाना पाटील हे

काही फारसे शिकलेले नाहीत. तथापि, कोणताही विषय शेतकऱ्यांच्या सभेमध्ये त्यांना सहज समजेल अशा सोप्या आणि शुद्ध मराठी भाषेमध्ये ते समजावून सांगतात. एकदा एका सभेत ते म्हणाले, "बरं का शेतकऱ्यांनो, शेतांमधी विचका असतो. आम्ही त्याला विचका म्हणतो. तुम्ही त्याला म्हणता वेणा (हरळी). हा वेणा लई खराब असतो. शेताचा तो नास करतो. हा बेणा हतनं काढला थतं उगवतो, थतनं काढला तर पल्याड उगवतो. त्याला जमीन खोल खांडून तळापासनं काढूनशान टाकलं पायजे तवा तो नाहीसा होतो. आपल्या देशातलं साहेबाचं सरकार हे वेण्यासारखं आहे, त्याला थोडं थोडं काढून भागायचं नाही. त्याला भुईत शिरून आणि भूमिगत होऊनच उखडून काढलं पाहिजे!"

याला मी म्हणतो शुद्ध मराठी भाषा. गेल्या दीडशे वर्षांत अनेक इंग्रजी शब्द आपल्या मराठी भाषेत येऊन घुसलेले आहेत त्यांच्याविषयी मला काही म्हणावयाचे नाही. मला तिकीट शब्द चालेल, स्टेशन चालेल, अग्निरथविश्रामधाम चालणार नाही! राजशासनपत्रापेक्षा मनीऑर्डरच बरी. प्रत्येकाला इंग्रजी भाषा उत्तम आली पाहिजे. इंग्रजी भाषा आणि साहित्य आपल्याला हवे आहे. तथापि, मराठी बोलताना इंग्रजी बोलू नये आणि इंग्रजी बोलताना मराठी बोलू नये. एकदा रस्त्यावरून जाताना दोन मुले मोठमोठ्याने बोलत असताना मी ऐकले. एक म्हणाला, "या question चा कितीही deeply विचार केला तरी त्यातील कल्पना clear होत नाही." हे असले वाडगे मराठी बोलायचे आता आपण ताबडतोब थांबवले पाहिजे.

मुंबईत आणि नागपुरात लोकांच्या भाषेत गुजराती आणि हिंदी शब्दांची सरभेसळ होते, तीही चांगली नाही. नागपूरच्या एका हिंदी गृहस्थाकडे मी एकदा गेलो असताना माझ्या एका नागपुरी मित्राने त्या गृहस्थाच्या वडिलांचा फोटो ओटीवर लावला होता तो मला दाखवून म्हटले की, हे 'आप'ले वडील. मी गोंधळून म्हणालो, "छे, छे! भलतेच काय बोलता? हे कुठले आमचे वडील!" मागाहून मला कळले की 'आप'ले म्हणजे 'ह्यांचे'! मी इंग्रजीच्या किंवा हिंदीच्या विरुद्ध नाही. उलट प्रत्येक मुलाला हिंदी ही राष्ट्रभाषा आणि इंग्रजी ही विश्वभाषा उत्तम तऱ्हेने आली पाहिजे अशा मताचा मी आहे.

मराठी भाषा बोलणारांचे उच्चार इतर भाषा बोलणारांपेक्षा अधिक चांगले असतात. उत्तर हिंदुस्थानच्या लोकांना आपल्याप्रमाणे जोडाक्षरांचा उच्चार करता येत नाही. 'स्कूल'ला ते 'इस्कूल' म्हणतात आणि ज्ञानाला ते 'अग्यान' म्हणतात. बंगाली लोकांना 'अ'चा आणि 'व'चा उच्चार करता येत नाही. 'कमल वदन'च्या ऐवजी 'कोमोलो वोदानो' असे ते म्हणतात. अशा उच्चाराच्या भयाण चुका मराठी बोलणारांच्या तोंडून होणार नाहीत, याबद्दल आपणाला अभिमान वाटला पाहिजे.

चिरंतन साहित्याचे लक्षण

साहित्य म्हणजे 'अमर शब्द.' असामान्य शब्दांत सांगितलेला अलौकिक विचार म्हणजेच साहित्य. शब्द हा साहित्याचा देह. विचार किंवा भावना हा साहित्याचा आत्मा. जे लिहिले जाते, बोलले जाते किंवा छापले जाते ते साहित्य असे आपण मानतो. जन्माला येतो तो मनुष्य असे म्हणण्यासारखेच हे आहे. साहित्याची पदवी फार मोठी आहे. शब्दात विचाराचे किंवा भावनेचे चिरंतनत्व असल्याखेरीज त्याचा साहित्यात समावेश होऊ शकत नाही. म्हणून साहित्य हे सामान्य माणसाचे काम नव्हे. समर्थ म्हणतात, 'शारदा हे महापुरुषाची भार्या. महापुरुष पुढे चालतो आणि साहित्य त्याच्या मागोमाग भार्येसारखे चालते. (अर्थात आजच्या भार्येसारखे नव्हे. कारण आजची भार्या पतीच्यापुढे दोन पावले धावते.)

महापुरुषाचे नुसते निःश्वसन म्हणजे साहित्य. अर्जुनाने लढावे की न लढावे असा साधा प्रश्न श्रीकृष्णाला केला. श्रीकृष्णाने आपल्या उत्तरात मानवी जीवनाची सारी समस्या सोडवून सांगितली. तो 'अमर शब्द' ठरला. सर्व काली सर्व मानवांना श्रेयस्कर होईल असा संदेश श्रीकृष्णाने मानवांना देऊन ठेवला आहे. 'तू स्वतःशी जसा वागतोस तसा दुसऱ्यांशी वाग!' यापेक्षा अधिक कल्याणकारक तत्त्वज्ञान जगात दुसरे कोणते आहे? मी मला फसवीत नाही. तसेच दुसऱ्याला मी फसवू नये. मी माझी हिंसा करीत नाही. तशी दुसऱ्याची मी हिंसा करू नये. मी माझ्यावर प्रेम करतो. तसे मी दुसऱ्यावर प्रेम करावे. मानवी जीवनाचे सारे सूत्रच मुळी ह्या संदेशात आले.

हजारो वर्षे काही शब्द आणि काही काही विचार टिकून राहतात. मानवांना ते स्फूर्ती देतात. मानवी जीवनाचे मार्गदर्शन करतात. ते का? ज्ञानेश्वर महाराज किंवा तुकोबा यांची वाणी अद्यापि अभंग कशी राहिली? ज्ञानेश्वरांनीच चिरंतन साहित्याचे लक्षण एका ठिकाणी सांगितले आहे.

वाचें बरवे कवित्व।
कवित्वीं बरवे रसिकत्व।
रसिकत्वीं परतत्त्व।
स्पर्शु जैसा॥

भाषेमध्ये काव्य उत्तम. काव्याला रसामुळे बहर येतो. आणि रसाला परतत्त्वाचा स्पर्श झाला म्हणजे मग त्याची गोडी काय वर्णावी? साहित्याच्या चिरंतनत्वाची कसोटीच

ज्ञानेश्वरांनी येथे सांगितली आहे. ज्या वाङ्मयाला परतत्त्वाचा स्पर्श झाला आहे ते वाङ्मय अमर. परतत्त्वाचा स्पर्श म्हणजे काय? त्याचीही ज्ञानेश्वरांनी कल्पना दिलेली आहे. 'जें जें भेटे भूता तें तें मानिजे भगवंता' प्रत्येक भूतमात्रांत ज्याला भगवंताची मूर्ती दिसते त्याच्या बुद्धीला परतत्त्वाचा स्पर्श झाला आहे असे म्हणावयास काही हरकत नाही. ईश्वर हा देवळात नाही, तीर्थक्षेत्रात नाही, जगावाहेर नाही. प्रत्येक भूतमात्रांत ईश्वर आहे. हा साक्षात्कार आमच्या साधूसंतांना झाला म्हणून त्यांचे वाङ्मय अमर झाले. आम्ही मानवतेच्या उद्धाराच्या गोष्टी करतो. पण संतांची दृष्टी मानवतेच्या पलीकडे गेली होती. 'भूतांची दया हें भांडवल संता।' भूतदयेने त्यांची हृदये ओथंबलेली होती.

साधू कोण? देव कोण? जो रंजल्यागांजल्यांना, अनाथ आपंगितांना हृदयाशी धरतो तो. लोककल्याण ही चिरंतन वाङ्मयाची कसोटी आहे. वाङ्मयाने जनमनावर परिणाम केला पाहिजे. जनतेचे जीवन बदलले पाहिजे. वाङ्मयाने माणसाच्या मनावर परिणाम होतो किंवा काय अशी कित्येकांना शंका आहे. अशा माणसांना वाङ्मयाचे सामर्थ्यच मुळी कळलेले नाही. जीवनात क्रांती घडवून आणण्याची शक्ती जर कशात असेल तर ती वाङ्मयात. माणूस काय कायद्याने बदलतो? मनुष्य हा जबरदस्तीने कधीच बदलू शकत नाही. मनुष्य प्रेमाने बदलतो, कायद्याने नव्हे.

मनुष्याच्या हृदयावर परिणाम करण्याचे विलक्षण सामर्थ्य वाङ्मयात आहे. वाङ्मय एकदम हृदयाची पकड घेते आणि त्यामुळे माणसाच्या आचारविचारात परिवर्तन होते. अर्थात वाङ्मयाचा परिणाम समाजमनावर एकदम होत नाही. समाजाच्या जीवनावर त्याचे सतत सूक्ष्म संस्कार होत राहतात आणि कालांतराने समाजाच्या वृत्तीत बदल घडतो.



संत केवळ साहित्यिक होते काय?

वाङ्मयापेक्षा मला अधिक प्रिय काही नाही. वाङ्मय म्हणजे जीवनातला मधु. जीवनात सर्वत्र मधु भरलेला आहे. विषही आहे. पण मधमांशांप्रमाणे वाङ्मयप्रकार उत्तम मधूच गोळा करतात. वाङ्मय म्हणजे मधाचे पोळे. कोळ्याचे जाळे नव्हे. मधाच्या पोळ्यापेक्षा कोळ्याचे जाळे दिसते सुंदर. त्याचे धागे किती नाजूक. रचना किती कलात्मक. पण माशांना मारण्याचा तो फास आहे. दुसरे काय? त्या जाळ्यात अडकणे म्हणजे मरण. मधाच्या पोळ्यात कला नसते असे नाही. त्याच्या रचनेत केवढे कौशल्य असते! पण पोळ्यातल्या कलेला महत्त्व नाही. मधाला महत्त्व. मध म्हणजे जीवन. जो ते पितो, तो जिवंत होतो. वाङ्मयात शब्दांना महत्त्व नाही. कलेला नाही, तंत्राला नाही, त्यात मध आहे की नाही हा प्रश्न महत्त्वाचा आहे. भांड्याला किंमत नाही. त्यात काय भरले आहे ह्याला किंमत आहे.

वाङ्मयाने जीवनात माधुरी उत्पन्न झाली पाहिजे, हर्ष निर्माण केला पाहिजे, नवीन दृष्टी दिली पाहिजे. ज्ञानेश्वर, तुकाराम, विनोबा किंवा सानेगुरुजी ह्यांचे वाङ्मयय म्हणजे मधाची पोळी. त्यातला मध प्यावा नि अमर व्हावे. त्याच्या उलट, फडक्यांच्यां कामुक कादंबऱ्या म्हणजे कोळ्यांची जाळी. त्यांची कला सुंदर, पण वाचक त्यात अडकले म्हणजे मेलेच. वाङ्मय म्हणजे जीवनाचा अनुभव. कलेचा विलास नव्हे. मधमाशी मध कशी गोळा करते? तिला हिंडावे लागते. फुलाफुलांकडे जावे लागते. मध हे सत्य आहे. कल्पना नाही. ते शोधावे, तेहा मिळते. पण कोळी काही हिंडत नाही. तो बसल्या बसल्या जाळे विणतो. त्याच्या तोंडातून तंतू निघतात. कोळ्याचे जाळे म्हणजे निव्वळ कल्पना.

पुष्कळसे लेखक घरातच बसतात. पुस्तके वाचतात आणि जाळी विणतात. पण हे त्यांचे लेखन क्षणजीवी असते. त्यात सत्य नसते. जीवनाचा शोध नसतो. वाङ्मयकारांनी जीवनाकडे जायला पाहिजे. जीवनाचे संशोधन केले पाहिजे. सेवेच्या कोणत्या ना कोणत्या तरी क्षेत्रामध्ये उडी घेतली पाहिजे. साहित्यात जीवनाचा साक्षात्कार घडावयाला पाहिजे. जीवनाचा अनुभव असल्याखेरीज हे कसे होईल? आजकाल साहित्याचा अध:पात झाला आहे. हा कोण तर म्हणे कवी. तो कोण तर म्हणे कादंबरीकार. धंदा काय करता? तर म्हणे नुसत्याच कविता अन् कादंबऱ्या लिहितो. पूर्वीचे संत हे काय नुसते साहित्यिक होते? ते लोकसेवक होते. नुसतेच कवित्व करावयाची तुकोबांना लाज वाटत होती. ते देवाला दु:खाने म्हणाले, "देवा, अजून मला पुरता अनुभव नाही. मग मी काय नुसता

कवी होऊ अन् जगात माझं हसू करून घेऊ काय रे?'' कबीराने तर शाईला आणि कागदाला कधी हातही लावला नाही. 'मसि कागद छूयो नहिं!' – कबीर शेले विणायचा आणि विणता विणता जीवनाचे तत्त्वज्ञान गायचा.

वाङ्मयात रंजन तर हवेच. पण त्यात जागृती पाहिजे. समाजात डोंगराएवढे अज्ञान आहे. लक्षावधी लोक झोपले आहेत. त्यांना कोण उठवणार? जे निजले आहेत त्यांनाच जागे करावे. जे जागे आहेत त्यांना उठवण्यात काय शहाणपण आहे? पुष्कळसे लेखक अज्ञानांना सज्ञान करण्याऐवजी पंडितांना महापंडित करण्याच्या मागे लागले आहेत. संस्कृतच्या आणि पांडित्याचा दंभ माजला म्हणून बहुजनांच्या उद्धारासाठी मराठी भाषेचे निशाण संतांनी हाती धरले. मराठीचा पक्ष हा बायाबापड्यांचा आणि स्त्री-शूद्रांचा पक्ष आहे. मराठी लेखकांनी हे कदापि विसरू नये. समाजातले खड्डे अन् खाचखळगे अधी भरा. मनोरे कसले बांधताहात? ज्ञानेश्वर म्हणतात :

निम्न भरलिया विणें।
तोयि ठळेचि नेणें
नेति आता तोषोनि जाणें।
सामोरे पा

वाटेतला खड्डा भरून काढल्यावाचून पाणी पुढे वाहात नाही. त्याप्रमाणे श्रांत पीडितांना संतुष्ट केल्यावाचून समाजाची प्रगती मुळी होतच नाही. महापुरुषांचे लक्ष खाली असते, वर नसते. ते खाली पाहून चालतात.

धर्मनि आणि ज्ञानाने आजपर्यंत अज्ञ जनांचा बुद्धिभेद केला. जीवनापेक्षा मरणाला अन् मोक्षाला त्यांनी महत्त्व दिले. त्यामुळे वैराग्याचे, जपजाप्याचे नि क्रियाकर्माचे अवडंबर माजले. तीर्थांचे, देवळांचे आणि मूर्तिपूजेचे प्रस्थ वाढले. भिक्षुक आणि पुजारी गोरगरिबांना राजरोस लुटू लागले. म्हणून जनतेच्या उद्धारासाठी संतांना धावून यावे लागले.

मराठी साहित्यात उत्कटता कशामुळे येईल ?

वाङ्मयाने लोकांच्या मनावर निश्चित परिणाम होतो. म्हणून वाङ्मयातून केवळ भव्य आणि आदर्श जीवनाचेच चित्रण करावयाचे हाच सर्व प्राचीन साहित्यकारांचा दृष्टिकोन होता. नुसत्या मनोरंजनासाठी प्राचीन काळी काहीही लिहिले जात नव्हते. पण उदात्त भावना आणि तेजस्वी कल्पना जास्तीत जास्त मनोरंजक कशा करता येतील, ह्याचाच प्राचीन साहित्यकारांना ध्यास लागलेला होता. गुणाढ्य कवीने 'कथासरित्सागर' लिहिला. त्यातील पुष्कळसा भाग त्याने जाळून टाकला. पण तो जाळण्यापूर्वी त्याने त्याचे जाहीर पठन केले. ते ऐकून पशुपक्षीही धाय धाय रडले. कथासरित्सागारातल्या सर्व गोष्टी अद्‌भुतरम्य आणि काल्पनिक आहेत. पण त्यात मानवी जीवनातील सर्व सद्‌गुणांचे आणि सद्‌भावनांचे असे काही देदीप्यमान प्रदर्शन कवीने मांडलेले आहे, की वाचकांचे डोळे दिपतात. एखादी गोष्ट खरी आहे की काल्पनिक आहे हा प्रश्न नाही. त्यात कोणती भावना प्रकट झाली आहे ही महत्त्वाची गोष्ट आहे. बोकॅशियोच्या 'बहिरी ससाणा' या गोष्टीत आपल्या प्रेयसीसाठी प्रेमिक जास्तीत जास्त किती त्याग करू शकतो ह्याचे अत्यंत हृदयद्रावक चित्र पाहावयाला सापडते. अशी विलक्षण गोष्ट जगाच्या वाङ्मयात दुसरी नसेल.

चंद्रशेखर कर्वींची 'काय हो चमत्कार' ही कविता एक 'पिशाच्च' कथा आहे. ती खरी असणे संभवनीय नाही. पण त्या कथेत प्रेमाची निष्ठा मरणोत्तरही कशी टिकते याचे कवीने केलेले चित्रण आतड्यांना पीळ पाडते. साहित्यात उत्कट जीवनाचा आणि भावनांचा उत्कट साक्षात्कार व्हावयाला पाहिजे. जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव असल्यावाचून वाङ्मयात ही उत्कटता यावयाची नाही. प्राचीन काळातील अमर वाङ्मय हे जीवनाच्या तपश्चर्येतून निर्माण झाले आहे, हे आपण विसरता कामा नये. वाङ्मय हे त्यांच्या जीवनाच्या सेवेचे माध्यम होते. ऋषींनी काही केवळ साहित्यनिर्मिती करण्याच्या दृष्टीने वेद रचले नाहीत.

ज्ञानेश्वर हे महाकवी होते, असा एका विद्वान प्राध्यापकांनी नुकताच शोध लावला आहे. वाघ हे एक मोठे मांजर आहे असे म्हणण्यापैकीच हे आहे. ज्ञानेश्वर हे मानवतेचे महान् उद्धारकर्ते होते. ते त्यांचे मूळ स्वरूप. ते महाकवी होते ह्या नंतरच्या गोष्टी. तुकोबांना कवी म्हणवून घ्यावयाची लाज वाटत होती. 'काव्य करण्यासाठी का रे ही माझी खटपट आहे?' असे त्यांनी एके ठिकाणी देवाला कळवळून विचारलेले आहे. विनोबा आणि साने गुरुजी ह्यांनी मराठी भाषेत अमर साहित्य लिहिले आहे. पण ते

साहित्यिकांच्या वाऱ्यालाही कधी उभे राहिले नाहीत. 'मला साहित्यातले काहीही कळत नाही.' असे साने गुरुजी म्हणत. विनोबांची 'गीताई' काव्यदृष्ट्या पाहिली तर 'महाकाव्य' आहे. पण ते आपल्याला कवी म्हणवीत नाहीत. साहित्यिक हे जनतेचे सेवक आहेत, ही त्यांची खरी भूमिका आहे. ती ते आजकाल पार विसरून गेले आहेत. ते स्वत:ला नुसते साहित्यिक म्हणवीत आहेत. ही निर्भेळ कवींची, कथाकारांची आणि लेखकांची पैदास थांबल्यावाचून साहित्याची प्रतिष्ठा वाढणे अशक्य आहे. समाजसेवेच्या कोणत्या ना कोणत्या तरी क्षेत्रामध्ये साहित्यिकांनी स्वत:ला वाहून घेतले पाहिजे. तरच साहित्याकडे पाहण्याची दृष्टी त्यांना येईल आणि त्यांच्या हातून जिवंत व प्रभावी साहित्य निर्माण होईल.

सेवेपासून साहित्याची फाळणी झाल्यामुळे साहित्याचा अध:पात झालेला आहे. आजकाल विकृत आणि कृत्रिम लिखाणाची जी साथ मराठी वाङ्मयात आलेली आहे तिचे कारण ह्या वाङ्मयाची उभारणी सेवेच्या पायावर झालेली नाही. नुसती कल्पनेची जळमटे जमविली म्हणजे साहित्य निर्माण होते अशी त्या लेखकांची कल्पना आहे. उत्तम वाङ्मय हे जीवनाला कसर न लागू देणारे आणि जीवन सुगंधित करणारे 'केवड्याचे कणीस' होय. काय वाटेल ते झाले तरी समाजजीवन दूषित करण्याचे काम साहित्यकाराच्या हातून घडले न पाहिजे. साहित्याने जीवन शुद्ध आणि सुगंधित झाले पाहिजे. आमच्या गावाला एक ओढा आहे. तो नागरमोथ्याच्या बेटांतून वाहतो. त्यामुळे त्याच्या पाण्याला नेहमी नागरमोथ्याचा सुगंध येतो. असा वाङ्मयाला सद्भावनेचा आणि प्रफुल्लित विचारांचा सुवास यावयाला पाहिजे. महाभारताला भारताच्या राष्ट्रीय काव्याची जी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे ती काय उगाच? मानवतेच्या कल्याणाच्या आणि उद्धाराच्या कथांनी आणि संदेशांनी ते आमूलाग्र खचलेले आहे. महाभारताच्या अखेरीस एका लहानग्या कथेत त्याचे जे सार दिले आहे ते तरी किती उद्‌बोधक आहे!

यादवांचा नाश झाल्यानंतर जीवनाचा युधिष्ठिराला कंटाळा आला. परिक्षितीला राज्याभिषेक करून तो आपले बंधू आणि पत्नी यांसह स्वर्गाला जावयास निघाला. त्यांच्यामागून त्यांच्याबरोबर एक कुत्रा निघाला. मेरू पर्वतावर चढताना प्रथम द्रौपदी मरून पडली. भीमाने विचारले, 'ही का बरे मरण पावली?' युधिष्ठिर म्हणाला, 'पाच पांडवांची ही जरी बायको होती तरी तिचे खरे प्रेम अर्जुनावर होते. त्याचे फळ तिला मिळाले.' नंतर सहदेव मरून पडला. धर्म म्हणाला, 'त्याला आपल्या ज्ञानाचा गर्व झाला होता.' पुढे नकुल मेला. धर्म म्हणाला, 'त्याला आपल्या सौंदर्याचा गर्व झालेला होता.' पुढे अर्जुन मरून पडला. धर्म म्हणाले, 'त्याला आपल्या शौर्याचा गर्व झालेला होता.' त्यानंतर भीम खाली पडून तडफडू लागला. तेव्हा धर्मांनी त्याला सांगितले, 'तुला आपल्या शक्तीची घमेंड होती ना? त्याचे हे फळ!' शेवटी फक्त युधिष्ठिर व कुत्रा शिल्लक राहिले. स्वर्गाच्या

द्वारात इंद्र आपला रथ घेऊन धर्माच्या स्वागतासाठी उभा होता. त्याने रथात बैस असे धर्माला सांगितले. धर्म म्हणाला, 'मी एकटा नाही, माझ्याबरोबर हा कुत्रा आहे!' इंद्र म्हणाला, 'स्वर्गात कुत्र्याला जागा नाही!' तेव्हा धर्म म्हणाला, 'मग मला तुझ्या स्वर्गाची पर्वा नाही. माझी पत्नी आणि बंधू माझ्याबरोबर शेवटपर्यंत टिकले नाहीत. या कुत्र्याने मला शेवटपर्यंत सोबत केली. त्याला टाकून मी स्वर्गात येऊ म्हणतोस की काय?' तेव्हा इंद्र संतुष्ट होऊन त्याने दोघांना स्वर्गात प्रवेश दिला.

व्यास-वाल्मिकीचे हे महान् आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आजच्या साहित्यकारांनी मानवी जीवनाची उंची आणि प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ललित वाङ्मय हेच खरे लोकवाङ्मय

मराठी वाङ्मय पूर्णावस्थेला पोहोचलेले आहे असे समजण्याइतका दुधखुळा मी खास नाही. मराठी वाङ्मय दोषरहित आहे असे त्या वाङ्मयाच्या आंधळ्या भक्तालाही म्हणता येणार नाही. तथापि, गुणांकडे दुर्लक्ष करून दोषांचा निष्कारण बडिवार करण्याची वृत्ती ही काही हितकारक नाही. एखाद्या तरुणीच्या सौंदर्याकडे दुर्लक्ष करून तिच्या तोंडावरील दोन देवीच्या वणांचा गवगवा करण्यात हशील काय?

मराठी साहित्याकडे अत्यंत उत्साहाच्या आशावादी दृष्टीने पाहणारा मी एक माणूस आहे. हा कदाचित् माझ्या प्रकृतीचा परिणाम असेल. मला साहित्याची केवळ प्रगतीच दिसते आणि ही प्रगती अधिक झपाट्याने कशी होईल इकडेच माझे विचार धावतात. मराठी साहित्याचे सामर्थ्य गेल्या सतत सत्तर वर्षांत एकसारखे वाढले ह्यामुळे मला हर्ष तर वाटतोच पण त्यापेक्षाही स्वभाषेची आणि वाङ्मयाची ही सेवा ज्या निःस्वार्थी साहित्यिकांनी केली, त्यांच्या कष्टांचा, हालअपेष्टांचा आणि त्यागाचा तेजस्वी इतिहास डोळ्यांसमोर उभा राहिला म्हणजे अंतःकरण कृतज्ञतेने आणि अभिमानाने भरून येते. नोकरीवाचून किंवा काहीतरी धंदा केल्यावाचून स्वतंत्र उपजीविका करण्याचे ज्यांना दुसरे कोणतेही साधन नाही, पोटापाण्याच्या व्यवसायामध्ये वाचावयाला, विचार करावयाला, विश्रांती घ्यावयाला किंवा लिहावयाला ज्यांना वर्षानुवर्षे कधी क्षणाची देखील फुरसत मिळाली नाही, पोटाला चिमटा घेऊन, उपासमार करून, रक्ताची शाई करून लिहिलेले लिखाण छापावयाला देखील ज्यांच्याजवळ पैसा नाही किंवा ज्यांना हा पैसा द्यावयाला कोणी तयार नाही, स्वतःच्या प्रामाणिक मतासाठी आणि अढळ तत्त्वासाठी ज्यांना आपल्या नोकरीवरही पाणी सोडावे लागले, कदाचित् जनतेची हेटाळणी आणि सरकारचा रोषदेखील पत्करावा लागला, अशा दरिद्री शिक्षकांनी, भुकेकंगाल वृत्तपत्रकारांनी, कंगाल कारकुनांनी, बेकार वकिलांनी आणि विक्षिप्त विद्वानांनी या महाराष्ट्र-शारदेच्या कीर्तिमंदिरावर आपल्या अमर कर्तृत्वाचे कळस चढविलेले आहेत. मराठी साहित्याचा हा सारा विस्तार निःस्वार्थी लेखकांच्या दारिद्र्यावर, निष्ठेवर आणि त्यागावर उभारलेला आहे. साहित्यलेखन हा महाराष्ट्रातल्या बुद्धिमान माणसांचा एकमेव व्यवसाय झाला तरच मराठी भाषेचे आणि साहित्याचे त्यात कल्याण आहे. ह्याचा अर्थ असा की, लेखनावर साहित्यिकांची योग्य तऱ्हेने उपजीविका व्हावयाला पाहिजे. वाचनासाठी वाचकांनी पैसे खर्च करावयाला उत्सुक असले पाहिजे. 'फुकट लिहावे आणि फुकट वाचावे' ही परिस्थिती वाङ्मयाच्या सरधोपट

प्रसाराला उपकारक असली तरी जोमदार वाढीला मुळीच पोषक नाही. महाराष्ट्रात लोकप्रिय पुस्तकाच्या दोन हजार प्रतीदेखील एका वर्षात खपू शकत नाहीत, ही दुःखाची गोष्ट आहे. लोक शिक्षणासाठी जसा पैसा खर्च करतात, तसा त्यांनी साहित्यासाठी पैसा खर्च केला पाहिजे. गृहाच्या शोभेसाठी गृहिणीइतकीच ग्रंथांचीही आवश्यकता आहे हे तत्त्व जनतेच्या मनावर बिंबले पाहिजे.

मराठी वाङ्मयावद्दल बहुजन समाजाला आज जास्त जिव्हाळा वाटू लागलेला आहे, यातच मराठी भाषेच्या परंपरेचा विजय आहे. कारण संस्कृतच्या आणि पांडित्याच्या दंभाविरुद्ध बंड पुकारण्यासाठीच मराठी भाषेची स्वतंत्र प्राण-प्रतिष्ठा झाली. 'मराठीचा पक्ष हा सामान्यांचा, बायाबापड्यांचा, स्त्रीशूद्रादिकांचा, अतएव सकल जनतेचा पक्ष' म्हणूनच स्थापन झालेला आहे हे प्रा. पोतदारांनी आपल्याला सांगितलेच आहे. तेव्हा समाजाच्या खालच्या थरापर्यंत भाषेचे आणि साहित्याचे लोण पोहोचवून बहुजनसमाजाची वैचारिक क्रांती घडवून आणणे हेच आजच्या साहित्यिकांचे कर्तव्य आहे. मराठी भाषेच्या जन्मकाली प्राकृत जनाची भाषा म्हणून तिचा उपहास करणारा जसा अहंमन्य पंडितांचा एक पक्ष होता तशा मनोवृत्तीचे आजही दोन पक्ष आहेत.

मराठी भाषेत आपली विद्वत्ता व्यक्त करणे हे ह्या मंडळींना मानहानीचे वाटते. उत्तम इंग्रजी भाषा बोलणाराला आणि लिहिणाराला परप्रांती, परदेशी आणि राजदरबारी मान आणि कीर्ती मिळते. त्याच्या यशाच्या दुंदुभी कदाचित् जगातही वाजतात; तथापि, ज्या ज्ञानाचा स्वजनाला आणि स्वभाषेला काही उपयोग नाही त्याच्या दुंदुभी दिगंत वाजल्या तरी त्याची काय किंमत! आईवर प्रेम न करणाऱ्याची माणुसकी जितकी कवडीमोलाची असते, तितकीच मायभाषेत लेखन न करणारी विद्वत्ताही कुचकामी असते हे अगदी खरे. निरनिराळ्या विश्वविद्यालयीन परीक्षा उत्तम तऱ्हेने उत्तीर्ण झालेले शेकडो महाराष्ट्रीय पदवीवर दरवर्षी तयार झालेले दिसतात. परभाषेत मिळविलेले ज्ञान ह्या लोकांनी स्वतःच्या भाषेत आणि साहित्यात आणून ओतले पाहिजे. महाराष्ट्रात विद्वत्ता भरपूर आहे – पण त्या विद्वत्तेला स्वाभिमानाची बैठक नाही एवढेच कमी आहे. म्हणून –

आपणास जें जें ठावें। तें तें मराठीत लिहावें
शहाणें करून सोडावें। महाराष्ट्र!

असे माझे ह्या आंग्लाळलेल्या मराठी विद्वानांना सांगणे आहे.

मराठी भाषा आणि साहित्य हे जनतेसाठी आहे ह्या त्याच्या मूळ स्वरूपाचा उपहास करणारा किंवा त्याजवद्दल अविश्वास बाळगणारा असा दुसरा एक पक्ष आहे. या पक्षातील मंडळींना ज्ञानावद्दल विलक्षण आदर वाटतो. 'जे आपल्याला किंवा कोणालाही कळत नाही ते ज्ञान' अशी ह्यांची ज्ञानाची व्याख्या आहे. कळावयाला गोष्ट जितकी कठीण किंवा विकट तितके ते ज्ञान उच्च दर्जाचे अशी ह्या मंडळींची समजूत असते. अशा तऱ्हेने उच्च

दर्जाचे ज्ञान त्यांना दिसले की, त्या ज्ञानाला डोळे झाकून पण लांबून ते नमस्कार करतात. त्या ज्ञानाच्या जवळ जाण्याची त्यांची इच्छा नसते आणि पात्रताही नसते. लोकमान्यांचा 'गीतारहस्य' ग्रंथ प्रसिद्ध झाला तेव्हा तो ग्रंथ न वाचता देवघरात ठेवून त्याची पूजा करणारी मंडळी ह्याच पक्षातली होत.

ह्या मंडळींना 'ज्ञानाचे गुरव' किंवा 'पुजारी' म्हणावयाला हरकत नाही. ह्यांचे म्हणणे असे की, अशा तऱ्हेने उच्च ज्ञान ज्यात आहे तेच खरे साहित्य किंवा उच्च दर्जाचे साहित्य. ह्या उच्च साहित्याला सामान्य जनतेचे हात पोहोचले नाहीत तरी हरकत नाही; पण अशा तऱ्हेने उच्च साहित्य अधिकाधिक निर्माण होण्यातच साहित्याची खरी प्रगती आहे असे ह्यांना वाटते. ज्योतिषशास्त्र, कामशास्त्र इत्यादी गहन शास्त्रांवर दरवर्षी मराठीत ग्रंथनिर्मिती होत नाही म्हणून ह्यांना वाईट वाटते; उलट काव्ये, नाटके, कादंबऱ्या, गोष्टी ह्यांचे पीक दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे हे पाहून ह्यांना अगदी भडभडून येते. जे उच्च दर्जाचे शास्त्रीय साहित्य ग्रंथालयाच्या कपाटात वर्षानुवर्षे धूळ खात पडते ते त्यांना वंदनीय वाटते आणि ज्या वाङ्मयावर सामान्य वाचकांच्या उड्यांवर उड्या पडतात ते ललित वाङ्मय ह्यांना उपेक्षणीय वाटते. किंबहुना ललित वाङ्मय हे साहित्याचे अधमांग आहे असेच ह्यांचे मत आहे.

केवळ 'ज्ञानासाठी ज्ञान' हा दृष्टिकोण आता 'पुराणवस्तुसंग्रहालया'त जमा झालेला आहे. 'जीवनासाठी ज्ञान' हाच खरा आधुनिक दृष्टिकोण आहे. जुन्या जगातल्या पुष्कळ विद्या आणि शास्त्रे आजच्या युगामध्ये कुचकामी ठरली आहेत. हल्लीच्या जगातील जीवनाच्या झगड्यामध्ये जे ज्ञान उपयुक्त ठरते त्याच ज्ञानाची मनुष्याला जरूरी आहे. हे ज्ञान चार-दोन विद्वानांना मिळण्यापेक्षा सबंध जनतेला मिळाले पाहिजे. पैशाकडे जसा पैसा जातो तसे ज्ञानी माणसांकडेच अधिक ज्ञान जाते. भिकारी लोक अधिक भिकारी होतात. अडाणी लोक जास्त अडाणी होत जातात. विद्वानांना अधिक विद्वान करीत बसण्याची सध्या आवश्यकता नाही. ते कार्य थोडेसे तहकूब केले तरी हरकत नाही. बहुसंख्य अज्ञानी समाजातच सर्व ज्ञानाचा, विद्येचा आणि शास्त्राचा सर्रास प्रसार व्हावयाला पाहिजे. ज्ञान कितीही श्रेष्ठ असले तरी त्याचा उपयोग जर जनतेला झाला नाही तर त्याची काय किंमत? ज्ञान हे गंगेसारखे असावे. त्याचा उगम बुद्धीच्या उंच हिमालयामधून झाला असला तरी आयुष्याच्या सामान्य सपाटीवर राहणाऱ्या लक्षावधी जनतेला त्याने जीवन द्यावे.

ज्ञान देणाऱ्या शास्त्रीय साहित्याविरुद्ध मी नाही. तथापि बहुजनांना कळेल अशा सुगम भाषेत आणि सुलभ पद्धतीने हे साहित्य निर्माण व्हावयाला पाहिजे, लोकांना ते वाचता आले पाहिजे आणि समजले पाहिजे एवढेच माझे म्हणणे आहे. इंग्रजी भाषेत सामान्य सुशिक्षितासाठी 'पेंग्विन सेरीज्' सारख्या मालांतून जशा सर्व आधुनिक विविध विषयांवर

पुस्तिका प्रसिद्ध होतात, तशा तऱ्हेची पुस्तके मराठी भाषेत प्रसिद्ध व्हावयाला पाहिजेत. तथापि, अशा तऱ्हेचे लोकांसाठी तयार झालेले साहित्य वाचण्याची आवड जनतेमध्ये निर्माण होण्यासाठी जर कोणत्या वाङ्मयाची आधी जरुरी असेल तर ती ललित वाङ्मयाची. ललित वाङ्मय हे असे वाङ्मय आहे की, जनतेपर्यंत ते विनासायासाने पोहोचू शकते. लोक ते आवडीने आणि आनंदाने वाचू शकतात, गाऊ शकतात, रंगभूमीवर आणि रुपेरी पडद्यावर पाहू आणि ऐकू शकतात. समाजात साक्षरतेचा आणि वाचनाचा झपाट्याने प्रसार करून समाजाची वाचनाभिरुची वाढविण्याचे आणि समाजाला शिक्षण देण्याचे कार्य ललित वाङ्मयच करू शकते. समाजाच्या भावना प्रक्षुब्ध करून त्याच्या विचाराला आणि आचाराला वेगाने कलाटणी देण्याचे कार्य हे केवळ ललित वाङ्मयाचेच सामर्थ्य आहे, म्हणून ललित वाङ्मय हे लोकवाङ्मय आहे, तेच खरे राष्ट्रीय वाङ्मय आहे असे मी म्हणतो. गेल्या काही वर्षांत ललित वाङ्मयाची वाढ अधिकाधिक होत गेली ह्यात दुःख वाटण्याचे काहीच कारण नाही. उलट ही वाढ ह्याहीपेक्षा अधिक झपाट्याने होत गेली पाहिजे. अधिक गोष्टी, अधिक कादंबऱ्या, अधिक काव्ये, अधिक नाटके आणि चित्रकथा मराठी भाषेत निर्माण होऊन सबंध मराठी जनसमाजाची वाचनाची वाढती भूक भागविण्याची व्यवस्था झाली पाहिजे. इतर वाङ्मयापेक्षा ललित वाङ्मय हे कनिष्ठ दर्जाचे आहे हे म्हणणे खोटे आहे. ललित वाङ्मय हे सोपे आणि मनोरंजक असते हा काही त्याच्या निकृष्टपणाचा पुरावा नाही. उलट दुर्बोध गोष्टी सोप्या शब्दांत सांगता येणे हीच उत्कृष्ट साहित्याची कसोटी आहे, याची जिवंत साक्ष वर्षानुवर्षे चालत आलेल्या आणि हरघडी समाजाच्या तोंडी खेळणाऱ्या हजारो म्हणी आणि सुभाषितेच देतील! महाभारताचे तत्त्वज्ञान व्यासांनी गोष्टीरूपानेच श्रोत्यांना सांगितले आहे. येशू ख्रिस्ताने आपल्या धर्माची तत्त्वे 'रूपकात्मक कथे'मधूनच विशद केलेली आहेत. पंचतंत्र, हितोपदेश किंवा इसापनीती ह्यांची किंमत कोणत्याही नीतिशास्त्राच्या ग्रंथापेक्षा कमी नाही. ललित वाङ्मय निर्माण करणे हे काही सामान्य बुद्धिमत्तेच्या लेखकाचे काम नाही. युक्लिडच्या बुद्धिमत्तेपेक्षा इसापची बुद्धिमत्ता काय कमी होती? पाणिनीच्या विद्वत्तेशी काय कालिदासाच्या विद्वत्तेची तुलना करता येणार नाही? इतिहासाचार्य राजवाडे ह्यांच्या प्रखर प्रतिभेपुढे हरिभाऊ आपटे ह्यांची प्रतिभा काय निस्तेज दिसेल? किंबहुना उत्कृष्ट ललित वाङ्मय निर्माण करणे हे केवळ प्रतिभाशाली बुद्धिमंताचेच कार्य आहे. नाझी तत्त्वज्ञानाचा प्रचारक डॉ. गोबेल्स ह्याने युरोपियन ग्रंथकारांपुढे भाषण करताना हेच सांगितले की, 'सामान्य श्रमजीवी जनतेला आज गोष्टीवाङ्मयाची फार जरुरी आहे. मात्र हे वाङ्मय नवख्या लेखकांनी न लिहिता बुद्धिमान तज्ज्ञांनीच लिहिले पाहिजे.'

ललित वाङ्मय हे खरे लोकवाङ्मय आहे ही भूमिका एकदा कायम केल्यानंतर हे ललित वाङ्मय अधिक तेजस्वी आणि सामर्थ्यवान कसे होईल, लोकरंजनाचे, लोकशिक्षणाचे

आणि लोकजागृतीचे त्याचे कार्य अधिक प्रभावशाली कसे होईल याचा विचार करणे अवश्य आहे. कलात्मक मनोरंजन हे तर ललितवाङ्मयाचे स्वरूपच आहे. तथापि, केवळ मनोरंजन करणे एवढेच ललित वाङ्मयाचे उद्दिष्ट नव्हे. समाजाच्या विविध जीवनावर प्रकाश पाडून, त्या जीवनातील प्रागतिक प्रवृत्तीचा पुरस्कार करावयाचा हा ललित वाङ्मयाचा प्रधान हेतू आहे. हरिभाऊ आपटे, देवल, कोल्हटकर, गडकरी, वरेरकर, खांडेकर इत्यादी प्रमुख ललितलेखकांनी असा सामाजिक हेतू मनात धरून वाङ्मय निर्माण केलेले आहे. इतर ललितलेखकांनीही हीच परंपरा पुढे चालविलेली आहे. आज समाजात इतके उद्योग, इतके व्यवसाय, इतके धंदे आहेत की त्यांचे पडसाद आमच्या ललित वाङ्मयात का पडू नयेत? पण ठराविक चाकोरी सोडून नवीन वाटेने जाण्याचे आमच्या लेखकांना धैर्यच होत नाही. एक शिक्षण हाच विषय घ्या. ह्या विषयाच्या कितीतरी बाजू चितारण्यासारख्या आहेत. जीवनापासून शिक्षणाची फारकत झाल्यामुळे सुशिक्षितांची बेकारी कशी वाढत चाललेली आहे, नोकरी हे शिक्षणाचे एकच ध्येय झाल्यामुळे लोक परावलंबी आणि स्वाभिमानशून्य झाले आहेत ह्या गोष्टीकडे लेखकांचे का लक्ष जाऊ नये? देशात निरनिराळ्या तऱ्हेच्या शिक्षणसंस्था आहेत; 'शांतिनिकेतना'सारखे निरनिराळे शिक्षणप्रयोग चाललेले आहेत; देशी भाषेतून शिकविणारे स्त्रियांचे विश्वविद्यालय आहे, अनाथ स्त्रियांना स्वावलंबी करणाऱ्या सेवासदन, मुक्तिसदनसारख्या संस्था आहेत, समाजाच्या दृष्टीने पतित ठरलेल्या स्त्रियांच्या साहाय्यासाठी 'श्रद्धानंद आश्रम' आहेत, सर्व जातींच्या आणि धर्मांच्या विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे आणि ऐक्याचे धडे देणारी भाऊराव पाटलांची वसतिगृहे आहेत; आंधळ्यांच्या किंवा गुन्हेगार तरुणांच्या शाळा आहेत; ह्या सर्व वातावरणाचा उपयोग ललितलेखकांनी करून घेतला पाहिजे.

सामाजिक जीवनांतील पुरःसर प्रवृत्तींचे निदान करण्यासाठी लेखकाला त्या त्या विषयाचे अचूक ज्ञान असावे लागते. तरच तो वस्तुस्थितीचे यथायोग्य चित्रण करू शकेल. वस्तुस्थितीचे चित्रण करणे ह्याचा अर्थ समाजात जशा गोष्टी असतात, दिसतात, घडतात, तशा त्या रंगविणे असा नाही. अशा वाङ्मयाला वास्तववादी वाङ्मय म्हणता येणार नाही. जसे घडते तसे वर्णन करावयाला चातुर्याची किंवा बुद्धिमत्तेची फारशी जरूरी नाही आणि वाङ्मय ही काही वस्तूंच्या वर्णनाची जंत्री नव्हे. समाजपरिस्थितीचे निदान करणारे वाङ्मय हेच खरे वास्तववादी वाङ्मय म्हणता येईल.

मराठी जनतेची विठाई माऊली!

मराठी जनतेच्या जीवनात फक्त दोनच सण आहेत. एक आषाढी आणि दुसरा कार्तिकी. हे सण भोजनाचे नव्हेत. उपवासाचे आहेत. एकादशीचे व्रत ह्या दिवशी पाळावयाचे आणि विठ्ठलाचे नामस्मरण करावयाचे.

नाम विठोबाचे घेईन मी वाचें।
बीज कल्पांताचें तुका म्हणे॥

ह्या दोन सणांचा अपूर्व सोहळा फक्त पंढरीसच पाहावयाला मिळतो. चंद्रभागेच्या वाळवंटात त्या दिवशी विठ्ठलनामाचा प्रचंड बाजार भरलेला असतो. वैकुंठीचे सर्व 'केणे' तेथे त्या दिवशी आलेले असते. कैवल्याच्या राशीच्या राशी त्या ठिकाणी येऊन पडलेल्या असतात. पंढरीच्या वारकऱ्यांना ही मोक्षाची पेठ त्या दिवशी इनाम मिळालेली असते. कोणीही यावे आणि तिला पाहिजे तितके लुटून न्यावे. पंढरी ही महाराष्ट्रातल्या सर्व वारकऱ्यांची मिरास आहे. महाराष्ट्रातील जनतेला मोक्षासाठी काशीवाराणशीला जाण्याची मुळीच जरुरी नाही. पंढरपूर हे सकल तीर्थांचे आणि साऱ्या मंगलांचे माहेर आहे. सर्व चित्तांचा चोरटा, आनंदाचा कंद, भक्तांचा वत्सल आणि दीनांचा सोयरा प्राणिमात्रांना भवपार नेण्यासाठी कर उभारून चंद्रभागेच्या तीरी सदैव उभा आहे. आषाढी-कार्तिकीला पंढरीची वारी केली म्हणजे लक्ष चौऱ्यायशींच्या येरझारा चुकतात.

तुका पंढरीसी गेला। पुन्हा नाही जन्मा आला॥

पंढरीनाथाखेरीज मराठी माणसांना इतर देवतांना भजण्याचे कारण नाही. सूर्य उगवला म्हणजे सारे दिवे जसे आपोआप निस्तेज होतात, सागर समोर दिसला म्हणजे सर्व नद्या जशा त्याला शरण जातात, त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या ह्या दैवतापुढे बाकीचे सारे देव आणि धर्म व्यर्थ आहेत. महाराष्ट्राचा देव विठोबा! मोक्षपीठ पंढरपूर! आणि आषाढीकार्तिकीची वारी हाच महाराष्ट्राचा धर्म!

जाय जाय तूं पंढरी। होय होय वारकरी॥
सांडोनिया वाळवंट। काय इच्छिसी वैकुंठ॥
खांद्या पताकांचे भार। तुळसीमाळा आणि अबीर॥
साधुसंताच्या दशटणी। तुका जाय लोटांगणीं॥

पंढरपूरला जाऊन साधुसंतांच्या पायावर लोटांगणे घालण्याचे भाग्य सर्वांनाच लाभते असे नाही. वारीचे व्रत फार कठीण आहे. एकदा वारी धरली की जन्मभर ती चुकवता येत नही. बरे, वारी नाही तर नाही, पण –

होऊन खडे गोटे। चरणरज सानेमोठे।
पंढरीचे वाटे। संतचरणीं लागेन॥

अशी मनीषा धरावयाला काय हरकत आहे? आता तेवढेही नाही जमले तर निदान तुकोबांनी नामामृताचा जो अभंग आणि अथांग डोह मराठी भाषेत भरून ठेवला आहे त्यामध्ये थोडा वेळ डुंबावयाला काय हरकत आहे?

देवाला आई म्हणावयाचे हा मंत्र महाराष्ट्रातल्या संतांनी आम्हाला शिकवला.

तूं माझी जननी तूं माझा जनिता। रखुमाईच्या कांता पांडुरंगा॥
आमची कृपाळू तूं होशी माऊली। विठ्ठले साऊली शरणागता॥
पाळशील लळे दीन वो वत्सले। विठ्ठले कृपाळे जननिये॥
कृपाळुवे पांडुरंगे अंगसंगें। जिवलगे लावी स्तना ईश्वरे॥

असे विठ्ठलाला आई संबोधून तुकोबांनी किती परोपरीने आणि वात्सल्याने आळविले आहे. देवाला आई म्हटले म्हणजे त्याच्या कुशीत वाटेल तेव्हा शिरता येते. 'लावी स्तना ईश्वरे' असा त्याच्या कृपेचा पान्हा त्याला हक्काने मागता येतो, त्याच्या पायाला घट्ट मिठी मारता येते. देवाचे प्रेम मिळविण्याची संतांनी ही फार सुंदर युक्ती शोधून काढली आहे. देवाला आई म्हणून हाक मारल्यावर त्याची काही गडबडच चालत नाही. जगात अनेक तऱ्हेच्या सत्ता आहेत. पण प्रेमाच्या सत्तेसारखी दुसरी सत्ताच नाही.

प्रीती करी सत्ता। बाळा भीती मातापिता।
काय चाले त्याशी बळ। आळी करतां कोल्हाळ॥
पदरीं घाली मिठी। खेदी मागे पुढें लोटी॥
बोले मना आलें। तुक्या साहिलें विठ्ठलें॥

आईबापांवर मुलांची सत्ता आहे. म्हणून ती त्याला भितात. मुलाने हट्ट धरला अन् भोकाड पसरले म्हणजे आईबापांचे सगळे बळ संपलेच म्हणून समजा. तो त्यांचा पदर ओढील. मागेपुढे ढकलून त्रास देईल. अन् तोंडाला येईल ते बोलेल. आईबापांना ते मुकाट्याने सहनच केले पाहिजे. उलट बालकाच्या 'आरुष' बोलांनी आईला हर्षच होतो. आणि तिला ममतेचा पान्हा फुटतो.

संतोषे माऊली आरुषा वचनी। वोरसोनि स्तनीं लावी बाळा॥

जगात भांडल्यावाचून काही मिळत नाही. परमेश्वराशी देखील भक्ताला भांडावे लागते. मुलांनासुद्धामातापितरांशीकलहकरावालागतो.झगडाकेल्यावाचूनकोणीकाहीदेतेका?

प्रीतीचा कलह पदरासी घाली पीळ। सरों नेदी बाळ मागेंपुढें पित्यासी॥

आईबापांच्या पदराला पीळ घालून त्यांना एका ठिकाणी डांबून ठेवावे तेव्हा ते प्रसन्न होतात. बोलून चालून हे प्रेमाचे भांडण आहे. इथे काही हेवादावा थोडाच आहे? प्रेमाच्या भरात मूल भलतेसलते बोलून जाते. म्हणून आईबापांनी ते काय लक्षात ठेवायचे असते? उलट त्याचे वेडेवाकडे बोलणे त्यांनी गोडच करून घ्यावयाचे असते.

प्रीतीचिया बोला नाहीं पेचपाड। भलतैसें गोड करूनि घेईं॥
वेडेवाकडे बालकाचे बोल। करिती नवल मायबाप॥

आपले मूल वाईट बोलले ह्याचेच आईबापांनी उलट कौतुक करावयाला हवे. एवढेच नव्हे तर मूल जितके खोडकर तितके आईने त्याजवर जास्त प्रेम करावयाला हवे. चांगल्या मुलाला आईच्या प्रेमाची काय जरूरी आहे? घरात वसलेल्या माणसाला सावली कशाला पाहिजे? उन्हाने तापलेल्या डोक्यालाच छायेचे सुख वाटते.

उष्णे छाये सुख वाटे। बाळें माते पान्हा फुटे॥

बाळाला पाहिले म्हणजेच मातेला पान्हा फुटतो. तो तिचा देहस्वभावच आहे. आणि खरे पाहिले तर, आईमध्ये आणि बाळामध्ये काही वेगळेपणा आहे का?

दुजेपण भाव नाही हे आशंका।

जननीबाळकामध्ये भेद नाही. म्हणूनच आईला बाळावाचून कोणी नको असते. गाय आपल्या वासराखेरीज कोणाला जवळ येऊ देते का?

धेनु येऊं नेदीं जवळीं आणिका। आपुल्या बाळकाविण वत्सा॥

आणि मुलाला तरी आईखेरीज दुसरे कोणी चालते का? कोणी नाही. आईचा वियोग त्याला क्षणभरही सहन होत नाही. आई डोळ्यापुढून जरा दूर झाली की त्याचा जीव कासावीस होतो. कोणी कितीही त्याला समजावण्याचा प्रयत्न केला तरी त्याची समजूत पटत नाही. दुसऱ्याचे बोलणे त्याला मुळी आवडतच नाही. त्याला आईच हवी असते. आई दिसली की तो कसा नाचावयाला लागतो!

बाळ मायेविण क्षणभरि न राहे। न देखतां होय कासाविस॥
आणिक उदंड बुझाविती जरी। छंद त्या अंतरीं माऊलीचा॥
तुका म्हणे बाळ मातेपुढें नाचे। बोल आणिकांचे नावडती॥

तहान लागो, भूक लागो, मुलाला आपल्या आईची आठवण होते. 'भूक लागली' म्हणून तो रडेल ओरडेल; पण तो 'खाऊ'ची वाट पाहणार नाही, तो आईची वाट पाहात बसेल.

भुकेलिया बाळ अति शोक करी। वाट पाहे परी माऊलीची॥

बाळकाच्या ह्या खुणा आई बरोबर जाणते. ती जर जाणणार नाही तर ती आई कसली?

नोळखे तानुलें माय ऐसी कोण। वोरसे देखून शोक त्याचा॥

मूल रडू लागले की आईला पान्हा फुटलाच पाहिजे. ती का त्याच्यावर रागावते? रडणाऱ्या मुलाला जी शांत करते, तीच आई. मुलाला काय हवे, काय नको हे आई बरोबर ओळखते. आणि ते तिने ओळखलेच पाहिजे. नऊ महिने तिने त्याला पोटात बाळगलेले असते. त्या वेळी त्याचे हृदय तिच्या हृदयात असते.

पोटा आलें बाळ। त्यांचें जाणावें सकळ॥

बालकाला स्वत:च्या दु:खाची चिंता करावयाचे काय कारण? त्याची चिंता आईने करावयाची.

बाळकासी चिंता काय पोटवेथा। जया शिरीं मायबाप

आईवापांना पुष्कळ चिंता असतील, पण मुलाला त्याची काय पर्वा? ते डोळ्याला जे दिसेल ते मागणार आणि हट्ट धरून बसणार. त्यांनी त्याचा तो हट्ट पुरवलाच पाहिजे. तुकोबाचे देवाजवळ सुद्धा हेच म्हणणे होते. देवाच्या काय अडचणी असतील त्या आम्हाला माहीत नाहीत. मूल जे काही मागेल ते जसे आई देते, तसे आम्ही जे मागू ते ते आम्हाला देवाने दिलेच पाहिजे आणि आमची समजूत केली पाहिजे.

काय कळे आहे बाळा। बाप सदैव दुबळा॥
आहे नाहीं हें न कळे। हातीं काय कोण्या वेळे॥
देखिलें तें दृष्टि। मागे घालूनिया मिठी॥
तुका म्हणे भावें। माझ्या मज समजावें॥

मुलाच्या भावनेने आई विचार करते. तसा भक्ताच्या भावनेने भगवंताने विचार करावयाला हवा.

मुलावर प्रेम करावयाला आईला काही सांगावे लागत नाही. मूलच तिच्या अंत:करणातल्या प्रेमाची जोपासना करीत असते.

माऊलीसी सांगे कोण। प्रेम वाढवीत तान्हें॥
अंतरिचा कळवळा। करितसे प्रतिपाळा॥

आईच्या हृदयात जो प्रीतीचा कळवळा असतो, तोच तिला आपल्या मुलाचा विसर पडू देत नाही. तुकोबा देवाला तेच म्हणतात. देवा, मग तुला आमचा विसर कसा पडला रे? अरे, तू एवढ्या ब्रह्मांडाचा चालक. आणि आमची का रे अशी दशा?

कामधेनूचें वासरूं। खाया न मिळे काय करूं॥
बैसोनी कल्पद्रुमातळीं। पोटासाठीं तळमळीं॥

हे तुला बघवते कसे? आम्ही वाईट आहोत, ओंगळ आहोत, पातकी आहोत. असू – सर्व काही असू. म्हणून काय झाले? तू आमची आई ना? आम्ही कसेही असलो तरी आमचा सांभाळ तुला केलाच पाहिजे. तुझ्या मुद्रा आम्ही धारण केल्या आहेत ना? तुझ्यासारख्या समर्थाची आम्ही बाळे – आणि आमची तोंडे पाहावीत तर ती केविलवाणी. लक्तरे अंगावर घालून आम्ही हिंडतो आहोत. देवा, जग आम्हाला हसत नाही बरे, तुला हसते आहे.

समर्थाचें बाळ केविलवाणें दिसे। तरी कोणा हसे जन देवा॥
समर्थाचें बाळ पांघरे वाकळ। हासती सकळ लोक कोणा॥
अवगुणी जरी झालें तें वोंगळ। करावा सांभाळ लागे त्याचा॥
तुका म्हणे तैसा मी एक पतित। परि मुद्रांकित झालों तुझा॥

देवा, आम्ही तुझ्याशी एवढी सलगी करतो अन् वाटेल तसे तुला बोलतो; पण आम्ही लहान आहोत. मुले आहोत. आमचे सारे बोलणे तुला सहन केले पाहिजे. आम्ही सारखे तुझ्याजवळ मागतच राहणार. तू दे किंवा नको देऊस. मागणारा कधी कंटाळत नाही, किवा कष्टी होत नाही.

मागल्याची कोठें घडते निरास। लेकरा उदास नाहीं होत॥

पण देवा, असे मात्र करू नकोस –

कोणी एकाचिया पोरें केली आळी। ठावें नाहीं पोळी मागे देखी॥
बुझावले हातीं देउनी खापर। छंद करकर वारियेला॥
तुका म्हणे मायबापाचें उचित। करावें तें हित बालकाचें॥

मुलाने 'पोळी' मागितली अन् त्याच्या हातात 'खापर' देऊन बापाने त्याची समजूत काढली असे नको. बालकाचे हित करणे हेच आईबापांना उचित आहे. त्यांनी मुलाचे अहित केले तर मुलाने कुठे जावे? कोणाच्या मागे दडावे?

माता कापी गळा। तेथें कोण राखी बाळा?

असे म्हणून तुकोबा आर्त स्वराने विठोबाला बोलावतात –

धाव घाली आई। आतां पाहतेसी काई॥
धीर नाहीं माझे पोटीं। झालों वियोगें हिंपुटी॥
करावें सीतल। बहु झाली हळहळ॥
तुका म्हणे डोई। कधीं ठेवीन हे पायीं॥

मातेचे अंत:करण तुकोबांनी जितके जाणले होते तितके कोणी जाणले नाही. मायलेकरांच्या जिव्हाळ्याची आणि जीवनाची रसभरित वर्णने जाईजुईच्या कळ्यांप्रमाणे

पावलोपावली त्यांच्या अभंगांत विखुरली आहेत. किंबहुना भक्तिरसाला त्यांनी वात्सल्याचेच रूप दिलेले आहे. देवाची भक्ती आणि आईची प्रीती ह्यांत त्यांना मुळी फरकच दिसत नाही. नाही तरी अडाणी माणसांना देवाची ओळख कशी करून द्यावयाची? माणूस महापंडित झाला म्हणून देवाला का तो ओळखू शकेल? आईला कोणीही ओळखतो. म्हणून मातेच्या रूपाने देवाला कल्पून संतांनी त्याला आळवलेले आहे. देवाचे आणि भक्ताचे संपूर्ण ऐक्य होणे ही भक्तियोगाची शेवटची पायरी मानली जाते. तुकोबांना हे संपूर्ण ऐक्य मान्य नाही. आईने आईच राहावे आणि मुलाने मूलच राहावे. भिन्नतेच्या भावनेतच प्रेमाची लज्जत आहे.

अद्वैतीं तो माझें नाहीं समाधान। गोड हे चरणसेवा तुझी॥
देव भक्तपण सुखाचा सोहळा। ठेवून निराळा दावी मज॥

अद्वैताची भानगड आपल्याला नको. आपण आपले सदैव भक्तच राहू या आणि परमेश्वरभक्तीच्या सुखाचा सोहळा यथेच्छ भोगू या. देवाला आईबापांची उपमा देणे बरे नाही. हे तुकोबा ओळखून होते, नाही असे नाही.

मायबापांची उपमा। तुज देऊं मेघश्यामा॥
तेही साजेना पाहतां। जिवलगा पंढरिनाथा॥
माय पाळी संसारीं। परलोकीं राही दुरी॥
तैसा नव्हेसी अनंता। काळावरी तुझी सत्ता॥

आईच्या प्रेमाचा लाभ इहलोकीच्या संसारातच होतो. परलोकी गेल्यावर काही तिथे प्रेम मिळत नाही. तसे ईश्वराचे नाही. त्याची अनंत काळावर सत्ता आहे. त्याचे प्रेम सर्व काळात अन् सर्व लोकांत भरलेले आहे. हे जरी खरे असले तरी, जोपर्यंत आपले इहलोकी वास्तव्य आहे तोपर्यंत येथलेच गंगाजळ पिऊन आपल्याला स्वर्गातल्या अमृताची कल्पना केली पाहिजे. आईचे प्रेम हेच ह्या संसारातले गंगाजळ आहे. आईकडे आम्ही ज्या डोळ्यांनी पाहतो, त्याच डोळ्यांनी आम्ही देवाकडे पाहणार. आईला आम्ही जी हाक मारतो, त्याच हाकेने आम्ही देवाला आळवणार. आइच्या पायाला आम्ही जशी मिठी मारतो, तसेच परमेश्वराचे चरण आम्ही घट्ट आवळणार. ह्याखेरीज भक्तिरसाच्या गोडीची चव आम्हाला मुळी चाखताच येणार नाही. असो. उत्कट भक्तिभावाने ओथंबलेल्या आपल्या अभंगवाणीने 'माउली' म्हणून जिला पदोपदी हाक मारली आहे त्या महाराष्ट्राच्या 'विठोबा माउली' म्हणून जिला पदोपदी हाक मारली आहे त्या महाराष्ट्राच्या 'विठोबा माउली'च्या चरणावर आषाढीच्या दिवशी माथा ठेवून आपण तिला म्हणू या :

शेवटीचा घास गोड करी माते। अगे कृपावंते पांडुरंगे॥

महाराष्ट्राची विनोदबुद्धी

हिंदुस्थानातील इतर प्रांतांशी तुलना केली तर महाराष्ट्राची विनोदबुद्धी अधिक तल्लख आहे असे मोठ्या अभिमानाने म्हणता येईल. गुजराथी, उर्दू, बंगाली, कानडी इत्यादी भाषांपेक्षा मराठी भाषेतील विनोद कितीतरी पटीने प्रगल्भ आहे हे जाणतेच सांगू शकतील.

विनोदाची ही नवीन दृष्टी, हे नवे सामर्थ्य काही वर्षांपूर्वी कोल्हटकरांनी महाराष्ट्राला मिळवून दिले. ह्या दृष्टीचा प्रसार जनतेमध्ये गेल्या काही वर्षांत विलक्षण वेगाने झालेला आहे. विनोदाच्या ह्या देणगीने मराठी जीवनाचे आणि साहित्याचे तेज अतिशयच वाढलेले आहे. विनोदाचे हे लोण बहुतेक सर्व ललितलेखकांपर्यंत, वक्त्यांपर्यंत आणि वृत्तपत्रांपर्यंत आता पोहोचलेले आहे. विनोदबुद्धी असल्यावाचून एखाद्या वक्त्याला श्रोत्यांपुढे तग धरणे आज कठीण होऊन बसले आहे. कादंबरी-नाटकांमध्ये वाचकांचे किंवा प्रेक्षकांचे अवधान सांभाळावयाला विनोदाचे साहाय्य घ्यावेच लागते. पूर्वीची गंभीर वृत्तपत्रे वाचताना मृत्युपत्र वाचल्यासारखा चेहरा करावा लागत असे; तसे आजची चुरचुरीत वृत्तपत्रे वाचताना करावे लागत नाही. महाराष्ट्रातील तरुण तर ह्या शक्तीचे भाविक उपासक बनलेले आहेत. त्यामुळे समाजात पूर्वीपेक्षा अधिक उत्साह, तारुण्य आणि खेळकरपणा उत्पन्न झालेला आहे.

विनोदाचे मूळ स्वरूप मुळी असेच आहे. मानवी जीवनात रोग, जरा, मरण, अपघात, हानी, पराभव, निराशा, अपमान, अज्ञान, मूर्खपणा इत्यादी अनंत दुःखे भरलेली आहेत. ह्या दुःखांकडे गांभीर्याने पाहिल्यास ती दुणावल्याखेरीज राहणार नाहीत; म्हणून त्यांच्याकडे खेळकर दृष्टीने बघून जीवन सुखावह करण्यासाठी मनुष्याला विनोदाची देणगी मिळालेली आहे. विविध प्रकारचे दुःख हा विनोदाचा एकमेव विषय आहे. समाजातील अनिष्ट रूढी आणि सवयी नाहीशा करावयाच्या असतील तर त्यांच्यामधील अनिष्टपणा आणि निरर्थकपणा हा विनोदाच्या साहाय्यानेच समाजापुढे उघडा करून दाखविला पाहिजे. श्रावणी, शिमगा, सोवळे-ओवळे, निर्जळी एकादशी, धर्मांतर, मृताचे अंत्यसंस्कार इत्यादी विषयांवर विनोदी निबंध लिहून कोल्हटकरांनी हिंदुसमाजातील अनिष्ट आचार, विचार, समजुती ह्यांच्यावर फारच मार्मिक टीका केली आहे. कोल्हटकरांचे हे लिखाण पुरोगामी वाङ्मयाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. गंभीर तऱ्हेचा हल्ला एक वेळ सहन करता येतो; पण विनोदाच्या माऱ्याला तोंड देता येत नाही. प्राण अगदी गुदमरल्यासारखे होतात आणि काही उपाय चालत नाही. माणसाचा मूर्खपणा विनोदाने जितका उघडा होतो तितका दुसरा कशाने होत नाही. म्हणून मूर्ख लोक विनोदाचे नेहमीच वैरी असतात. विनोद हा

ग्राम्य, अश्लील किंवा बीभत्स कधीच असू शकत नाही. तो करणारा माणूस किंवा ऐकणारा माणूस हा ग्राम्य, अश्लील किंवा बीभत्स असतो. ज्यांना निषेध करावयाचा असेल त्यांनी पाहिजे तर ग्राम्यतेचा, अश्लीलतेचा किंवा बीभत्सपणाचा निषेध करावा; पण 'वड्याचे तेल वांग्यावर' या न्यायाने विनोदाची तरी बदनामी करू नये.

विनोदाची गंमत अशी आहे की, लेखक पट्टीचा कुशल नसेल तर त्याच्या हातून नेमका विनोद निर्माण व्हावयाच्या ऐवजी पाणचटपणा किंवा अश्लीलताच निर्माण होते. अलीकडच्या बाजूला पाणचटपणा आणि पलीकडच्या बाजूला अश्लीलता अशा अडचणीच्या जागेत विनोदाने आपले बिऱ्हाड थाटलेले आहे. 'टांगेवाल्याच्या बायकोच्या अंगावरची मलमल पाहून मळमळ वाटते हा विनोद नव्हे, हा पाणचटपणा आहे. म्युनिसिपालिटीत पाय वर करून मतप्रदर्शन करणाऱ्या माणसाला, 'पाय खाली करा, मत दिसेल!' असे म्हणणे ही अश्लीलता झाली. पण 'मूकनायका'तील सुंदर पण मुक्याचे सोंग घेतलेल्या विक्रांतावद्दल 'सुंदर चेहऱ्याचा मुका कोणाला आवडत नाही!' असे म्हणणे हे विनोदाचे उदाहरण झाले.

करुण, वीर, वत्सल रसाच्या सिद्धतेमध्ये परिपाक झाला तर लेखकाच्या पदरी एवढा दोष येत नाही. पण विनोदसाधनाच्या बाबतीत अकुशलतेचे समर्थन करणे शक्य नाही. विनोदाची सिद्धता करता येत नाही हा विनोदाचा दोष नव्हे – लेखकाचा आहे. वैयक्तिक टीकेमध्ये विनोदाचा उपयोग करण्यात आला तर तो विनोदाचा गुन्हा नसून टीकेचा गुन्हा होय. दाढी करावयाला वस्तऱ्याच्या ऐवजी कोणी तरवार घेतली, तर त्या तरवारीला शिव्या देण्यात काय अर्थ आहे? विनोदसिद्धीचे शास्त्रीय स्वरूप माहीत नसल्यामुळे अडाणी टीकाकार विनोदावर निष्कारण आग पाखडतात. त्यांना आमचे एवढेच सांगणे आहे की, ग्राम्यतेचा आणि अश्लीलतेचा ब्रभा करून विनोदाला विनाकारण धोपटू नका. कारण विनोदामुळे मराठी साहित्याचे तेज नि:संशय वाढले आहे आणि समाजाच्या प्रगतीला उपयोगी पडणारे एक परिणामकारक शस्त्र पुरोगामी ललितलेखकांच्या हाती आज पडलेले आहे. विनोदाला विरोध करण हे प्रगतीला विरोध करण्यासारखे आहे.

समाजाच्या प्रगतीला चालना देणारे वाङ्मय निर्माण करणाऱ्या लेखकाला समाजाच्या विविध स्वरूपांचे आणि लेखनकलेचे ज्ञान असून केवळ भागत नाही. तर त्याच्या लेखनामागे तत्त्वज्ञानाची स्पष्ट भूमिका असावी लागते. त्याच्या जीवनाला आणि लेखनाला सुसंगत विचारसरणी असणे जरूर असते. अशी विचारसरणी असेल तरच त्याला आपल्या लेखनाबद्दल आत्मविश्वास वाटू लागेल आणि त्याच्या हातून प्रभावी लेखन होत जाईल. साहित्याचा पक्ष हा जनतेचा पक्ष असल्याने सर्व जनतेला सुखी करण्याचे तत्त्वज्ञान हेच त्याच्या जीविताचे तत्त्वज्ञान असावे. जनतेच्या आकांक्षा ह्या त्याच्या चळवळी आणि धडपडी असाव्यात. जनतेच्या झगड्यात त्याने आत्मीयत्वाने शिरावे. जीवनाचे रहस्य

कळवून घ्यावयाचे असेल तर त्याने त्या जीवनाच्या प्रवाहात उडी घ्यावयाला पाहिजे. काठावर बसून दुरून गंमत बघू नये.

पुरोगामी ललितलेखकांना विनोद हे आता एक अत्यंत सामर्थ्यवान् शस्त्र उपलब्ध झालेले आहे. फ्रेंच, इंग्रजी आणि अमेरिकन वाङ्मयात हास्यविनोदाला फारच श्रेष्ठ स्थान मिळालेले आहे; किंबहुना एखादे साहित्य विकसित झाल्यावाचून त्यावर विनोदाचा फुलोरा फुलून येत नाही. इंग्रजी आणि फ्रेंच ह्या दोन संपन्न भाषांतच उत्कृष्ट विनोदी वाङ्मय आढळून येते. समाजाच्या बुद्धीचा आणि जीवनाचा दर्जा वाढल्याशिवाय त्या समाजात उत्तम विनोद निर्माण होऊ शकत नाही. त्यामुळेच की काय उत्कृष्ट विनोद हे समाजाच्या सुसंस्कृत जीवनाचे गमक म्हणून समजले जाते. वाङ्मयाच्या इतर प्रकारांशी विनोदाची तुलना केली तर काव्य, कादंबरी, नाट्य हे प्रकार विनोदापुढे कृत्रिमच भासतात. कारण काव्य, कादंबरी, नाट्य ह्या गोष्टी कोणी तरी घडवून दाखविल्याशिवाय त्या समाजाच्या ध्यानी येत नाहीत. विनोद हा जीवनात पावलोपावली सहजपणे घडत असतो आणि तो कोणालाही आपोआप दिसून येण्यासारखा असतो. म्हणून इतर रसांपेक्षा हास्यरस लोकांना अधिक ओळखीचा आणि आवडीचा वाटतो. विनोद हा जीवनाच्या रोजच्या व्यवहारात घडून येत असला, तरी समाजाच्या या स्वभावात आशावादित्व, आनंदीपणा, सहनशीलता, उमदेपणा आणि खेळाडूपणा इत्यादी गुण वाढत गेल्याशिवाय त्याला समाजाच्या तोंडी किंवा लेखी साहित्याचे गुण वाढल्याशिवाय राहात नाहीत. मार्क ट्वेनने म्हणून ठेवले आहे की, काव्य स्वर्गात निर्माण होते, आणि विनोद पृथ्वीवर उत्पन्न होतो. मी विनोदाला अहिंसा म्हणतो.

हेच ते मराठीपण !

भारतामध्ये अनेक भाषिक लोक राहतात. ह्या प्रत्येक भाषिकांची वेगवेगळी वैशिष्ट्ये आहेत. प्रत्येकाचे वांशिक आणि प्रादेशिक संस्कार निरनिराळे आहेत. त्यामुळे त्यांच्या पिंडाची आणि स्वभावाची रचना परस्परांपासून वेगळी आहे. महाराष्ट्र हा प्रदेश भारतामधल्या इतर सर्व प्रदेशांपेक्षा जसा वेगळा आहे, त्याप्रमाणे मराठी माणूस हा सुद्धा भारतामधल्या इतर भाषिकांहून निराळा आहे. न्यायमूर्ती रानडे ह्यांनी 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' ह्या ग्रंथात महाराष्ट्राचे प्राकृतिक वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. त्यांच्यापुढे हाच प्रश्न होता, की भारतामध्ये वाहेरून येणाऱ्या प्रत्येक परकीय सत्तेशी टक्कर देण्याचा प्रयत्न प्रथम महाराष्ट्रातच का झाला ? मोगल साम्राज्याशी झगडा केला एकट्या महाराष्ट्राने. इंग्रजांशी प्राणपणाने लढले फक्त मराठी लोक. असे का ? महाराष्ट्राच्या भूप्रदेशात आणि वातावरणात असा काय गुण होता, की एकट्या मराठी लोकांमध्येच अशा तऱ्हेचे धाडस आणि पराक्रम उपजावा ? त्याला उत्तर देताना न्या. रानडे लिहितात :

"महाराष्ट्राची स्वभावत:च ठेवण अशी आहे, की त्यात राहणाऱ्या लोकांचा उत्कर्ष झालाच पाहिजे. असा फायदा गंगा, सिंधू व इतर मोठ्या अरबी समुद्रात किंवा हिंदी महासागरात पडणाऱ्या नद्यांच्या प्रदेशात बिलकूल नाही. ह्या देशाच्या पश्चिमेस सह्याद्री पर्वत आहे. उत्तरेस विंध्याद्री सातपुडा हे पर्वत आहेत. ह्या पर्वतांच्या लहान लहान शाखा देशात चोहीकडे पसरल्यामुळे आणि या शाखांच्या दऱ्याखोऱ्यांतून उगम पावणाऱ्या आणि शेवटी गोदावरी व कृष्णा ह्यांना मिळणाऱ्या लाखो लहानसहान नद्यांचे सर्वत्र एक जाळेच बनल्यामुळे हा देश बराच उग्र व ओबडधोबड झालेला आहे. भूगोलदृष्ट्या कोकणचा म्हणजे समुद्र आणि सह्याद्री यांमधील पट्टीचा समावेश महाराष्ट्रातच होतो. पर्वताच्या शिखरावरील प्रदेशास घाटमाथा म्हणतात व खालील प्रदेशास देश अशी संज्ञा आहे. बहुतेक टेकड्यांवरून किल्ले बांधलेले आहेत. त्यामुळे देशाचा बचाव स्वभावत:च होतो. मराठ्यांच्या राजकीय उलाढालीत ह्या किल्ल्यांनी फारच महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. देशाचे स्वरूप असे असल्यामुळे तेथील हवा फार चांगली असून उत्साहजनक आहे. उत्तर हिंदुस्थानातील सपाटीवरील व सखलातील प्रदेशासारखी महाराष्ट्राची हवा कधी अति उष्ण तर कधी अति थंड अशी नाही. प्रदेश डोंगराळ आहे. त्यामुळे जमीन असावी तशी सुपीक नाही. पण लोक सशक्त, काटक व काटेकोर आहेत."

आता मराठी लोकांच्या स्वभाववैशिष्ट्याबद्दल बोलताना न्या. रानडे सांगतात की, ''महाराष्ट्रातील लोकसंख्येत आर्य आणि द्रवीड ह्या दोन जातींचे समसमान मिश्रण झाल्यामुळे दोन्ही जातींतील अवगुण नाहीसे होऊन गुण मात्र तेथील लोकांत उतरले आहेत. या गोष्टीचे उत्तम दर्शक म्हणजे मराठी भाषा आहे. पण आर्य लोकांनी तिच्या रचनेत बदल करून तीस पूर्णत्वास आणले आहे. लोकसंख्येतील या दोन जातींच्या प्रमाणसंमेलनामुळे महाराष्ट्रातील धर्म व संस्था ह्यांत जी समता आढळून येते, तशी हिंदुस्थानात कोठेही आढळून येत नाही. तसेच महाराष्ट्रातील मिरासदारी शेतकी पद्धतीमुळे लहानलहान जमिनीची मालकी शेतकऱ्यांच्याकडे असल्यामुळे येथे व्यक्तिस्वातंत्र्याचे प्राबल्य फार आहे. ह्यांमध्ये महाराष्ट्रातील लोकांत स्वातंत्र्यप्रियता व परस्परांस मदत करण्याची इच्छा हे गुण साहजिकच उत्पन्न झाले.''

त्यानंतर 'धर्माचे आग्रही स्वरूप महाराष्ट्रात आढळून येत नाही. धर्माबाबत उदासीनपणा हा या महाराष्ट्राचा विशेष गुण आहे' असे महाराष्ट्राचे दुसरे वैशिष्ट्य न्या. रानडे ह्यांनी वर्णन केले आहे. महाराष्ट्राच्या हाडीमासी मुरलेला त्याचा सर्वात मोठा गुण म्हणजे मराठी लोकांची स्वातंत्र्यप्रियता. त्याचे न्या. रानडे ह्यांनी फारच आवेशाने वर्णन केले आहे. ते म्हणतात, ''मराठी लोक जात्याच स्वातंत्र्यप्रिय असल्याने जरी काही प्रसंगी त्यांस परकीयांची गुलामगिरी करावी लागली, तरी पुन्हा त्यांनी आपले स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यास कधीही सोडले नाही. महाराष्ट्रावर कोणत्याही एका राजसत्तेचा अंमल फार वेळा कधीच टिकला नाही. एकछत्री अंमल चालू न देण्याबद्दल मराठी लोकांची सतत खटपट चाललेली दिसते. व्यक्तिस्वातंत्र्य या लोकांना जरी विशेष आवडते, तरी उत्तरेकडून आलेल्या शत्रूस पादाक्रांत करण्यास एकजुटीने ते नेहमी तयार असतात.'' महाराष्ट्रामधल्या लोकांच्या स्वभाववैशिष्ट्याचे हे वर्णन न्या. रानडे ह्यांनी पाऊणशे वर्षांपूर्वी करून ठेवले आहे. पण फार प्राचीन काळी ह्या देशात वाहेरून जे प्रवासी आले त्यांनीही महाराष्ट्राच्या स्वभाववैशिष्ट्याचे असेच वर्णन करून ठेवले आहे. पूर्वीच्या संस्कृत आणि प्राकृत वाङ्मयातही कित्येक ठिकाणी मराठी लोकांच्या मार्मिक वर्णनांचे उल्लेख आढळतात.

सातव्या शतकाच्या प्रारंभी चिनी बौद्ध भिक्षू ह्युएनत्संग हा बौद्ध धर्मक्षेत्रांची यात्रा करण्यासाठी आला असता त्याने आपल्या प्रवासग्रंथात महाराष्ट्र देशाचे वर्णन करून ठेवले आहे. महाराष्ट्राला तो 'मोहोलाच्छा' म्हणजे 'मोठे राज्य' म्हणतो. मराठी लोकांचे वर्णन करताना तो म्हणतो, ''येथील लोक साधे असून प्रामाणिक आहेत. त्यांचा बांधा उंच व त्यांचा स्वभाव निग्रही व करारी आहे. त्यात त्यांच्या प्राणावर संकट आले तरी ते त्याला भीत नाहीत. संकटात सापडलेल्याला मदत करण्यास ते नेहमी तयार असतात. तेव्हाही ते आपल्या प्राणाकडे बघत नाहीत. शत्रूचा सूड घ्यावयाचा जरी असला तरी ते त्याला अगोदर त्याची जाणीव देतील. त्याला शस्त्र घ्यावयाला सुद्धा ते अवसर देतील. नंतरच

ते त्याच्याशी लढायला तयार होतील. युद्धात ते धर्मयुद्धाचे नियम पाळतात. शत्रू हार खाऊन पळू लागला तर त्याचा ते पाठलाग करतील, पण त्याला ते मारणार नाहीत. शरणागताला नेहमी ते अभय देतात. आपल्या सेनापतीचा पराजय झाला तर ते त्याला शिक्षा करीत नाहीत. त्याला ते स्त्रीभूषणे बहाल करतात. अर्थात्च त्या सेनापतीला आपला जीव नकोसा होतो.''

ह्या देशात सैनिकही हजारो आहेत. प्रत्येक सैनिक उत्तम लढवय्या असतो. युद्धावर निघताना ते आपली यथायोग्य तयारी करून घेतात. त्यांचा एक भालाईत हजारो सैनिकांनासुद्धा भारी असतो. भालाइताच्या हातून जर कोणी दगावला तर त्याला त्याबद्दल शासन केले जात नाही. लढाईस निघताना ते डिण्डिमांचा वाद्यघोष करतात. त्यांच्या सैन्यांत हस्तिदल हे मुख्य असते. सैन्य निघाले की हजारो हत्ती निघतात. ते बेफाम हत्ती जे वाटेत येईल त्याचा पायाखाली चुराडा करून टाकतात. अशा हत्तीपुढे शत्रूचा काय टिकाव लागणार? ह्यांचा राजा ह्या चतुरंगी सैन्याच्या जोरावर शत्रूबद्दल बेफिकीर असतो. तो त्याला तुच्छ लेखतो. महाराष्ट्र देशाचा राजा क्षत्रिय आहे. त्याचे नाव पुलकेशी आहे. त्याच्या योजनाही मोठ्या आणि त्याचे राजकारणही मोठे. त्याचा दबदबा सर्वत्र आहे. त्याची प्रजा त्याच्या आज्ञा शिरसावंद्य मानते. त्याची सर्व प्रजा मोठी विद्याभिलाषी आहे. निरनिराळ्या पंथाचेही लोक ह्या देशात बरेच आहेत.''

महाराष्ट्रीय लोकांच्या निर्भयत्वाचे वर्णन बिल्हणाने पुढीलप्रमाणे केले आहे की, 'मराठी लोकांची निर्भयता इतकी पराकाष्ठेची असे की ते रात्री आपल्या घराची दारे बंद करण्याची देखील काळजी घेत नसत. चोरांच्या ऐवजी उघड्या खिडक्यांतून चंद्रकिरण आत शिरत. चोर शिरत नसत!' आठव्या शतकात उद्योतनसूरीने मराठ्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे :

'दढमढह सामलंगे अहिमाणे कलहसीलेये
'दिण्णले गहिल्ले' उल्लविरे तत्थ मरहट्टे!'

म्हणजे बळकट, सावळ्या अंगाच्या, अभिमानी, भांडखोर आणि 'हे पहा मी दिले, तर हे पहा मी घेतले' असे म्हणणाऱ्या मराठ्याला त्याने पाहिले. मराठी माणूस उदार झाला म्हणजे तो कमरेची लंगोटी देखील सोडून देईल. आणि एखादी गोष्ट घेण्याचा त्याने निर्धारच केला तर ती तो घेतल्यावाचून राहणारच नाही. 'दिण्णले, गहिल्ले' मधील मख्खी अशी आहे.

तिरंगल नावाचा एक फार प्राचीन छन्दःशास्त्रज्ञ होऊन गेला. त्याच्या काळाची निश्चिती अद्याप झाली नाही. त्याच्या 'प्राकृत पैङ्गलम्' ह्या प्राकृत भाषेतील ग्रंथात मराठी माणसाचा एक सहज उल्लेख पुढीलप्रमाणे आला आहे.

यथा भअ भंजिअ बंगा, भंगु कलिंगा,
तेलंगा रणमुक्की चले, मरहट्ठा धिट्टा लग्गीय कट्ठा,
सोरट्ठा भअ पाअ पले.

कोणी एक काशीश्वर नावाचा राजा होता. याची स्तुती त्याचा विद्याधर नावाचा मंत्री करीत आहे. ती अशी की, हा काशीश्वर नावाचा राजा येतो आहे असे कळल्यावरोवर बंगाली लोक भयभीत झाले. कलिंगाचे लोक पळून गेले. तेलंगणाचे लोक रणांगणातून धावत सुटले. महाराष्ट्राचे लोक एवढे धाडसी (धिट्ट) पण ते देखील पसार झाले. आणि सौराष्ट्राचे लोक तर 'पाय लावून' पळाले. ह्या कवितेत महाराष्ट्राच्या लोकांची काही स्तुती नाही. पण 'मरहट्ठा धिट्ठा' ह्या शब्दांमुळे महाराष्ट्रीय लोक हे धाडसावद्दल त्या काळापासूनसुद्धा प्रसिद्ध आहेत, एवढी गोष्ट लक्षात येण्यासारखी आहे.

'नलचंपू'त 'हा महाराष्ट्र देश वीर पुरुषांचा आहे. येथील प्रजा त्यागी व न्यायप्रिय आहे. ह्या देशाचे सरदार राजाच्या वरोवरचे आहेत. ते औदार्यात कधी हार जात नाहीत. येथील लोक स्वाभिमानी आहेत. ते शरीराने वळकट असून रणशूर आहेत.' असे म्हटले आहे, तर 'विश्वगुणादर्शचंपू'त

महाराष्ट्राभिख्यो मधुरजल सांद्रो निरुपम:
प्रकाशी देशोऽयं सुरपुरनिकाशो विजयते
गृहस्था यत्रामि गुणजलधय: केऽपि विभवै:
समृद्धा: श्रद्धातो मुहुरतिथिपूजां विदधते।

म्हणजे, हा महाराष्ट्र प्रदेश प्रत्यक्ष स्वर्गाची वरोवरी करतो. येथे गोड मधुर पाण्यचे संचय तरी किती आहेत त्यांना उपमाच नाही. येथील रहिवासी तर गुणांचे सागरच आहेत. काही तर मोठे ऐश्वर्यसंपन्न आहेत. ते मोठ्या श्रद्धेने अतिथीची सेवा करतात. तेराव्या शतकात होऊन गेलेल्या श्रीचक्रधरस्वामींनी तर आपल्या वाङ्मयात ठिकठिकाणी महाराष्ट्राचे आणि मराठी लोकांचे ओजस्वी वर्णन केले आहे :

महाराष्ट्र थोर। आणिक कैसे थोर?
ना, जेतुका अर्थी आपली थोरी असे,
तेतुलाही अर्थी आणिकांशी थोरी करी,
थोरापासोनी महाथोर
तयाते महाराष्ट्र म्हणिजे

महाराष्ट्रीयांच्या युद्धनीतिसंवंधी मुक्तेश्वराने आपल्या महाभारतात पुढील वर्णन केले आहे :

खेटक करवाळे सतेज
सूड साधनी विशाळपळज
या नांवे महाराष्ट्र झुंज।
खंडिताहि न खंडवे

म्हणजे ढाल तलवार ही शस्त्रे धारण करणारे. सूड उगविण्याची प्रतिज्ञा करणारे. मरेतो न हटणारे, कधीही खंडिले न जाणारे असे लढणारे ते महाराष्ट्रीय होत. ह्या त्यांच्या लढण्याला महाराष्ट्रयुद्ध म्हणतात.

अशा रीतीने महाराष्ट्रामधल्या लोकांच्या थोरपणाचे, धाडसाचे, निर्भयतेचे, शौर्याचे अजिंक्यपणाचे आणि युद्धशास्त्रपारंगततेचे वर्णन प्राचीन वाङ्मयात ठायी ठायी विखुरलेले आढळेल.

महाराष्ट्रीयांच्या अंगी असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण गुणांचे थोडक्यात वर्णन करावयाचे झाल्यास ते असे करता येईल की, मराठी माणसाच्या अंगी स्वाभिमान आणि बाणेदारपणा तुडुंब भरलेला आहे. तत्त्वासाठी आणि ध्येयासाठी तो वाटेल ते मोल द्यावयाला तयार होईल. देशासाठी आणि स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करण्याचा जणू काही त्याने विडाच उचललेला आहे. सिंहाच्या गुहेत जाऊन त्याच्या दाढेत हात घालण्याची त्याला विलक्षण हौस. शत्रूला नि मृत्यूला भिणे म्हणजे काय हे त्याला मुळी माहीतच नाही.

ह्यालाच आम्ही 'महाराष्ट्राची अस्मिता' किंवा 'मराठीपण' म्हणतो. महाराष्ट्रामध्ये आजपर्यंत जे जे महापुरुष होऊन गेले, त्या सर्वांच्या चरित्रांमधून हे मराठीपणाचे सूत्र एखाद्या विद्युल्लतेच्या प्रवाहाप्रमाणे अखंडपणे वाहात असलेले आढळून येईल.

न्या. रानडे म्हणतात की, "आग्रा येथे औरंगझेबाच्या कैदेमध्ये शिवाजीमहाराज सापडले. महाराष्ट्राचे सगळ्यात मोठे संकट होय. कारण, समजा, त्या प्रसंगी महाराजांच्या जिवाला काही बरे वाईट झाले असते तर, मराठी स्वराज्याची सारी इमारतच रसातळाला गेली असती आणि महाराष्ट्र कायमचा पारतंत्र्याच्या गर्तेत जाऊन पडला असता. पण औरंगझेबाच्या रूपाने मृत्यू समोर अक्राळविक्राळ जबडा आ वासून बसला असताही शिवाजीमहाराजांनी त्याच्या दरबारात त्याच्या तोंडावर त्याला आव्हान द्यायला कमी केले नाही.

मिर्झाराजे जयसिंग ह्यांचा मुलगा जो रामसिंग त्याच्यावरोबर शिवाजीमहाराज औरंगझेबाने त्यांना मागल्या बाजूला उभे केले. तेव्हा शिवाजीमहाराज एखाद्या सिंहाप्रमाणे रामसिंगावर कडाडले, 'मी कोण आहे ते तुम्हाला माहीत आहे. तुमच्या बडलांना माहीत आहे. तुमच्या बादशहाला माहीत आहे. तरीही तुम्ही मला सर्वांच्या नंतर इतक्या मागे मुद्दाम उभे केले! तुमची ही मनसब मी फेकून देतो. तुमची खिलात मला नको. बादशहा मुद्दाम ज्या अर्थी मला जसवंतसिंगानंतर बसवतोय, त्या अर्थी मला त्याची मनसब नको

आहे. मला त्याची चाकरी नको. मला ठार करा. तुरुंगात टाका. काय वाटेल ते करा. बादशहाची खिलात मी कधी जन्मात घालणार नाही.' असे म्हणून शिवाजीमहाराज ताड्कन उठले नि बादशहाकडे पाठ फिरवून चालते झाले.

औरंगझेबासारख्या हिंस्र आणि क्रूर बादशहाच्या दरबारात त्याच्या क्रोधाची किंवा संतापाची पर्वा न करता एवढ्या निर्भयतेने वागणे ही काय सामान्य गोष्ट आहे? हेच ते मराठीपण.

हेच मराठीपण शेवटचे छत्रपती प्रतापसिंह ह्यांनी दाखविले. त्यांच्यावर फितुरीचे आरोप ठेवून त्यांना इंग्रजांनी १८३९ साली पदच्युत केले. पण त्या आधी, फितुरीच्या आरोपपत्रकावर मुकाट्याने सही करून द्या, तर तुम्हाला राज्यावर बसवू, अशी त्यांना धमकी घालण्यात आली. त्यावेळी इंग्रज रेसिडेंटला छत्रपती प्रतापसिंहाने जे बाणेदार उत्तर दिले, ते पाहण्यासारखे आहे. 'राज्य जाईल अशी धमकी देता कशाला? मी कधीच राज्याची हाव धरलेली नाही. उलट चौकशीशिवाय केलेले आरोप मुकाट्याने मान्य करून राज्यावर राहण्याची माझी मुळीच इच्छा नाही. समजलात? मी कधी कुणाचे काही वाकडे केलेच नाही. तर तुम्हाला अगर प्रत्यक्ष काळालाही मी भिणार नाही. आता माझ्या कबुलीच्या सहीसाठी एवढ्या विनवण्या कशाला करता नि धाक तरी कशाला देता? छाती असेल तर करा ना उघड चौकशी. काय वाटेल ते केलेत तरी असत्यापुढे या प्रतापसिंहाची मान रेसभरसुद्धा वाकणार नाही. फायद्याचा किंवा स्वार्थाचा लोभ धरून मी आपले चरित्र कलंकित करून घेणारा नव्हे!'

त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंज ह्यांना तर ह्याहीपेक्षा तडफदार उत्तर प्रतापसिंहाने दिले. ते म्हणाले, 'अरे, तुम्ही मला काय दुकानदार, सावकार का बंगाली बाबू समजाता? मराठी स्वराज्यसंस्थापक शिवाजीमहाराजांच्या गादीवरचा त्यांचा खास वंशज आहे मी. त्या स्वराज्यावरील हक्क मी सोडून देऊ म्हणता? असे करून माझ्या पूर्वजांच्या नावाला मी तर कलंक लावणार नाहीच; पण माझा एकही वंशज तसे करणार नाही. तुमच्या अटी मान्य करण्यापेक्षा मी मरण पत्करीन!'

प्रतापसिंहाचा वकील रंगो बापूजी इंग्रजांची मनधरणी करण्यासाठी इंग्लंडला गेला आणि तेथे चौदा वर्षे राहिला. शेवटी लंडनहून त्यांनी तमाम मराठ्यांना अशी निर्वाणीची हाक मारली, "आशियातल्या सगळ्या राष्ट्रांना जागृत करण्यासाठी मी माझ्या कोट्यवधी हिंदी बांधवांच्या नावाने टाहो फोडून ओरडून सांगेन की, बापहो, जागे व्हा. आणि या अंग्रेजांना नीट ओळखून राहा. महाराष्ट्र राज्य बुडवून आपल्या घशात घालावे असा त्यांचा मतलब नजरेस येतो. हिंदूचे राज्य बुडवावे असा क्रम सुरू आहे. परंतु ईश्वर कसे करतो ते पहावे. समय औरंगजेबियाचा. जसे सर्व हिंदु बुडवावे तसा आहे. ईश्वर हिंदू राज्ये बुडवील असे

घडणार नाही... या लोकास भ्याले किंवा नरमाई दाखविली म्हणजे तात्काळ गळा कापतात...''

असे परम धैर्याचे आणि निर्वाणीचे उद्‌गार मराठी माणसाखेरीज दुसरा कोणीही काढणार नाही.

सत्तावन्न सालच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे नेते नानासाहेब पेशवे ह्यांना पकडून आणण्यासाठी इंग्रजांनी जाहीर फर्मान काढले. तेव्हा त्यांना उद्देशून नानासाहेबांनी जो इस्तिहारनामा लिहिला, त्यात त्यांनी इंग्रजांना छातीठोकपणे सांगितले की, ''पुन्हा आपण रणांगणातच भेटू. तुमच्या रक्ताच्या नद्या वाहतील. गुडघ्याइतका लोंढा वाहील. मी तर प्राणावर उदार झालोच आहे. मी एकटा. परंतु बलाढ्य इंग्रजांचा शत्रू म्हणून उभा आहे. त्यातच मला समाधान आहे. मृत्यू हा कधी तरी येणारच. मला भय ते कसले? जे लोक आज तुमचे म्हणून आहेत, तेच तुमच्यावर उलटतील आणि तुम्हाला ठार करतील... मृत्यू कधी तरी येणारच, तर मी अपमानाने का मरावे? माझ्या जिवात जीव आहे तोपर्यंत मी तुमच्याशी लढणारच. मी मारला जावो. मी जे जे करीन ते तरवारीनेच करीन!''

हेच हेच ते मराठीपण! हा मराठीपणाचा देदीप्यमान धागा छत्रपती शिवाजीमहाराजांपासून तो तहत चिंतामणराव देशमुखापर्यंत अव्याहत चालत आलेला आहे.



ही आमची मराठी मने

अनंतराव गद्रे ह्यांची एक गोष्ट मला नेहमी आठवते. पुष्कळ वर्षे झाली त्याला. 'नामाचा महिमा' नावाचा एक चित्रपट त्यांनी तयार केला होता. त्याचे पुण्यातले उद्घाटन त्यांनी माझ्याकडून करवले. त्या समारंभाला गावातली अनेक प्रतिष्ठित मंडळी त्यांनी बोलावली होती. चित्रपट आपला असातसाच होता. पण तो काही प्रश्न नव्हता. मध्यंतरात खाण्यापिण्याची चांगली व्यवस्था होती. तिचा आमंत्रितांनी सढळ हातांनी समाचार घेतला. खेळ संपल्यानंतर मंडळी आली तशी निघून गेली. शेवटी उरलो मी आणि अनंतराव. चित्रपटगृहाच्या कचेरीत बसलो बराच वेळ. अनंतरावांनी विडी शिलगावली. आणि हिरमुसला चेहरा करून ते झुरके मारू लागले. मी चरकलो. अनंतरावांना विचारले, "का हो? असे का?" अनंतराव एकदम भडकून म्हणाले, "हलकट आहेत लेकाची ही आपली मराठी माणसे. कोणामध्ये काही रीत आहे का? इतक्या माणसांना मी इथे आर्जवून बोलावले. आमचा बोलपट भिकार असेल. पण जाताना कुणी मला विचारून जाईल, हसून म्हणेल की बुवा, ठीक आहे, बरे आहे. तर नाव नको! जणू काही मी ह्यांना बोलावले ही माझीच चूक झाली!"

एकट्या अनंतरावांनाच हा अनुभव आहे असे नाही. सर्वांचाच तो अनुभव आहे. दुसऱ्याला चांगले म्हणणे मराठी माणसाच्या अगदी जिवावर येते. मराठी मनाची घडणच मुळी तशी झालेली दिसते. मी तर आजपर्यंत इतक्या लोकांना माझ्या नाटकांच्या आणि चित्रपटांच्या प्रयोगांना बोलावलेले असेल. त्या सर्व निमंत्रितांच्या पलटणी माझ्या डोळ्यांसमोरून सरकताना ह्या क्षणी मला दिसताहेत. अर्धीअधिक मंडळी जाताना तोंडे चुकवितात. जणू काही त्यांची आणि आपली तोंडओळख सुद्धा नाही. उरल्यापैकी निम्मे लोक जाताना आपल्याकडे बघून मंदस्मित करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे आपल्याला भासते. बहुधा त्यांना ते जमत नाही म्हणा. काही थोडे लोक 'बरे आहे' एवढे शब्द कसेबसे उच्चारून एकदम पळ काढतात. पण तेवढे करण्यामध्येही आपण आमंत्रकांवर केवढे उपकार करीत आहोत ही भावना त्यांच्या मुद्रेवर प्रकट झाल्याशिवाय राहात नाही.

दुसऱ्याला बरे म्हणताना मराठी माणसांना एवढे कष्ट का पडतात हा एक खरोखरच विचार करण्यासारखा प्रश्न आहे. कोणाला काही एखादी आपली गोष्ट कौतुकाने दाखवावी की त्याचा चेहरा एकदम नाना फडणविसासारखा खप्पड नाही तर रामशास्त्री

प्रभुण्यासारखा फुगीर होतो. आपण कोणी तरी महान् योग्यतेचे नि:पक्षपाती अन् निर्भीड टीकाकार आहोत अशी एकदम त्याची भावना होऊन बसते. आपल्या तोंडातून निघणारा अभिप्राय म्हणजे जणू काही एखाद्या न्यायाधिशाचा अपरिवर्तनीय निवाडाच आहे अशी त्याची समजूत होते.

मनुष्य कितीही मोठा असला तरी त्याला दुसऱ्याने बरे म्हटले म्हणजे आनंदच होतो. हा मनुष्याचा मुळी स्वभाव आहे. एकदा पुण्याला वसंत व्याख्यानमालेमध्ये जयकर अध्यक्ष होते. त्यांनी व्याख्यानाचा समारोप करताना इंग्रजीमध्ये इतके उत्कृष्ट भाषण केले की श्रोत्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. माझा हर्ष मी आवरू शकलो नाही. व्याख्यान संपताच मी तडक जयकरांकडे गेलो आणि त्यांना म्हणालो, "आपल्या वक्तृत्वाचे निशाण पूर्वीच्याच दिमाखाने आपण अद्यापही फडकवीत ठेविले आहे हे वघून मला खरोखरच आनंद होत आहे." जयकरांचा चेहरा एकदम उजळला. समाधानाचे स्मित त्यांच्या डोळ्यांमधून प्रकाशले. इतक्यात बाजूला श्री. ज. स. करंदीकर उभे होते. ते आंवट आवाजात म्हणाले, "जयकरांचे वक्तृत्व सुप्रसिद्धच आहे. त्यांना दुसऱ्यांच्या अभिप्रायाची काय जरूर?" तेव्हा जयकर चटकन् म्हणाले, "असे नका तुम्ही म्हणू करंदीकर! ह्यांचा अभिप्राय ऐकून माझ्या मनाला बरे वाटले ह्यात काही शंका नाही."

चांगल्या गोष्टीलाही चांगले म्हणायची जिथे मनाची प्रवृत्ती नाही तिथे सामान्य गोष्टींना बरे कोण म्हणणार? रसिकतेचा किंवा उत्तेजनाचा प्रश्न बाजूला ठेवला, तरी दुसऱ्याला चांगले म्हणणे हा एक सभ्यतेचा आणि सद्भावाचा प्रकार आहे, एवढी एकच गोष्ट जरी मराठी माणसांच्या मनांवर ठसली तरी पुरे आहे. मी पुण्याला जेव्हा शाळेचा प्रमुख होतो, तेव्हा शाळा वघण्यासाठी पुष्कळदा बाहेरचे लोक येत. कोणी साहेब आला की, तो नेहमी उत्तमच अभिप्राय देऊन जाई. 'मुले फार तरतरीत वाटली. सर्व शिक्षक मोठे हौशी दिसले.' त्याच्या उलट मराठी माणसांचे अभिप्राय असावयाचे कोंबट नाही तर थंडगार. कशाला ह्यांना बोलावले असे होऊन जायचे. ह्यासंबंधी त्या वेळी मी एका साहेबाशी बोललोही. तेव्हा तो म्हणाला, "केवळ चांगल्या गोष्टीकडे बघण्याची वृत्ती हा एक संस्कृतीचा भाग आहे." विनोबा तर आग्रहाने सांगतात, "स्वत:चे दोष पाहावेत. दुसऱ्याचे गुणच पाहावेत." स्वैपाक करणाऱ्या सामान्य गृहिणीपासून तो उत्कृष्ट कलाकृती करणाऱ्या कलावंतांपर्यंत सर्वांना दुसऱ्याकडून प्रशंसेची अपेक्षा असते. माना डोलावणारे आणि वाहवा म्हणणारे श्रोते समोर बसल्याखेरीज तर उत्कृष्ट गवयांचे सुद्धा गाणे रंगत नाही. एखाद्याच्या घरी आपण जेवायला गेलो आणि स्वैपाक उत्तम झाला आहे असे जर आपण त्याच्या गृहिणीला सांगितले तर तिला केवढा आनंद होतो! पण एवढाही आनंद दुसऱ्याला देण्याची आपल्या मनाची तयारी नसते. परवा मी एका नाट्यप्रयोगाला गेलो होतो. प्रयोग संपताच आत जाऊन प्रत्येक नटाचे नि नटीचे मी अभिनंदन केले. एकजण मला म्हणाला, "अहो,

सर्वांचीच कामे चांगली झाली म्हणून तुम्ही काय सांगत सुटलाहात?" तेव्हा मी त्याला म्हणालो, "आपले काम चांगले झाले असे नटनटींना दुसऱ्यांनी सांगितले म्हणजे त्यांना केवढा आनंद होतो ह्याची तुम्हाला काय कल्पना? आणि समजा, मी मुद्दाम खोटे बोललो असलो तरी त्याने कोणाचे काही नुकसान होणार आहे काय? एका शब्दाने जर माणसे सुखी होतात तर आपण मनाचा एवढा कद्रूपणा का दाखवावा?"

काही दिवसांपूर्वी एका गृहस्थाने आपले नवे घर दाखविण्यासाठी मोठ्या हौसेने आम्हाला बोलावले. आयुष्यात आपण स्वत:च्या मालकीचे एक घर बांधू शकलो, ह्या समाधानाने तो माणूस अगदी धुंद झालेला दिसला. घराचा प्रत्येक भाग दाखवून तो विचारू लागला, "काय, कसे आहे हे?" आम्ही त्याचे कौतुक करावे हीच त्याची अपेक्षा. पण एक जण होता आमच्यात तो म्हणाला, "शौचकूप भिकार आहेत!" मी हळूच पुटपुटलो, "तुमच्या तोंडासारखे." शौचकूप वाईट आहेत असे सांगून त्या घरमालकाच्या आनंदावर विरजण टाकण्याची त्या माणसाला काही जरी होती का? जशी काही त्यामुळे त्याचीच अडचण होणार होती. पण आमच्या माणसांचा हा मुळी जातिस्वभावच होऊन बसला आहे. त्याला काय करायचे? माझ्या माहितीचे एक गृहस्थ आहेत. त्यांना ह्या जगातली कोणतीही गोष्ट पसंत नाही. मी त्यांना म्हणतो, "ईश्वराने तुम्हाला अमृत प्यायला दिले तरी त्यात दोन चमचे साखर पाहिजे म्हणून तुम्ही त्याला सांगाल!"

महाराष्ट्रातील सार्वजनिक जीवनाचा अतिरेक

कोणत्याही गोष्टीचा अतिरेक करावयाचा ही मुळी आपली जन्मजात खोड आहे.

सध्या सर्वांपेक्षा जास्त अतिरेक जर कशाचा होत असेल तर तो सार्वजनिक चळवळींचा. आजकाल महाराष्ट्रात सार्वजनिक जीवन अगदी उतू चालले आहे असे म्हणावयाला हरकत नाही. कोणतेही दैनिक वर्तमानपत्र घ्या. आणि त्यातल्या त्या दिवसाच्या स्थानिक कार्यक्रमांच्या सदरावरून डोळे फिरवा, म्हणजे तुमच्या लक्षात येईल : रोजच्या रोज दहापाच व्याख्याने असतात. चारदोन संमेलने होतात. एखाददुसरी परिषद भरते. कुठे कोणाचे अभिनंदन होत असते. कोणाची एकसष्टी साजरी केली जाते. कोणाच्या निधनावद्दल दुखवट्याची सभा बोलावलेली असते. कुठे पुस्तक-प्रकाशनाचा समारंभ असतो. तर एखाद्या संस्थेच्या मदतीसाठी कोणाच्या तरी अध्यक्षतेखाली धर्मार्थ नाट्यप्रयोग असतो. ह्या सर्व दैनंदिन कार्यक्रमांत राष्ट्रीय किंवा धार्मिक सण, महापुरुषांच्या जयंत्या आणि पुण्यतिथ्या, वार्षिक परिषदा अन् ऋतुकालोद्भव व्याख्यानमाला ह्यांची भर पडली म्हणजे काही विचारू नका. दैनिकांची सबंध पानेच्या पाने कार्यक्रमाच्या याद्यांनी तुडुंब भरून वाहू लागतात. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत तर सार्वजनिक कार्यक्रमांची गावोगाव एवढी दंगल उसळते आणि तिच्या गलग्याने सारे वातावरण इतके दणाणून जाते की लांब कुठे तरी जंगलात पळून जावे असे वाटल्यावाचून राहात नाही.

सार्वजनिक उपद्व्यापांची ही साथ गेल्या पाचपंचवीस वर्षांत इतकी वाढली आहे की काही विचारू नका. इतक्या सार्वजनिक चळवळींची आपल्या समाजाला किंवा महाराष्ट्राला काही जरुरी आहे का? हौस आणि उपचार ह्यांच्या इतके आपण आहारी गेलो आहोत की आता त्यांच्या कचाट्यातून बाहेर पडणे आपल्याला सर्वस्वी अशक्य होऊन बसले आहे. प्रत्येक शाळेत, कॉलेजात, वसतिगृहात, आळीत, चाळीत, पेठेत, गोटात, कारखान्यात, गिरणीत तोच तो उत्सव, तीच ती जयंती वा पुण्यतिथी पुरभय्याप्रमाणे निरनिराळ्या चुली मांडून साजरी करण्यात काही शहाणपणा आहे का? कुठला तरी वक्ता वेठीला धरून पकडून आणायचा, कोणाला तरी अध्यक्ष बनवायचे, कोणी तरी अध्यक्षांची सूचना करायची, तिला कोणीतरी अनुमोदन किंचाळायचे, मग व्याख्यान संपल्यानंतर ते हाराचे नि आभाराचे कंटाळवाणे चऱ्हाट आणि आळोखेपिळोखे नि जांभया देत उभ्या राहिलेल्या श्रोत्यांसमोर कुणा तरी हाडकुळ्या पोरीने (वा पोराने) म्हटलेले राष्ट्रगीताचे बेसूर रडगाणे. हरे राम राम राम! सार्वजनिक सभा म्हटली की माझ्या अंगावर काटा उभा राहतो.

मी तर पंचवीसतीस वर्षे ह्या यातना सहन करतो आहे. रोजच्या रोज वर्षानुवर्ष गावोगाव हा जो प्रचंड खटाटोप ह्या महाराष्ट्रात चालला आहे त्यामधून काही तरी निष्पन्न झाले आहे काय? विचार करून बघा. व्याख्यानबाजीच्या एवढ्या कारखान्यातून गेल्या पंचवीस वर्षांत चारदोन तरी नवे प्रभावी वक्ते निर्माण झाले आहेत काय? दोनदोन तपे आपले तेच ते वक्ते त्याच त्या विषयांवर पुन्हा पुन्हा बोलतातच आहेत. बोलणारे थकत नाहीत आणि ऐकणारे कंटाळत नाहीत. सभापरिषदांच्या अतिरेकाने व्याख्याने ही एक मामुली बाब होऊन बसली आहे. त्यांचे महत्त्व कोणाला वाटेनासे झाले आहे. गांधीजयंती, शिवजयंती, स्वतंत्र्यदिन या विषयांवर सामान्य वक्ते दरवर्षी पुन्हा पुन्हा बोलणार तरी काय? तेच ते ठोकळेवजा मुद्दे पुन्हा पुन्हा उगाळीत बसावयाचे. सर्व वक्ते सगळीकडे तेच बोलतात आणि सर्व श्रोत्यांनी ते पूर्वी सतरा वेळा ऐकलेले असते. त्यामुळे वक्तृत्त्वाचे आकर्षणच मुळी नाहीसे झाले आहे. वक्तृत्त्वाचे कशाला? मामुली वक्ते महापुरुषांच्या पाठीमागे वर्षानुवर्ष हात धुऊन लागल्यामुळे महापुरुषांची सुद्धा कोणाला किंमत वाटेनाशी झाली आहे.

रोज इतक्या सभा न् परिषदा होत असतात, पण वक्त्यांची किंवा अध्यक्षांची ओळख कशी करून द्यावी, त्यांचे आभार कसे मानावेत, एवढी साधी गोष्ट सुद्धा किती लोकांना माहीत आहे? परदेशातून जाऊन आलेल्या एका लेखकाच्या अभिनंदनाच्या सभेत ओळख करून देणारा एक वक्ता म्हणाला, "आमचे हे मित्र गेल्याच महिन्यात झेकोस्लोव्हाकियात (लेखक : नाही. युगोस्लाव्हियात!) हो, युगोस्लाव्हियात जाऊन आले आहेत. तेथे हे (लेखकाकडे वळून) कोणाला भेटलात? (लेखक : टिटो) हो – कोण टिटो का फिटो आपल्याला माहीत नाही – पण त्याला हे भेटून आले आहेत!" मुख्य वक्त्यांची अशी ओळख करून दिल्यानंतर व्याख्यानाच्या सुरुवातीला क्षणभर त्याची दातखिळी बसल्यास नवल काय? आभार तर कोणाचे मानायचे अन् कोणाचे मानायचे नाही ह्याला काही धरबंधच राहिलेला नाही. व्याख्यानाला (पैसे घेऊनही) जागा देणाऱ्या 'काकासाहेबां' पासून तो अध्यक्षांना पाणी पिण्यासाठी तांब्यापुलपात्र देणाऱ्या काकूबाईपर्यंत सर्वांची नावे घेतली नाहीत तर काही तरी भयंकर पातक घडते असे आभार मानणाऱ्याला वाटते. मुख्य वक्त्याला दहापाच संस्थांतर्फे हार घालावयाचे असल्यास, प्रत्येक हारवाल्याला कमीतकमी दोन शब्द बोलावयाची सुरसुरी येते. एकदा माझा असाच सन्मान होता. सर्व हार घालून झाल्यावर एक हार शिल्लक उरला. तो बरोबर असलेल्या मित्राला सभेचे व्यवस्थापक घालू लागले. मित्र गोंधळला. तो म्हणाला, "मला कशाला?" व्यवस्थापक म्हणाले, "शिल्लक उरला आहे, तो वाया कशाला घालवा?"

राष्ट्रगीताची तर प्रत्येक सभेत अक्षरश: विटंबना होत असते. राष्ट्रगीत चालू असताना उभे कसे राहावे हे देखील पुष्कळांना कळत नाही. कुणी मान वळवून इकडून तिकडे बघत

असते. अन् मागल्या बाजूची मंडळी तर मुकाट्याने चालूच लागते. पुष्कळदा तर राष्ट्रगीत म्हणावयाची अगदी शेवटच्या क्षणी आठवण होते. मग कुणाला तरी घाईघाईने पकडून उभे करायचे अन् कसाबसा तो उपचार पार पाडल्याचे पुण्य मिळवायचे. इतकी वर्षे राष्ट्रगीत कानांवर पडते आहे, पण ज्याला ते न चुकता पाठ येते अशी बहुसंख्य श्रोत्यांपैकी किती मंडळी सापडतील बरे?

व्याख्यानांचा एवढा महापूर महाराष्ट्रावरून प्रत्यही वाहून चालला आहे, पण जनता आपली कोरडी ती कोरडीच. त्यामुळे अमुक एका ज्ञानाचा वा विचाराचा इथे प्रसार झाला आहे किंवा अमुक एका प्रश्नावर येथले लोकमत प्रभावी झाले आहे असे म्हणाल तर नाव नाही. कोणाच्या व्याख्यानाला जावे आणि कोणाच्या जाऊ नये, एवढे साधे ज्ञान देखील श्रोत्यांना नसते. नुसत्या विद्वत्तेवर वक्त्याला श्रोते मिळवता येत नाहीत. लोकप्रियतेचे भांडवल त्याच्याजवळ असावे लागते. नेहरूंच्या सभेला लक्षावधी लोक जमतात ते कशाला? त्यांना पाहायला की त्यांचे भाषण ऐकायला? सार्वजनिक जीवनाचे शास्त्र इंग्रजांनी आपल्याला शिकविले. पण सभासंमेलनांचा एवढा अतिरेक त्यांच्या देशात नाही. लंडनमध्ये मी दीड वर्ष होतो. पण शॉसारख्या अधिकारी पुरुषाचे वर्षातून एखाददुसरेच भाषण झाल्याचे मला आठवते. आणि इथे जो उठतो तो आपला वाङ्मयावर बोलतो. जणू काही प्रत्येकाने वाङ्मयावर स्वतंत्रपणे विचारच करून ठेवलेला आहे.

महाराष्ट्रातल्या सार्वजनिक जीवनाच्या अतिरेकाचे दुष्परिणाम काही ठराविक लोकांनाच भोगावे लागतात. त्या दुर्दैवी मंडळींपैकी मी एक आहे. माझा आवाज ऐकण्याचा मला आता कंटाळा आला आहे. पण लोक काही हटत नाहीत. कुठल्या तरी गावची चारपाच मंडळी एकदम एके दिवशी येऊन समोर उभी राहतात व म्हणतात, "यंदा तुमचंच व्याख्यान झालं पाहिजे असं सर्व मंडळीनं एकमतानं ठरविलं आहे. आमच्या विरुद्ध पक्षाची मंडळी म्हणतात की, तुम्ही येणारच नाही म्हणून. पण आम्ही त्यांच्याशी पैज मारली की, आम्ही तुम्हाला घेऊन येतो म्हणून –" अशा मंडळीना काय उत्तर द्यायचे? तेव्हा मी त्यांना म्हणतो, "माझ्याबद्दल एवढ्या विश्वासानं तुम्ही पैजा मारता याबद्दल मला तुमचा हेवा वाटतो. पण मला वेळ नाही!" त्यावर ती मंडळी म्हणतात, "आम्ही तुम्हाला संध्याकाळच्या गाडीने नेतो आणि सकाळी आणून पोहोचवितो. मग तर झालं?" "पण मला खरोखर वेळ नाही. मी काय करू?" मी त्यांना जीव तोडून सांगतो. "लोकांची फार निराशा होईल." त्यातला एक जण म्हणतो, "अहो, पण लोकांना अशी आशा वाटण्यासारखा माझ्या हातून काय गुन्हा घडला आहे?" मी त्यांच्याशी वाद घालू लागतो. पण त्यांची समजूत पटत नाही. त्यांना वाटते की, मला काही स्वत:चा उद्योगधंदा नाही. मी जणू त्यांच्याच आमंत्रणाची वाट पाहात बसलो होतो. त्यांनी म्हणायचं, 'आलं पाहिजे' नि मी म्हणायचं 'वेळ नाही.' अशा वादातच तास दीडतास फुकट जातो. तेव्हा कधी

कधी मी आपला पवित्रा बदलतो. आणि जो बोलावील त्याला 'हो' म्हणून त्यांची तडकाफडकी बोळवण करून टाकतो. 'नाही' म्हटले की वाद आला. 'हो' म्हटले की माणसे खूष होऊन तावडतोब चालू लागतात. आपला वेळ जात नाही. मग शेवटच्या घटकेला येता येत नाही म्हणून बेधडक तार पाठवून द्यायची की संपले. ह्या कामी प्रत्येक वेळी आपल्या पदराला दीडदोन रुपयांचा चट्टा बसतो खरा. पण सार्वजनिक जीवनाची तेवढी वर्गणी आपल्याला द्यायलाच पाहिजे, नको का? आता लोक आपल्या नावाने ओरडतात. पण आपणही त्यांच्या नावाने ओरडावे म्हणजे झाले!

महाराष्ट्र : कालचा आणि आजचा!

आम्हाला महाराष्ट्रावद्दल फार वाईट वाटते. अतिशय वाईट वाटते. काय या महाराष्ट्राच्या नशिबात आहे काही कळत नाही. पण महाराष्ट्राचा भविष्यकाळ फार खडतर आहे यात काही शंका नाही. कित्येक वेळा तर हा महाराष्ट्र नष्ट होणार की काय असे सुद्धा आम्हाला भय वाटते. महाराष्ट्र नष्ट होणार याचा अर्थ महाराष्ट्राचे शरीर नष्ट होणार असा नव्हे. भौगोलिक महाराष्ट्र आहे तसाच राहील. थोडा कमी होईल. नाही तर जास्ती वाढेल. आम्हाला जे भय वाटते ते महाराष्ट्राच्या आत्म्याबद्दल. महाराष्ट्राचा आत्मा नष्ट होणार अशी आम्हाला भीती वाटते. आत्मा नष्ट झाला तर नुसते शरीर जगून काय उपयोग? भारतामधल्या इतर भाषिकांपेक्षा महाराष्ट्राचा आत्मा खचित निराळा आहे असे आम्हाला वाटते. असे म्हणण्यात आम्ही कोणत्याही भाषिकांचा अपमान करीत नाही. कारण प्रत्येक भाषिकाचा वेगवेगळा आत्मा हा असतोच. आणि त्यामुळेच प्रत्येकाचा पिंड इतरांपेक्षा निराळा असतो.

महाराष्ट्राचा हा आत्मा कोणता? कशामध्ये आहे तो? त्याचे उत्तर असे. महाराष्ट्र हा लोकोत्तर बुद्धीचा उपासक आहे. महाराष्ट्र हा असामान्य बुद्धीचा पूजक आहे. सामान्य बुद्धीला, गुणाला अन् कर्तृत्वाला महाराष्ट्रात मान नाही. ज्ञानेश्वर-तुकारामांपासून तो सानेगुरुजी नि विनोबा भाव्यांपर्यंत किंवा छत्रपती शिवाजी महाराजांपासून तो लोकमान्य टिळक आणि विनायकराव सावरकरांपर्यंत गेल्या कित्येक शतकांतील महाराष्ट्राच्या देवघरामधील सर्व दैवते तुम्ही तपासून पाहा – प्रत्येक क्षेत्रामधील पाहा, प्रत्येक कार्यामधील बघा. अद्वितीय आणि अलौकिक अशा माणसांच्या चरणांवर महाराष्ट्राने आपले डोके वाकविले आहे. सुदैवाने या महाराष्ट्रात लोकोत्तर बुद्धीच्या माणसांची कधीच वाण पडली नाही. सह्याद्री पर्वताची शिखरे शोभतील अशी प्रचंड बुद्धीची माणसे या महाराष्ट्रात होऊन गेली आहेत. फार लांब कशाला? गेल्या साठसत्तर वर्षांमध्ये तरी ह्या महाराष्ट्रात असामान्य बुद्धिमंतांचे केवढे मोठे पीक उगवून गेले? तेलंग, भांडारकर, रानडे, टिळक, राजवाडे, वैद्य, परांजपे, केतकर, प्रा.रा.द. रानडे नि डॉ.आंबेडकर असे आपल्या बौद्धिक तेजाने साऱ्या जगाचे डोळे दिपविणारे महापंडित या महाराष्ट्रात जन्माला आले. अशा तऱ्हेने शतकानुशतके महाराष्ट्रात अलौकिक बुद्दीची जाज्वल्य उपासना चालू असल्याने मोठेपणाबद्दल मराठी माणसांच्या अपेक्षा इतर भाषिकांपेक्षा फारच निराळ्या

आहेत. कोणत्याही क्षेत्रातला माणूस असो, त्याला बुद्धीच्या कसोटीवर महाराष्ट्रातली माणसे अगोदर घासून पाहतात. अन् मग तो बावनकशी निघाला तरच त्याला महाराष्ट्रामध्ये मान मिळतो. अशी ही महाराष्ट्रामधील आजपर्यंतची परंपरा आहे. ह्यालाच आम्ही महाराष्ट्राचा आत्मा म्हणतो.

महाराष्ट्र हा स्वभावाने उर्मट, बंडखोर अन् टीकाखोर जो आहे, त्याचे कारण अलौकिक बुद्धीची पूजा हा महाराष्ट्राचा जो आत्मा आहे तोच आहे. महाराष्ट्राच्या आत्म्याची ही निरनिराळी वैशिष्ट्ये आहेत. सामान्य बुद्धीची किंवा गुणांची माणसे प्रतिष्ठेला चढून जर ज्ञानाचा किंवा शहाणपणाचा भलताच आव इथे आणू लागली तर महाराष्ट्र त्यांचे वाभाडे काढतो, त्यांची भंबेरी उडवतो नि त्यांना साफ भिरकावून देतो. कुणाचे भलते नखरे महाराष्ट्र कधीच चालू देत नाही. विनाकारण कुणाचे फाजील लाड महाराष्ट्र कधीच करीत नाही. सोंगाचा नि ढोंगाचा तर महाराष्ट्र हा कट्टर दुष्मन आहे. मंत्राजी, तुंबाजी किंवा सालोमालो यांची या महाराष्ट्रात कधीही डाळ शिजणार नाही. प्रत्येक गोष्टीवर कठोर तर्काचा नि प्रखर वास्तवतेचा शोधक प्रकाश टाकावयाचा हा महाराष्ट्राचा मुळी स्वभावधर्मच आहे. इतर भाषिकांना मराठी लोक हे पुष्कळदा अश्रद्ध, आडमुठे नि रांगडे वाटतात, त्याचे हेच कारण आहे. लपवालपवी किंवा छपवाछपवी मराठी माणसांजवळ नाही. जे मनात येईल ते स्वच्छ तसेच्या तसे सांगून टाकावयाचे. मग ऐकणाराला काय वाटेल किंवा त्याचे काय दुखेल याची मराठी माणसे विशेष परवा करीत नाहीत. आत एक नि बाहेर दुसरे हा दुटप्पीपणा महाराष्ट्रामध्ये नाही. म्हणूनच मराठी माणसे पुष्कळांना आवडत नाहीत. महाराष्ट्राच्या स्वभावात निर्भीडपणाची नि सत्याची जी अगदी उपजत आवड आढळून येते, त्याचे कारण सुद्धा त्याचे हे अंगभूत बुद्धिवादित्वच होय.

महाराष्ट्राचा स्वाभिमान नि बाणेदारपणा हा देखील त्याच्या बुद्धिपूजेतूनच निर्माण झालेला आहे. आमच्या इतिहासाचा, संस्कृतीचा, परंपरेचा आम्हाला जो कडकडीत अभिमान वाटतो याचे कारण हा सर्व आमचा वारसा अद्वितीय गुणांनी अन् उज्ज्वल पराक्रमांनीच शिगोशीग भरलेला आहे. आमचे स्वातंत्र्यप्रेम याच स्वाभिमानावर अधिष्ठित झालेले आहे. परकीय सत्तेचे, विचारांचे वा तत्त्वज्ञानाचे दास्य याच स्वाभिमानी पिंडामुळे महाराष्ट्राने नेहमी झुगारून दिलेले आहे. नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई यांच्यापासून तो वासुदेव बळवंत, चाफेकर, अनंत कान्हेरे, राजगुरू यांपर्यंत क्रांतीच्या अग्निकुंडात आत्माहुती टाकणाऱ्या हुतात्म्यांची अखंड परंपरा विशेष प्रामुख्याने महाराष्ट्रातच निर्माण झाली त्याचे हेच कारण होय. अशा तऱ्हेने सत्य, स्वातंत्र्य अन् क्रांती या अत्युच्च मानवी मूल्यांचा हव्यास जीवनात निर्माण करणारी 'अलौकिक बुद्धी' हा महाराष्ट्राचा खरा प्राण आहे. हा महाराष्ट्राचा आत्मा सध्या निस्तेज होत चाललेला आहे. आणि तो तसाच निस्तेज होत होत नष्ट होईल की काय असे आम्हाला भय वाटू लागले

आहे. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात आजकाल इतक्या क्षुद्र माणसांना प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे आणि इतक्या सामान्य गुणांचा उदोउदो होऊ लागला आहे, की केवळ असामान्याची अन् अलौकिकाची पूजा करणाऱ्या ह्या महाराष्ट्राचा आत्मा त्याच्या शरीरात झोपी गेला आहे की काय अशी सध्या आम्हाला शंका येते.

महाराष्ट्राची गौरवगाथा

आज १ मे १९६०! साडेतीन कोटी मराठी जनतेच्या आयुष्यातला परम भाग्याचा आणि हर्षाचा दिवस! भारताच्या इतिहासात आणि नकाशात मुंबई राजधानी असलेले 'महाराष्ट्र राज्य' आजच प्रथम प्रकट होत आहे. अशा ह्या महन्मंगल दिवशी 'महाराष्ट्र-रसा'ने आमूलाग्र ओथंबलेल्या भावनांचा हा 'महाराष्ट्र-गाथा' गुंफून तो नव्या राज्याच्या चरणी अर्पण करून मी त्याचे अभिवादनपूर्वक स्वागत करतो.

महाराष्ट्रात जन्माला आल्याबद्दल कृतार्थ वाटण्यासारखा हा आजचा समय आहे. भारतात अनेक भाषांची अनेक राज्ये आहेत. ती ती राज्ये त्या त्या भाषिकांना प्राणापलीकडे प्रिय असली पाहिजेत हे काय सांगायला हवे? पण 'महाराष्ट्र' हे आमच्या भाषाप्रदेशाचे आणि भाषिक राज्याचे नाव अभूतपूर्व आहे! त्या नावातच केवढे आव्हान, केवढा अभिमान आणि केवढी भावना भरलेली आहे. नुसते नाव तोंडातून उच्चारले म्हणजे महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल नि संस्कृती मूर्तिमंत डोळ्यांपुढे उभी राहते. जगामध्ये इतके सार्थ आणि समर्थक नाव क्वचित्च एखाद्या देशाला प्राप्त झाले असेल. शब्द आणि अर्थ ह्यांची एवढी सुरम्य सांगड बसलेली आहे या नावात, की ज्याने हे नामकरण केले असेल त्याच्या विशाल कल्पकतेचा आणि द्रष्टेपणाचा खरोखरच अचंबा वाटतो! कदाचित् महाराष्ट्र या नावात कुणाला आत्मप्रशंसा किंवा अहंकार प्रतिबिंबित झालेला आहे असे वाटेल. पण तसे नाही. ह्याचा ज्याला पुरावाच हवा असेल त्यांनी महाराष्ट्राच्या पराक्रमाचा गाथा नुसता चाळून पाहावा.

पाचव्या सहाव्या शतकापासून महाराष्ट्र नावाचे आणि गौरवाचे उल्लेख प्राचीन संस्कृत आणि प्राकृत वाङ्मयात आढळतात. अर्थात् महाराष्ट्राचा इतिहास ह्याहीपेक्षा जुना असला पाहिजे. पंढरपूरची यात्रा दोन हजार वर्षांपासून भरत आहे, असे संशोधन प्रा. दामोदर धर्मानंद कोसांबी ह्यांनी नुकतेच केले आहे. महाभारतातही 'अश्मक, कलिंग आणि अपरान्त' ह्या तीन महान् राष्ट्रांचा उल्लेख आहे आणि ह्या तीन महाराष्ट्रांवर सत्याश्रय पुलकेशीने स्वामित्व मिळविले असा स्पष्ट निर्देश सातव्या शतकातल्या 'ऐहोळ' शिलालेखात आढळतो. महाराष्ट्राची व्याप्ती काय आहे आणि त्यामध्ये कोणत्या प्रदेशांचा समावेश होतो ह्यासंबंधी आजकाल कित्येकांना शंका पडावी याचा विस्मय वाटतो. पण श्रीचक्रधरांनी सहाशे सातशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रात समाविष्ट असलेल्या त्या सर्व 'खंडमंडळां'चा स्पष्ट निर्देश केलेला आहे त्याचा निर्देश आम्ही पूर्वी केला आहे.

सातव्या शतकात महाराष्ट्रात असलेले चिनी बौद्ध भिक्षू ह्यूएनत्सँग ह्यांनी तर मराठी लोकांच्या शौर्याची आणि लढवय्येपणाची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. विशेषत: "मराठी लोक हे साधे असून प्रामाणिक आहेत. त्यांचा स्वभाव निग्रही व करारी आहे. मित्रांशी कृतज्ञ तर शत्रूंशी निर्दय अशी त्यांची वृत्ती आहे. त्यांचा कोणी अपमान केला तर ते केव्हाही सहन करणार नाहीत. त्याचा सूड घेतल्याखेरीज ते राहात नाहीत. मग त्यात त्यांच्या प्राणांवर संकट आले तरी त्याला ते भीत नाहीत." हे मराठी स्वभावाचें वर्णन इतके अचूक आहे की ह्यूएनत्सँगसारख्या परदेशीय प्रवाशाने इतक्या थोड्या वेळात महाराष्ट्रातल्या माणसांची स्वभावपरीक्षा कशी केली याचे नवल वाटते. मुक्तेश्वराने 'महाभारता'त महाराष्ट्रीयांच्या लढवय्येपणाची स्तुती केलेली आहे. मराठी लोक हे 'सूड उगविण्याची प्रतिज्ञा करणारे' आणि 'मरेतो न हटणारे' असल्याची त्याने ग्वाही दिली आहे.

महाराष्ट्राचा इतिहास हा त्याच्या महान् नावाला सर्वथैव शोभणारा तर आहेच, पण साऱ्या भारतवर्षालाही तो भूषविणारा आहे. किंबहुना भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास म्हणजे निव्वळ महाराष्ट्राच्या पराक्रमाचाच इतिहास आहे. मोगलांची आणि इंग्रजांची सत्ता ह्या वंशातून उखडून टाकण्याचा प्रयत्न प्रथमत: महाराष्ट्रात व्हावा हे अद्भुत नव्हे काय? महाराष्ट्राच्या मातीत आणि मराठी माणसाच्या रक्तात असे काही विलक्षण रसायन भरले आहे की भारताच्या स्वातंत्र्यावर घाला आला की पहिल्यांदा महाराष्ट्रातील माणसे खवळून उठतात! ह्याची उत्कृष्ट मीमांसा न्यायमूर्ती रानडे ह्यांनी आपल्या 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' या ग्रंथात केली आहे. ते म्हणतात, "व्यक्तिस्वातंत्र्याचे प्राबल्य महाराष्ट्रात फार असल्याने महाराष्ट्रातील लोकांमध्ये स्वातंत्र्यप्रियता आणि परस्परांस मदत करण्याची इच्छा हे गुण साहजिकच उत्पन्न झाले. ह्याच गुणांचा स्वराज्य उभारण्याच्या कामी त्यांना फार उपयोग झाला. धर्माचे आग्रही स्वरूप महाराष्ट्रात आढळून येत नाही. महाराष्ट्रात कोणत्याही एकाच राजसत्तेचा अंमल फार वेळ कधीच टिकला नाही. उलट एकछत्री अंमल चालू न देण्याबद्दल त्यांची सतत खटपट चाललेली दिसते. उत्तरेकडून आलेल्या शत्रूस पादाक्रांत करण्यास एकजुटीने ते नेहमी तयार असतात."

भारताचे पहिले स्वराज्यसंस्थापक श्रीशिवछत्रपती हे महाराष्ट्रात जन्माला यावेत आणि त्यांनी लावलेल्या स्वराज्यवृक्षाचा वैभवशाली विस्तार सर्वत्र भारतामध्ये पसरून त्याचे कित्येक अवशेष तर भारताचे सध्याचे प्रजासत्ताक राज्य येईपर्यंत टिकावेत, हा या देशाच्या इतिहासामधला एक फार मोठा चमत्कार आम्ही समजतो. न्या. रानडे म्हणतात त्याप्रमाणे 'महाराष्ट्रसत्ता' ही राष्ट्रीय चळवळ होती. हिंदुस्थानामध्ये अशा प्रकारच्या स्वराष्ट्रस्थापनेचा प्रयोग महाराष्ट्राने प्रथम केला, म्हणून मराठ्यांचा इतिहास एका खऱ्या

'हिंदी राष्ट्राच्या रचनेचा इतिहास' होय. अशी देदीप्यमान इतिहासाबद्दल महाराष्ट्रातील लोकांना विलक्षण प्रेम आणि अभिमान वाटावा हे साहजिकच आहे.

किंवहुना, महाराष्ट्राच्या कर्तृत्वाला आणि पराक्रमाला चिरंतन स्फूर्ती देणारा ज्वलंत अंगार ह्या इतिहासाच्या पानापानामधून धगधगत आहे. स्वदेशापुढे आणि स्वातंत्र्यापुढे मराठ्यांना आपल्या प्राणाची किंमत वाटत नाही. अन्याय आणि अपमान तर कालत्रयीही ते सहन करणार नाहीत. औरंगझेबाच्या दरबारात आपला अपमान होतो आहे, हे पाहताच शिवाजीमहाराज एखाद्या वाघाप्रमाणे त्याच्या अंगावर कडाडले. एका क्रूर आणि हिंस्र शत्रूच्या गुहेत शिरून त्याच्या तोंडावर त्याचा पाणउतारा करणारा शिवाजीमहाराजांसारखा अफाट हिंमतीचा नरवीर ह्या त्रिखंडांत अजून जन्माला यावयाचा आहे!

पहिल्या छत्रपतीचा जो वज्रकठोर मराठी बाणा तोच शेवटचा छत्रपती प्रतापसिंहाचा! दोहोंत काहीच फरक नाही. त्याच्यावर इंग्रजांनी फितुरीचे आरोप ठेवले आणि ते कबूल कराल तर तुम्हाला आम्ही गादीवर बसू देऊ अशी धमकी दिली. तेव्हा प्रतापसिंहाने त्या वेळच्या गव्हर्नर-जनरलला जे उत्तर दिले ते तेवढेच जळजळीत आहे. हीच मराठी जिद्द आणि हाच मराठी बाणा साऱ्या मराठी इतिहासामध्ये एखाद्या विद्युल्लतेच्या अग्निरेषेसारखा झगझगतो आहे.

सत्तावनी स्वातंत्र्यसंग्रामाचे सेनापती नानासाहेब पेशवे पराभूत झाल्यानंतरही निर्वाणीच्या क्षणी त्यांनी इंग्रजांना काय निरोप धाडला? "मी बलाढ्य इंग्रजांचा या देशातला एकमेव शत्रू आहे यातच मला समाधान आहे. माझ्या जिवात जीव आहे, तोपर्यंत मी तुमच्याशी लढणारच. मी मारला जावो. फाशी दिला जावो!" मराठी माणसाखेरीज असली भाषा ह्या भारतात कोण बोलणार?

उघड्या डोळ्यांनी मृत्यूला आव्हान देण्याचे सामर्थ्य ह्या देशातच नव्हे तर या जगात फक्त मराठ्यांतच आहे. फाशी जाण्यापूर्वी तात्या टोपे ह्यांचे उद्गार काय होते? "इंग्रजांविरुद्ध लढल्याबद्दल मला मरणास सिद्ध राहिले पाहिजे, हे मला पूर्णपणे माहीत होते. म्हणून आता लौकरात लौकर मला फासावर चढवून किंवा तोफेच्या तोंडी देऊन माझी सुटका करा!" वासुदेव बळवंत फडक्यांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध बंड पुकारले का? ते म्हणतात, "माझा देशाभिमान अतिशय जाज्वल्य होता. ईश्वराला माझी हीच प्रार्थना होती की, त्याने माझे प्राण घ्यावेत पण माझ्या देशबांधवांना सुखी करावे."

प्लेगच्या अमदानीत पुण्यातील जनतेवर रँडसाहेबांनी जे अत्याचार केले ते बघवेनात म्हणून चाफेकर बंधूंनी त्यांचा खून केला. वीर सावरकरांनी ब्रिटिशांच्या राजकीय दास्यातून मातृभूमीस स्वतंत्र करण्यासाठी 'अभिनव-भारत' ही जेव्हा क्रांतिसंस्था काढली, तेव्हा त्या कार्यात आपला देहपात अंदमानात होऊन आपल्या अस्थी आणि रक्षा त्या निर्जन आणि भेसूर प्रदेशात कुठे तरी पडतील ह्याची त्यांना पूर्ण कल्पना होती, असे त्यांनी स्वत:च

लिहून ठेवले आहे. स्वातंत्र्यासाठी आणि स्वदेशासाठी सर्वस्वाचे बलिदान करण्याची ही प्रवृत्ती आणि परंपरा आजतागायत महाराष्ट्रात अखंड चालू आहे.

शिवाजीमहाराजांनी महाराष्ट्रात जी राज्यक्रांती घडवून आणली तिच्या आधी मराठी साधुसंतांनी सामाजिक आणि धार्मिक क्रांतीने महाराष्ट्रातली सारी जनता जागृत केली होती हे विसरून चालणार नाही. महाराष्ट्राच्या इतिहासात राजकीय नि धार्मिक उत्थापनाची एक वेमालूम सांगडच जणू काही बसली आहे. ह्या त्यांच्या वैशिष्टचाचे महत्त्व बरोबर समजले नाही तर मराठ्यांचा अभ्युदय हे एक मोठेच गूढ होऊन बसेल असे न्या. रानडे म्हणतात ते बरोबरच आहे. 'मराठा तितुका मेळवावा! महाराष्ट्र धर्म वाढवावा!' हा जो महाराष्ट्र धर्माचा महामंत्र समर्थांनी उच्चारला, त्या महाराष्ट्र धर्माचे खरे इंगित काय आहे?

महाराष्ट्र धर्माचा प्रसार करा म्हणजे काही बौद्धिक, पौराणिक किंवा हिंदुधर्माचा प्रसार करा असे नाही. महाराष्ट्र धर्म म्हणजे काही नुसताच देवधर्म नव्हता. देशधर्म आणि भक्तिधर्म ह्यांची सांगड घालण्याचा तो महाराष्ट्रातल्या संतांचा अभिनव प्रयत्न होता. 'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा' हे त्या धर्माचे सूत्र होते. तर 'मारितां मारितां मरावें। तेणें गतीस पावावें। फिरोनी येतां भोगावें। महद्भाग्य॥ देव मस्तकीं धरावा। अवघा हलकल्लोळ करावा। मुलुख बुडवा का बुडवावा। धर्मसंस्थापनेसाठी' आणि 'धटासी आणावा धट। उद्धटासी पाहिजे उद्धट। खटनटासी खटनट। अगत्य करी' हे त्या महाराष्ट्र धर्माचे तंत्र होते.

जन्ममूलक वर्णभेद, आचार आणि सांप्रदाय ह्यांविरुद्ध महाराष्ट्र धर्माचा फार मोठा कटाक्ष होता.

'समर्थांसी नाही वर्णावर्ण भेद।
राजा आणि रंक सारिखेची।'

यज्ञयाग, जपजाप्य आणि कर्मकांड ह्यांचे त्या काळात प्रचंड प्रस्थ माजले होते. त्यामुळे धर्म आणि मोक्ष ह्या गोष्टी सामान्य माणसाच्या आटोक्याबाहेर होत्या. ह्या दंभावर महाराष्ट्र धर्माच्या प्रचारकांनी फार मोठा हल्ला चढविला आणि शुद्ध अंत:करण, प्रेमळ बुद्धी अन् भक्तिभाव एवढे भांडवल जवळ असले म्हणजे प्रपंच करता करता नुसत्या नामसंकीर्तनाने सुद्धा परमार्थ साधता येतो, असा ईश्वरप्राप्तीचा अगदी साधा आणि सरळ मार्ग संतांनी सांगितला.

'सोपे वर्म आम्हां सांगितलें संतीं।
टाळ दिंडी हातीं घेऊन नाचा.'

'रंजल्या गांजल्यांना नि अनाथ अपंगांना हृदयाशी जो धरतो, अन् आपल्या पुत्रांवर जे प्रेम करतो, तेच जो दासांवर करतो, तोच साधू आणि तो देव'; ही तुकोबांची शिकवण

तर ह्या महाराष्ट्रधर्माच्या मानवतावादाचा आणि समतावादाचा कळस होय! अशा, या बहुजनसमाजाच्या उदार आणि व्यापक महाराष्ट्र धर्माचे पंढरपूर हे धार्मिक पीठ बनले, तर रायगड हे त्याचे राजकीय केंद्र झाले. वारकरी आणि धारकरी ह्यांच्या 'पुंडलीक वरदा हारिविठ्ठल' आणि 'हर हर महादेव' ह्या गर्जनांनी सारा महाराष्ट्र देश दणाणून गेला. आणि पारतंत्र्याचा नाश होऊन स्वराज्याचा सूर्य क्षितिजावर उगवला.

महाराष्ट्र धर्माचे आध्यात्मिक अधिष्ठान जर आमच्या स्वातंत्र्य प्रयत्नात लाभले नसते, तर हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ कदापि रोवली गेली नसती. महाराष्ट्र-धर्माची प्रतिष्ठापना करणारी ही साधुसंत मंडळी प्रामुख्याने बहुजनसमाजातलीच होती. सर्व जातींचा त्यात समावेश झाला होता. ब्राह्मण होते, शूद्र होते, शिंपी, सुतार, कुंभार, माळी, वाणी, न्हावी आणि महारही होते. दोनशे वर्षे होऊन गेली तरी ह्या संतकवींच्या नावाची पकड महाराष्ट्राच्या जनमानसावर एवढी जबरदस्त आहे, की तुकाराम, रामदास, एकनाथ, नामदेव, चोखामेळा, गोरा कुंभार, सावतामाळी ही नावे कानावर पडताच आजही मराठी लोकांना प्रेमाचे भरते येते आणि 'राम कृष्ण हरि' म्हणत ते आनंदाने डोलू लागतात.

महाराष्ट्र धर्माच्या या प्रतिष्ठापनेच्या काळात मराठी भाषेला आणि साहित्याला असे काही तेज चढले होते, की मराठीचिये नगरी साक्षात् 'सोनियाच्या खाणी' उघड्या झाल्या आणि त्यांच्या झगमगाटाने सारा महाराष्ट्र दिपून गेला. 'माझा मऱ्हाठाचि बोलु' हा अमृताशी पैज जिंकणारा आहे, असा आत्मविश्वास मराठी भाषिकांत निर्माण झाला. सर्व शास्त्रे, सर्व तत्त्वज्ञान आणि सर्व विद्या ह्यांची भांडारे संस्कृत भाषेच्या कड्याकुलुपात अडकून पडली होती. ती सर्व भांडारे आमच्या संत कवींनी फोडून मराठी भाषेत वाहून आणली आणि सर्वत्र ब्रह्मविद्येचा सुकाळ करून टाकला. संस्कृत भाषापांडित्याची सर्व घमेंड अशा रीतीने आमच्या अपढिक कवींनी जिरवून टाकली.

एकनाथांनी तर छातीठोकपणे विचारले की, 'अरे, संस्कृतवाणी देवें केली। आणि प्राकृत काय चोरापासोनि झाली?' दासोपंत आणखी त्याच्यापुढे गेले नि म्हणाले की, "संस्कृतात मातीच्या भांड्याला 'घट' हा एकच शब्द आहे, तर मराठी भाषेत 'डेरा, रांजण, घडा, मडके, वोळके' असे छप्पन शब्द आहेत! तेव्हा तुमच्या संस्कृतची मिजास आमच्या पुढे सांगू नका!" गेल्या दोनशे वर्षांत महाराष्ट्राचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन ज्या ज्या विविध आणि अभिजात वाङ्मयाने समर्थ आणि समृद्ध झाले, त्याच्या नवनीताचा मधुर आस्वाद केवळ मराठी साहित्यातच मिळेल.

महाराष्ट्र हा जसा वीरांचा आणि संतांचा देश आहे, तसा तो कलावंतांचाही देश आहे. महाराष्ट्राच्या प्राकृतिक रचनेत सौंदर्य आणि भव्यता ह्यांचा उदात्त नि उग्र समन्वय झाला आहे. सह्याद्रीची उत्तुंग आणि दुर्गम शिखरे नि त्यांचा लांबलचक अजस्र विस्तार बघून आश्चर्य आणि भीती ह्या भावनांनी महाराष्ट्राचे प्राचीन कलावंत भारून नि भांबावून गेले

असले पाहिजेत. आणि म्हणून साहजिकच शिल्पकलेचा ह्या देशात जास्त जास्त विचार आणि विकास झाला.

उंच उंच गिरिशिखरांवरील महाबळेश्वर, भीमाशंकर, सप्तशृंगी, जेजुरी ही सुरम्य देवालये, धिप्पाड कड्यांच्या मस्तकावर ठायी ठायी बांधलेले लढाऊ गड, कोट, किल्ले, उत्तुंग पहाड फोडून देश आणि कोकण ह्यांना जोडण्यासाठी काढलेले प्रचंड घाट आणि मोठमोठे खडक पोखरून आतमध्ये खोदलेली कलापूर्ण लेणी हे महाराष्ट्राच्या शिल्पकलेचे एकाही पेक्षा एक अद्भुत चमत्कार नव्हेत काय ?

गिरिदुर्गाप्रमाणेच महाराष्ट्राच्या पश्चिमेस झळाळणाऱ्या सिंधुसागरातही जे जलदुर्ग बांधण्यात आलेले आहेत, तेही पाहिल्यानंतर मन थक्क होते. दुर्ग, देवालये, मंदिरे, विहार, लेणी, स्तूप आणि मूर्ती हे महाराष्ट्राच्या शिल्पकलेचे विविध वैभव अलौकिक आहे. आणि वेरूळ-अजंठ्याने तर महाराष्ट्राचे नाव जागतिक कलेच्या नकाशात अमर केले आहे.

शिल्पकलेप्रमाणेच चित्रकला, गायनकला आणि नाट्यकला ह्या कलेच्या क्षेत्रात महाराष्ट्राने असामान्य पराक्रम केलेले आहेत. प्राचीन कवीप्रमाणेच आजचे कवी आणि शाहीरही महाराष्ट्राच्या पराक्रमाचे आणि वैभवाचे पवाडे अत्यंत आवेशाने नि तन्मयतेने गात असलेले आढळतात. नाथांच्या 'भागवता'ची पैठणी नेसलेली, तुक्याच्या 'गाथ्या'चा मुकुट मस्तकी घातलेली आणि ज्ञानेशाच्या 'ज्ञानेश्वरी'चा मळवट कपाळी लावलेली अशी ही मराठी भाषा 'आमची मायबोली' आहे असे सांगताना आजही आमच्या कवींचे ऊर अभिमानाने भरून येते.

कोकणच्या किनाऱ्यावरील 'आंबे, पोफळी, साग, नारळी' ह्या वैभवाचे आणि घाटमाथ्यावरील 'कळकिचें वेट आकाशांत झुकांड्या मारी। करवंदी वाभळ वोरी। चिल्लर कठिण कांटेरी' या सौंदर्याचे वर्णन करताना अथवा 'वरी, नाचणी, भात, बाजरी, कापूस, शाळू' पिकवणाऱ्या आणि 'कांबळ खांदी, वहाण पायीं डोईस मुंडासें' घालणाऱ्या मराठी शेतकऱ्याचे वर्णन करताना आमचे कवी अक्षरश: देहभान विसरतात. महाराष्ट्राच्या प्रेमाने आणि अभिमानाने सारी मराठी जनता अक्षरश: भारून गेलेली आहे.

महाराष्ट्राचे हे अंत:करण :

अहा, देश कसा छान
माझें गेलें देहभान,
हिरवें हिरवें सारें रान
कुठें नागवेली पान
कसा पिकला ग गहूं, हरभरा!
हा शाळू मक्याचा तुरा
महाराष्ट्र देश सुंदरा!

ह्या शाहीर गीतात जितक्या हृदयंगम रीतीने प्रकट झाले आहे तितके अन्यत्र कुठेच झाले नाही.

मराठी माणसांच्या अंत:करणातले हे महाराष्ट्राच्या प्रेमाचे, भक्तीचे, अभिमानाचे आणि आदराचे उमाळे खळवळून उचंबळावेत आणि त्यांच्या परिमळाने हे सारे महाराष्ट्र दरवळून स्वर्गाप्रमाणे ते अक्षरश: 'आनंदवनभुवन' व्हावे, ह्या भावनेने आमच्या इतिहासातली, भाषेतली, वाङ्मयातली आणि परंपरेतली सारी 'देवटाकी' प्रत्येक मराठी माणसाने डोळ्यांनी पाहिली पाहिजेत, आणि त्यांतले चैतन्यजल आपण स्वत:च्या ओंजळीने घटाघटा प्याले पाहिजे. तरच ह्या 'आनंदवनभुवना'चा खरा साक्षात्कार त्याला होईल.

तेवढ्यासाठीच आज हे 'महाराष्ट्र राज्य' तीन कोटी मराठी जनतेच्या भगीरथ प्रयत्नांमधून अवतीर्ण होत आहे. ह्या महाराष्ट्रात आम्ही जन्माला आलो, एवढेच नव्हे तर स्वतंत्र भारतात तीन कोटी मराठी भाषिकांचे राज्य निर्माण होत असताना आम्ही ते डोळ्यांनी पाहिले. आम्ही त्या तेजस्वी पराक्रमात भागीदार बनलो. आम्ही त्या ओजस्वी इतिहासाचे साक्षीदार झालो. आमच्या कृतकृत्यतेला आणि धन्यतेला आता पारावार राहिला नाही! तीन कोट मराठी माणसांच्या प्रयत्नांचे, पराक्रमाचे आणि त्यागाचे आज खरे सार्थक झाले. अनेकांच्य हौतात्म्यातून साकार होत असलेल्या ह्या महाराष्ट्राच्या उद्धारासाठी नि संरक्षणासाठी 'तत्कारणिं देह पडो ही असे स्पृहा!' हा एकच निदिध्यास प्रत्येक मराठी माणसाच्या मनीमानसी या क्षणी निर्माण होवो ह्याखेरीज ह्या महन्मंगल प्रसंगी दुसरे काय मागणार?

धन्य दिवस आज उगवे सोनियाचा!
महाराष्ट्रीं आला पर्व अमृताचा!

REFBK-0026624

मराठी ग्रंथसंग्रहालय संघ
दा. क्र. 3806
शाखा

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
रेवा वरदा, कृष्णा कोयना, भद्रा गोदावरी
एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी

राजा बढे

बहु असोत सुंदर संपन्न कीं महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा।

श्री. कृ. कोल्हटकर

'महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले
मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले'

सेनापती बापट

मंगल देशा! पवित्र देशा! महाराष्ट्र देशा!
प्रणाम घ्यावा माझा हा, श्री महाराष्ट्र देशा

राम गणेश गडकरी

शूर अम्ही सरदार अम्हाला काय कुनाची भीति
देव, देश अन् धर्मापायी प्रान घेतलं हाती

शांता शेळके